दैनिक
# संध्या
नि:पक्ष समीक्षणाचे....निर्भीड दैनिक
७० वर्ष
निर्भीड पत्रकारीतेची
शुक्रवार, दि. २४ एप्रिल २०२६
www.dainikesandhya.com www.youtube.com/@sandhyalivenews
संस्थापक : कै. वसंत काणे | नोंदणी क्रमांक : १६६३/१९५७ | पुणे आवृत्ती | पाने : ८ | अंक : ११९ | Gmail : news.sandhya@gmail.com | किंमत : ७ रूपये





# उदंचन प्रकल्पाच्या माध्यमातून राष्ट्रीय ग्रीड स्थिर ठेवण्याची राज्यात क्षमता निर्माण होणार : देवेंद्र फडणवीस

## उदंचन जलविद्युत प्रकल्पासाठी तात्यासाहेब कोरे वारणा नवशक्ती निर्माण संस्थेबरोबर ५ हजार २०० कोटींचा करार

**मुंबई (दै. संध्या)**

जलसंपदा विभाग आणि तात्यासाहेब कोरे वारणा नवशक्ती निर्माण संस्था मर्यादित यांच्यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत तीन उदंचन जलविद्युत प्रकल्पांसाठी सुमारे ५ हजार २०० कोटी रुपयांचा आज सामंजस्य करार करण्यात आला. महाराष्ट्राच्या ऊर्जा क्षमतेत वाढ करण्यासाठी हा करार महत्त्वाचा टप्पा ठरणार असून या माध्यमातून कमी खर्चात मोठ्या प्रमाणावर ऊर्जा साठवणूक करून राष्ट्रीय ग्रीड स्थिर ठेवण्याची क्षमता राज्यात निर्माण होईल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी व्यक्त केला.




वर्षा या शासकीय निवासस्थानी झालेल्या कार्यक्रमास जलसंपदा मंत्री गिरीश महाजन, जलसंपदा विभागाचे अपर मुख्य सचिव दीपक कपूर, जलसंपदा सचिव संजय बेलसरे, आमदार डॉ. विनय कोरे, नवशक्ती निर्माण संस्थेचे अध्यक्ष नामदेव एच. पाटील, मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव लोकेश चंद्रा, प्रधान सचिव डॉ. श्रीकर परदेशी आदि उपस्थित होते.

तात्यासाहेब कोरे वारणा नवशक्ती निर्माण संस्थेच्या वतीने कुंभी ऑफ स्ट्रीम क्लोज्ड लूप उदंचन प्रकल्प, जि. कोल्हापूर / सिंधुदुर्ग येथे दोन व शाहूवाडी येथे कडवी ऑफ स्ट्रीम क्लोज्ड लूप उदंचन प्रकल्प हा एक असे तीन प्रकल्प उभारण्यात येणार आहे. या माध्यमातून सुमारे ५ हजार १९९ कोटी रुपयांची गुंतवणूक होणार असून ११०० मेगावॅट वीज निर्मिती क्षमता स्थापित होणार आहे. या तीनही प्रकल्पातून ११०० मनुष्यबळ रोजगार निर्मिती होणार आहे. यावेळी मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले की, महाराष्ट्राने उदंचन जलविद्युत प्रकल्पांमध्ये आतापर्यंत ८०,००० मेगावॅट क्षमतेचा टप्पा ओलांडला असून अपारंपरिक ऊर्जा क्षेत्रातही मोठी झेप घेतली आहे. अशा परिस्थितीत उदंचन जलविद्युत प्रकल्प (पीएसपी) हे भविष्यातील ऊर्जा गरजा पूर्ण करण्यासाठी अत्यंत उपयुक्त ठरणार आहेत. देशातील अनेक राज्ये सौरऊर्जेमध्ये आघाडीवर आहेत. राजस्थान आणि गुजरातसारख्या राज्यांकडे विस्तीर्ण वाळवंट क्षेत्र असल्याने तेथे मोठ्या प्रमाणावर सौर प्रकल्प उभे राहत आहेत.

मात्र महाराष्ट्राची खरी ताकद पंप्ड स्टोरेज प्रकल्पांमध्ये आहे.या करारामुळे राज्यातील ऊर्जा पायाभूत सुविधांना चालना मिळणार असून भविष्यातील वाढत्या विजेच्या मागणीला तोंड देण्यासाठी महाराष्ट्र सक्षम होणार असल्याचा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला. राज्यात मोठ्या प्रमाणावर डेटा सेंटर्स उभारले जात असून पुढील ३ ते ४ वर्षांत विजेची मागणी झपाट्याने वाढणार आहे. विशेषतः अपारंपरिक ऊर्जेवर आधारित वीज या डेटा सेंटर्समध्ये मोठ्या प्रमाणावर वापरली जाणार आहे. त्यामुळे अशा प्रकल्पांची उभारणी ही काळाची गरज असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले.

# 'शिवाजी कोण होता' पुस्तकाचे बुलढाण्यात जाहीर वाचन

**पुणे (दै. संध्या)**

कॉम्रेड गोविंद पानसरे लिखित 'शिवाजी कोण होता' या पुस्तकाच्या शीर्षकावरून नवा वाद उफाळून आला असून बुलढाण्याचे शिवसेना शिंदे गटाचे आमदार संजय गायकवाड यांनी यावर तीव्र आक्षेप नोंदवला आहे. हे शीर्षक छत्रपती शिवाजी महाराजांचा अनादर करणारे असल्याचा दावा करत गायकवाड यांनी प्रकाशक प्रशांत आंबी यांना फोनवरून अर्वाच्य भाषेत शिवीगाळ व धमकी दिल्याची तक्रार समोर आली आहे. या कथित संवादाची एक ऑडिओ क्लिप सध्या सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल झाली आहे. यावरून विरोधकांनी गायकवाड यांच्यावर टीकेची झोड उठवली आहे. आता ॲड. असीम सरोदे यांनी थेट आव्हान दिले आहे.

बुलढाण्यात लवकरच 'शिवाजी कोण होता' या पुस्तकाचे जाहीर वाचन करण्यात येणार. संजय गायकवाड काय करतो बघू, अशा शब्दात असीम सरोदे यांनी थेट आव्हान दिले आहे. त्यांनी ट्विट करत म्हटले की, आमदार संजय गायकवाड



यांची भाषा बघा. 1988 मध्ये प्रकाशित शिवाजी कोण होता या गोविंद पानसरे सर यांच्या पुस्तकाच्या शीर्षकात 'शिवाजी कोण होता' असा एकेरी उल्लेख का? असा संजय गायकवाडचा आक्षेप आहे व त्यासाठी त्याने पुस्तकाचे प्रकाशक प्रशांत आंबी यांना फोन करून अत्यंत अश्लील, अर्वाच्य शिव्या दिल्या. त्याच भरात संजय गायकवाड असे म्हणाला की, शिवाजी महाराज तुया मायचा नवरा होता असे म्हणून छत्रपती शिवाजी महाराजांचा सुद्धा अपमान केला.

पुढे असीम सरोदे म्हणाले, सॅल्यूट केला पाहिजे प्रशांत आंबी या प्रकाशकाला की भाषेचा स्तर, आवाजातील स्वर ढळू न देता अत्यंत संयमित पद्धतीने त्याने गुंड प्रवृत्तीच्या आमदार संजय गायकवाड याच्या सोबत संवाद केला. आत्ताच माझे प्रशांत सोबत बोलणे झाले.


क्युआर स्कॅन करून दै. संध्याच्या युट्युब चॅनलला सबस्क्राईब करा
SUBSCRIBE
e-paper www.sandhyaepaper.com


## ढिंग-टांग




# बुलढाणा जिल्ह्याचे नाव बदनाम करण्याचा ठेका घेतलाय का?

**मुंबई (दै. संध्या)**

सदर शिवसेना आमदार संजय गायकवाड यांनी 'शिवाजी कोण होता' या पुस्तकाच्या प्रकाशकाला दिलेल्या धमकीनंतर राज्याच्या राजकारणात नवा वाद निर्माण झाला आहे. या प्रकरणावर काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी तीव्र प्रतिक्रिया देत गायकवाडांवर जोरदार टीका केली आहे. बुलढाणा जिल्ह्याचे नाव बदनाम करण्याचा विडाच त्यांनी उचलल्याचा आरोप करत सपकाळ यांनी सोशल मीडियावर सविस्तर पोस्ट लिहून हल्लाबोल केला आहे.

दिवंगत कॉम्रेड गोविंद पानसरे यांनी अनेक वर्षांपूर्वी लिहिलेल्या 'शिवाजी कोण होता' या पुस्तकाच्या शीर्षकावरून हा वाद सुरू झाला. या पुस्तकाचे प्रकाशक प्रशांत आंबी यांना फोन करून संजय गायकवाड यांनी शिवाजी महाराजांचा अवमान झाल्याचा आरोप करत शिवीगाळ आणि जीवे मारण्याची धमकी दिल्याचा आरोप आहे. या संभाषणाची ऑडिओ क्लिप सोशल मीडियावर व्हायरल झाल्यानंतर या प्रकरणाने अधिकच गंभीर वळण घेतले.

या पार्श्वभूमीवर हर्षवर्धन सपकाळ यांनी गायकवाडांच्या वर्तणुकीवर



प्रश्नचिन्ह उपस्थित केले. त्यांनी आपल्या पोस्टमध्ये म्हटले की, आमदार निवासातील कँटीनमध्ये हाणामारी करणे, सुरक्षेसाठी असलेल्या पोलिसांकडून स्वतःची गाडी धुवून घेणे आणि आता प्रकाशकाला धमकी देणे अशा अनेक घटनांमुळे गायकवाड सातत्याने वादात आहेत. एका लोकप्रतिनिधीने अशी भाषा वापरणे आणि अशा प्रकारे वागणे हे अत्यंत गंभीर असल्याचे त्यांनी नमूद केले.

सपकाळ यांनी पुढे अधिक कठोर शब्दांत टीका करत म्हटले की, छत्रपती शिवाजी महाराजांचे नाव घेण्याचीदेखील गायकवाड यांची पात्रता नाही. त्यांच्या बोलण्याची पातळी आणि वापरलेली भाषा पाहता महाराष्ट्राच्या संस्कृतीला धक्का पोहोचत असल्याचे त्यांनी सांगितले. शिवरायांनी घालून दिलेल्या मूल्यांना तडा देण्याचे काम अशा वागणुकीतून होत असल्याचा आरोपही त्यांनी केला.


# बारामतीकरांच्या हृदयाचा आवाज ऐकवणारी निवडणूक - रोहित पवार

**बारामती (दै. संध्या)**

बारामती विधानसभा पोटनिवडणुकीसाठी काँग्रेसच्या आकाश मोरेंनी माघार घेतली असली तरी उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवारांसह 23 उमेदवार निवडणूक रिंगणात असून आज (गुरुवारी 23 एप्रिल) त्यासाठी मतदान झाले आहे. निवडणुकीत प्रामुख्याने सुनेत्रा पवार (राष्ट्रवादी काँग्रेस) विरोधात राघू घुटुकडे (न्यू राष्ट्रीय समाज पार्टी), सतीश कदम (हिंदुस्थान जनता पार्टी), करुणा धनंजय मुंडे (अपक्ष) व अभिजित बिचुकले (अपक्ष) यांच्यात प्रमुख लढत होईल असे चित्र आहे.

**भविष्यात बारामतीत पवार विरुद्ध पवार, अशी लढत - रोहित पवार**

याच पार्श्वभूमीवर रोहित पवार यांनीही 2029 च्या निवडणुकीवर भाष्य केले आहे. त्यांनी सांगितले की, भविष्यात बारामतीत पवार विरुद्ध पवार, अशी लढत होण्याची शक्यता नाकारता येत नाही. लोकांना अशी लढत नको आहे, पण काहीजण त्यासाठी प्रयत्न करत आहेत, असे ते म्हणाले. त्यामुळे येत्या काळात बारामतीतील राजकारण अधिकच रंगणार असल्याचे संकेत मिळत आहेत.



**निवडणूक लोकांनी हातात घेतली- सुनेत्रा पवार**

बारामतीकर सकाळपासून ज्या मोठ्या संख्येने मतदानासाठी घराबाहेर पडत आहेत, ते पाहून मन भरून आले आहे. अजितदादांनी इतकी वर्षे बारामतीच्या विकासासाठी आणि जनतेसाठी जे योगदान दिले, त्याची परतफेड बारामतीकर आज मतदानाच्या रूपाने नक्कीच करतील, असा मला ठाम विश्वास आहे, ही पोटनिवडणूक सगळ्याच बाजूने अत्यंत भावनिक आहे. पण ही निवडणूक लोकांनी हातात घेतली, अशा शब्दांत राष्ट्रवादी काँग्रेसच्या उमेदवार सुनेत्रा पवार यांनी आपली भावना व्यक्त केली.

**बारामती निवडणूक बिनविरोध व्हावी अशी इच्छा होती- संजय राऊत**

संजय राऊत म्हणाले की, बारामती निवडणूक ही भावनिक आहे. सुनेत्रा पवार या महायुतीच्या उमेदवार आहेत. ही निवडणूक बिनविरोध व्हावी यासाठी सर्वांनी प्रयत्न केले पण दुर्दैवाने निवडणूक बिनविरोध झाली नाही. प्रमुख पक्षाचे उमेदवार नसले तरी काही अपक्ष लोकं उभे आहेत. मविआकडून आमच्या नेत्या सुप्रिया सुळे या सांगता सभेला उपस्थित होत्या. शरद पवारांनी सुद्धा सोशल मिडीयाच्या माध्यमातून मतदानासाठी आवाहन केले आहे. सुनेत्रा पवारांनी शरद पवारांचे आशीर्वाद घेतले आहे. अजित पवारांविषयी भावना व्यक्त करणारी ही निवडणूक आहे. राहुरीची निवडणूक सुद्धा महायुती आणि मविआमध्ये चांगली टक्कर होताना दिसत आहे.



**दिवंगत अजित पवार यांच्या स्मृतीस्थळाला भेट**

बारामती पोटनिवडणुकीसाठी मतदान करण्यापूर्वी उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी अत्यंत भावूक वातावरणात विद्या प्रतिष्ठान येथील दिवंगत अजित पवार यांच्या स्मृतीस्थळाला भेट देऊन अभिवादन केले.

## ब्रेकिंग न्यूज

### SC म्हणाले- अशा याचिका ऐकणे धोकादायक

पश्चिम बंगाल (दै. संध्या) : गुरुवारी सलग दुसऱ्या दिवशी सर्वोच्च न्यायालयात I-PAC रेड प्रकरणावर ईडीच्या याचिकेवर सुनावणी झाली. ईडीच्या अधिकाऱ्यांच्या वतीने अतिरिक्त सॉलिसिटर जनरल एस.व्ही. राजू यांनी युक्तिवाद केला. ते म्हणाले की, ईडीच्या अधिकाऱ्यांच्या मूलभूत हक्कांचे उल्लंघन झाले आहे.

ईडीने म्हटले की, 'कायद्याचे राज्य' (Rule of Law) समानतेच्या मूलभूत हक्काचा भाग आहे. जेव्हा 'कायद्याच्या राज्या'चे उल्लंघन होते, तेव्हा एजन्सी आणि तिचे अधिकारी वैयक्तिक आणि अधिकृत अनुच्छेद 32 अंतर्गत थेट सर्वोच्च न्यायालयात दाद मागू शकतात.

यावर न्यायमूर्ती पी.के. मिश्रा आणि न्यायमूर्ती एन.व्ही. अंजारिया यांच्या खंडपीठाने म्हटले की, जर आम्ही अशा याचिका ऐकत राहिलो, तर धोका आहे. हे न्यायालय अनुच्छेद 32 च्या याचिकांनी भरून जाईल. आम्ही याला प्रोत्साहन द्यावे की फेटाळून लावावे?

ईडीने म्हटले, 'कोलकातामध्ये ईडीच्या अधिकाऱ्यांना रोखण्यात आले, त्यांना ओलीस ठेवण्यात आले. त्यांच्याविरुद्ध वैयक्तिक गुन्हे घडले आहेत. ते पीडित आहेत.' यावर न्यायालयाने विचारले - जर ईडीच्या अधिकाऱ्यांचे वैयक्तिक अधिकार आहेत, तर मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांचे वैयक्तिक अधिकार नाहीत का?

## ममता म्हणाल्या – SIR च्या विरोधात प्रचंड मतदान; तामिळनाडूमध्येही इतिहासातील सर्वाधिक 82.84% मतदान

# बंगालमध्ये मतदानाचा नवा विक्रम, पहिल्या टप्प्यात ९०% मतदान



**पश्चिम बंगाल (दै. संध्या)**

आसाम, केरळ आणि पुद्दुचेरीप्रमाणेच बंगाल आणि तामिळनाडूमध्येही विक्रमी मतदान झाले आहे. गुरुवारी बंगाल निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यात २९४ पैकी १५२ जागांवर ८९.९३% मतदान झाले.

त्याच वेळी, तामिळनाडूमध्ये २३४ जागांवर विक्रमी ८२.२४% मतदान झाले. राज्याच्या इतिहासातील हे आतापर्यंतचे सर्वाधिक मतदान आहे. निवडणूक आयोगाची आकडेवारी सायंकाळी ५ वाजेपर्यंतची आहे. यात बदल होऊ शकतो.

यापूर्वी, आसामच्या इतिहासातील सर्वाधिक मतदान ८५.९१%, पुद्दुचेरीमध्ये ९०% आणि केरळममध्ये १९८७ पासूनचे सर्वाधिक मतदान ७८.२७% होते. पश्चिम बंगालमधील दक्षिण मिदनापूर येथील कुमारगंज मतदारसंघातील भाजपचे उमेदवार सुवेंदू सरकार यांच्यावर हल्ला झाला. एका व्हिडिओमध्ये सुवेंदू आपल्या सुरक्षा रक्षकासह हल्ल्यातून वाचण्यासाठी पळताना दिसत आहेत. असे असूनही, जमाव त्यांना मारहाण करतच राहिला.

दरम्यान, बर्नपूरच्या रहमतनगर परिसरात आसनसोल दक्षिण मतदारसंघातील भाजपच्या उमेदवार अग्निमित्रा पॉल यांच्या गाडीवरही हल्ला झाला. गाडीची मागची काच फोडण्यात आली. अग्निमित्रा यांनी सांगितले की, मतदान केंद्रातून बाहेर पडत असताना त्यांच्या गाडीवर दगडफेक करण्यात आली.

अग्निमित्रा यांनी हिरापूर पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. बंगालमधील इतर अनेक ठिकाणी भाजप आणि टीएमसी कार्यकर्त्यांमध्ये संघर्ष झाल्याचे वृत्त आहे. अनेक ठिकाणी ईव्हीएममध्ये बिघाड झाल्याचेही वृत्त आहे.

बीरभूमच्या बोधपूर गावात ईव्हीएममध्ये बिघाड झाल्याने लोकांनी पोलिस आणि केंद्रीय दलांवर दगडफेक केली. पोलिसांच्या एका वाहनाचीही तोडफोड करण्यात आली. या घटनेत अनेक सुरक्षा कर्मचारी जखमी झाले. बुधवारी रात्री उशिरा मुर्शिदाबादच्या नौदामध्ये मतदान सुरू होण्यापूर्वी एक क्रूड बॉम्ब फेकला गेला. यात अनेक जण जखमी झाले.

यानंतर, आम जनता उन्नयन पार्टीचे (एजेयूपी) प्रमुख हुमायूं कबीर सकाळी घटनास्थळी पोहोचले आणि त्यांना विरोधाचा सामना करावा लागला. त्यांचा टीएमसी कार्यकर्त्यांशी संघर्षही झाला.

त्यानंतर त्यांनी धरणे आंदोलन केले. पुढे बोलताना ते म्हणाले, "पोलिस टीएमसी कार्यकर्त्यांविरुद्ध गुंडगिरीचा वापर करत आहेत. आमच्या समर्थकांना मारहाण केली जात आहे." नौदा घटनेप्रकरणी पोलिसांनी एफआयआर दाखल केला असून दोन जणांना अटक केली आहे.

## सेलिब्रिटींचे मतदान!



## मुर्शिदाबादमध्ये देशी बॉम्ब हल्ल्यानंतर हुमायूं कबीर यांचे धरणे आंदोलन



पश्चिम बंगालमध्ये मतदानादरम्यान हिंसाचार-मारामारी



## संपादकीय

# नॉनस्टॉप ७० तास गेमिंग! खाणं, झोपणं तिथेच!

मोबाइल, व्हिडीओ गेम्सच्या वापरानं तरुणाईच्या मेंदूची कार्यक्षमता कमी होत असल्याचे निष्कर्ष अलीकडच्या काळात तज्ज्ञांनी जाहीर केले असले तरी त्याचा वापर अजूनही फारसा कमी झालेला नाही. जर्मनीतील लाइपझिग या शहरात तर गेमिंगचा सर्वांत मोठा महाकुंभ भरवला जातो. आताही तिथे नुकताच 'Caggtus 2026' हा गेमिंग फेस्टिव्हल भरवण्यात आला होता. या फेस्टिव्हलचं सर्वांत मोठं आकर्षण म्हणजे 'लॅन पार्टी' ! या पार्टीत अक्षरशः हजारो गेमर्स त्यांचे स्वतःचे संगणक घेऊन येतात आणि सलग ७० तास एकमेकांविरुद्ध गेम्स खेळतात. या इव्हेंटदरम्यान गेमर्स इथेच राहतात, इथेच खातात-पितात आणि झोपतातही. यावर्षी पहिल्यांदाच १८ वर्षांवरील वयोगटासाठी खास 'Lvl 18 एरिया' तयार करण्यात आला होता.

यंदाचा फेस्टिव्हल सुमारे ४०,००० चौरस मीटरमध्ये पसरलेल्या भव्य प्रांगणात आयोजित करण्यात आला होता. गेमिंग, तंत्रज्ञान आणि कम्युनिटीशी संबंधित २१०० गेमर्स आपल्या संगणक सेटअपसह येथे जमले होते. याशिवाय ५,००० चौरस मीटरमध्ये पसरलेल्या टेबलटॉप आणि कार्ड गेम्स झोनसोबतच कॉस प्ले स्पर्धा, अत्याधुनिक तंत्रज्ञान आणि फ्री-प्ले स्टेशननंही प्रेक्षकांना आकर्षित केलं. या संपूर्ण मनोरंजन क्षेत्रात १२ वर्षांवरील मुलं सहभागी होऊ शकतात, तर ७० तास चालणाऱ्या मुख्य लॅन पार्टीसाठी किमान वय १८ वर्षे निश्चित करण्यात आलं आहे.

अर्थात, या गेमिंग फेस्टिव्हलमध्ये सर्वच जण सलग ७० तास गेम खेळतात असं नाही. प्रत्येक जण आपापल्या क्षमतेप्रमाणे त्यात सहभागी होतो. काही जण २४ तास, काही जण सलग ४८ तास किंवा त्याहून जास्त काळ गेमिंगचा 'आनंद' लुटतात. सलग ७० तास गेम खेळणारेही काही जण येथे असतात.तरुणाईच्या दृष्टीनं इथलं वातावरणच इतकं उत्साही आणि गुंतवून ठेवणारं असतं की अनेक तरुण झोपेचा त्याग करून जास्तीत जास्त वेळ गेमिंग, स्पर्धा आणि मित्रांसोबत घालवतात. काही इव्हेंट्समध्ये सहभागींसाठी खास 'स्लिपिंग झोन्स' किंवा विश्रांती क्षेत्र ठेवली जातात. अनेक जण स्लिपिंग बॅग घेऊन येतात आणि थोड्या वेळासाठी तिथेच झोप घेतात, पुन्हा उठून गेममध्ये सहभागी होतात.

या महाकुंभाचं आणखी एक आकर्षण म्हणजे 'कम्युनिटी फील'. हजारो गेमर्स एकाच ठिकाणी




एकत्र येतात, रात्री उशिरापर्यंत चर्चा, स्पर्धा, आणि टीम गेम्स चालतात. त्यामुळे हा अनुभव फक्त गेम खेळण्यापुरता मर्यादित राहत नाही, तर तो एक सामाजिक, सांस्कृतिक आणि तांत्रिक उत्सव बनतो. डिजिटल एंटरटेन्मेंट, ई-स्पोर्ट्स, व्हर्च्युअल रिॲलिटी आणि नवीन तंत्रज्ञान यांचा संगम घडवणारा हा उत्सव अलीकडच्या काळात तरुणाईसाठी विशेष आकर्षण ठरतो आहे. त्यामुळेच गेमिंग हे केवळ मनोरंजन नसून एक करिअर, स्पर्धात्मक क्षेत्र आणि एका मोठा उद्योगाचा भाग असल्याचं अनेकांचं म्हणणं आहे. आंतरराष्ट्रीय स्तरावरील ई-स्पोर्ट्स स्पर्धा हादेखील या कार्यक्रमाचा मुख्य भाग असतो, ज्यामध्ये जगभरातील व्यावसायिक गेमर्स सहभागी होतात. व्हर्च्युअल रिॲलिटी (VR) आणि ऑगमेंटेड रिॲलिटीचा (AR) अनुभव तरुणांसाठी विशेष आकर्षण असतो, कारण येथे भविष्यकालीन गेमिंगचा प्रत्यक्ष अनुभव घेता येतो.

## गुरु वचन

### अशुभ झाले शुभ : आचार्य शिवेंद्र नागर

सद्‌पुरुषचे लक्षण काय? संसारासासाठी निरर्थक असलेल्या वस्तुंनी तो व्यक्ती संतुष्ट आहे. गल्लीतल्या कपड्याच्या तुकड्याने ज्याने शाल बनवली आहे, त्याचे मन, पाप-पुण्यापेक्षा मोठे आहे. असा योगी कधी बालकाप्रमाणे खेळतो तर कधी वेडा होतो. त्यास खेळताना पाहून तो वेडा झाला असे समजू नका. वेड्यासारखे समजा, बालकाप्रमाणे माना. त्याच्या शरीराला कमीत कमी वस्तूंची गरज आहे व त्यावर संतुष्ट आहे. आपण जितक्या जास्त वस्तूंवर अवलंबून आहोत, तितके जास्त दुःखी आहोत.

५० वर्षापूर्वी स्वयंपाक घर आजच्या इतकी संपन्न नव्हते. आज आपल्याकडे मिक्सर, गिझर, कुलर, कुकर, मायक्रोवेव्ह अवन आहे. वेळ सुद्धा आहे पण त्या वेळेची तरतूद कुठे होत आहे. जितके जास्त आपण वस्तुंवर अवलंबून राहू, तितके आपले दुःख वाढते. जर अमेरिकेत कोक बंद झाले तर लोक तो धक्का कसे सहन करतील. जर भारतात चहावर बंदी लावण्यात आली तर काय होईल!

शब्द -विषय अर्थात् यरू विश इति। जे विष आहे, ते नियंत्रित केले पाहिजे. तुम्ही एखादे औषध घेता तेव्हा त्यावर लिहिले असते की 'पॉयझन' म्हणजे काय? जर याचा दुरुपयोग केला म्हणजे जास्त मात्रात घेतले तर तुम्ही दगावू शकतात. ज्या माणसाच्या गरजा कमी आहेत, ज्याचे शरीर योगात आहे, तो यामुळे जास्त प्रभावित होणार नाही. तो पाप-पुण्य, शुभ-अशुभ विचारातून मुक्त आहे. आपल्या डोक्यात शुभ-अशुभ फिट झाले आहे. दक्षिण भारतात डोक्यावर पदर घेणे अशुभ मानले जाते, उत्तर भारतात डोक्यावर पदर घेणे शुभ मानले जाते. पंजाबमध्ये उडीद दाळ शुभ प्रसंगी खाल्ली जाते व उत्तर प्रदेशात उडीद दाळ मृत्यू प्रसंगी खाल्ली जाते. उडीद दाळ एका ठिकाणी शुभ तर इतर ठिकाणी अशुभ आहे. एका ठिकाणी डोक्यावर पदर घेणे शुभ आहे तर दुसऱ्या ठिकाणी अशुभ.

५० वर्षापूर्वी मुलींचे नोकरी करणे अशुभ होते, ते आज शुभ झाले. विदुर नीतित दूध विकणे आई विकण्यासारखे आहे. काळ बदलला. दुध विकणे वाईट पण विना नफा-तोटा तत्वावर विकणे योग्य आहे. काळ आणखी बदलला. दूध विकणे योग्य आहे त्यात थोडा नफा झाला तर चालते पण कमीत कमी पाणी टाकून विकावे. आज तर दुध विकणे, नफा कमावणे, पाणी टाकणे सुद्धा योग्य पण स्वच्छ पाणी टाकून तरी विका.

काही काळापूर्वी जी गोष्ट शुभ होती ती आज अशुभ होऊ शकते. काही काळापूर्वी जे अशुभ होते ते आज शुभ असू शकते. पाप-पुण्याच्या फेऱ्यातून संत वर आले आहेत. गीतेत वारंवार येते की, दोन्ही सैन्यांमध्ये कौरव नकारात्मक, पांडव सकारात्मक दिसतात. ज्ञानी चांगल्या-वाईटातून वर येतो. असा माणूस संसारात बालकाप्रमाणे आहे.

मुलांना येणाऱ्या काळाची चिंता किंवा गतकाळाचे दुःख नाही. ज्ञानी व्यक्ती मुलाप्रमाणे आहे. मुलं नेहमी वर्तमानात राहतात. शंकराचार्य म्हणतात की, ज्ञानी व्यक्ती वेड्याप्रमाणे असतो. तो ज्या पातळीवर आहे, ते आपणास समजू शकत नाही. त्याच्यासाठी कुणी आपले किंवा त्रयस्त नाही. ज्या शरीराच्या गरजा कमी आहेत, जे पाप-पुण्यापेक्षा वर आहेत, ते लोक वेड्याप्रमाणे आहेत, ते बालकाप्रमाणे आहेत.

## संस्कृत सुभाषित


कारे नाठविशी कृपाळू देवासी । पोशितो जगासी एकलाचि।।

अर्थ - संकुचित बुद्धी व स्वार्थ माणसाला खरे देत नाही. उदार मन आणि त्या दुसऱ्यासाठी काही करणे, झिजणे हाच आपल्या संस्कृतीचा स्थायीभाव आहे.

## पंचांग

पंचांग
२४ एप्रिल २०२६
शुक्रवार
विक्रम संवत्- २०८२
वैशाखशके संवत्- १९४८
संवत्सर - पराभवनाम
अयन- उत्तरायणारंभ
मास- वैशाख
ऋतु- सौर वसंत
शुक्ल पक्ष
तिथि:अष्टमी १९:२२:००
नक्षत्र:पुष्य २०:१४:०८
योग:शूल २५:२३:५४+
करण:विष्टि ०८:०१:३०
करण:बव १९:२२:००
सूर्य:मेष
चन्द्र:कर्क
हिजरी सन् - १४४६

मुस्लिम मास - जिल्काद
तारीख - ६
विशेष
दुगाष्टमी



शंकर महाराज पुण्यतिथी - धनकवडी (पुणे)
हंसराजस्वामी पुण्यतिथी - परांडा (धाराशिव)

## दै. 'संध्या' धमाल सूडोकु क्र. १२८

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | 6 | 8 | 3 | 7 | | | 1 |
| | | 4 | | 9 | 2 | 8 | | 5 |
| | | | 4 | | | | 2 | |
| | | 1 | | 5 | 3 | 9 | | |
| | 6 | 3 | | | | 2 | 4 | |
| | | 9 | 2 | 6 | | 5 | | |
| | 7 | | | | 6 | | | |
| 6 | | 8 | 5 | 4 | | 7 | | |
| 3 | | | 1 | 7 | 8 | 6 | | |

### : सूडोकु :

खेळाचे नियम : प्रत्येक उभी लाइन, आडवी लाइन आणि ३-३ च्या वर्गात १ ते ९ पर्यंतची संख्या भरा. परंतु ही अट आहे की, नंबरची पुनरावृत्ति कोणत्याही उभ्या किंवा आडव्या लाइन आणि चौकानात आली नाही पाहिजे. प्रत्येक कोडयाचे केवळ एकच उत्तर आहे.या कोडयाला भरण्यासाठी आपण पेन्सिलचा आणि खोड रबराचा उपयोग केला तर ते आपल्यासाठी अधिक सुविधा जनक होईल.

- उत्तर उद्याच्या अंकात

### सूडोकु क्र. १२७ चे उत्तर

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 8 | 7 | 6 | 9 | 3 | 1 | 4 | 2 | 5 |
| 9 | 2 | 5 | 8 | 7 | 4 | 3 | 1 | 6 |
| 1 | 4 | 3 | 2 | 6 | 5 | 9 | 7 | 8 |
| 6 | 8 | 1 | 7 | 4 | 9 | 5 | 3 | 2 |
| 5 | 9 | 7 | 6 | 2 | 3 | 1 | 8 | 4 |
| 2 | 3 | 4 | 5 | 1 | 8 | 6 | 9 | 7 |
| 7 | 1 | 2 | 3 | 5 | 6 | 8 | 4 | 9 |
| 3 | 6 | 8 | 4 | 9 | 2 | 7 | 5 | 1 |
| 4 | 5 | 9 | 1 | 8 | 7 | 2 | 6 | 3 |

## इतिहासात आजचा दिवस

### आंतरराष्ट्रीय

- १८०० - लायब्ररी ऑफ काँग्रेसची स्थापना.
- १८६३ - कीझव्हिलची कत्तल - कॅलिफोर्नियातील कीझव्हिल येथे ५३ स्थानिक अमेरिकन व्यक्तिंची हत्त्या.
- १९१५ - आर्मे नियन वंशहत्त्या - कॉन्स्टेन्टिनोपलमध्ये सुरु झालेली आर्मेनियन वंशीय व्यक्तिंचे हत्त्याकंड नंतर ओट्टोमन साम्राज्यभर पसरले.

### राष्ट्रीय

- १९६० - पं. नेहरू आणि चिनी पंतप्रधान चौ एन लाय यांच्या वाटाघाटी सुरू.
- २००७ - कोट्यावधी रुपयांच्या बनावट मुद्रांक घोटाळयाचा सूत्रधार अब्दुल करीम तेलगी आणि त्याच्या चार सहकार्यांना सीबीआयच्या विशेष न्यायालयाने १५ वर्षांच्या कैदेची शिक्षा सुनावली.

### जन्म

- १८८९ - सर स्टॅफर्ड क्रिप्स, ब्रिटीश राजकारणी; क्रिप्स मिशनचा नेत्याचा जन्म.
- १८९६ - कादंबरीकार र. वा. दिघे यांचा जन्म.
- १८९७ - मनुएल अव्हिला कामाचो, मेक्सिकोचा राष्ट्राध्यक्षांचा जन्म.
- १९०४ - 'नाट्यमन्वतर'चे संस्थापक के. नारायण काळे यांचा जन्म.

### निधन

- १९४२ - मा. दीनानाथ मंगेशकर यांचे निधन.
- १९७२ - चित्रकार यामिनी रॉय यांचे निधन.
- १९७४ - कवी रामधारीसिंह 'दिनकर' यांचे निधन.
- १९९४ - उद्योगमहर्षी शंतनुराव किर्लो स्कर यांचे निधन.
- २००५ - एझेर वाइझमन, इस्त्राईलचा पंतप्रधान यांचे निधन.
- २००८ - हॉकी ऑलिम्पीयन त्रिलोचनसिंह बावा यांचे निधन.

## : SMS :

Hai tu agar
mera dilbar,
Hai tu agar
mera dilbar,
To aaj ke lunch
ka bill tu bhar.

## हवामानाचा अंदाज

| | | |
|---|---|---|
| औरंगाबाद | ३६.६ | २६.३ |
| अहमदनगर | ३६.६ | २६.४ |
| अकोला | ४०.२ | २८.३ |
| अमरावती | ३९ | २८.८ |
| बीड | ४१.४ | ३१.९ |
| भंडारा | ४०.८ | ३०.१ |
| बुलढाणा | ३८.३ | २१.४ |
| चंद्रपूर | ४१.७ | ३२ |
| चेन्नई | ४३ | २७.४ |
| नवी दिल्ली | ३७.८ | २४.२ |
| धुळे | ३७.४ | २५.६ |
| गोंदिया | ३९.३ | २९ |
| जळगाव | ४० | २७.९ |
| कोल्हापूर | ३६.७ | २४.१ |
| लातूर | ३६.९ | २५.५ |
| मुंबई | ३९.३ | ३०.८ |
| नागपूर | ३९.६ | २८.६ |
| नांदेड | ३९.९ | २८.९ |
| नंदूरबार | ३७.१ | २६ |
| नाशिक | ३६.३ | २४.६ |
| पुणे | ३४.८ | २४.९ |
| पंढरपूर | ३७.९ | २६.१ |
| सातारा | ३६.४ | २३.३ |
| सांगली | ३८.२ | २५.१ |
| सोलापूर | ३८.५ | २६.२ |
| वर्धा | ४०.३ | ३०.६ |

## आजचे राशिभविष्य

**मेष :** शुभ रंग:हिरवा, शुभ दिशा:दक्षिण कामामध्ये यश न मिळाल्याने निराशा येईल. मदतीची अपेक्षा करू नका.

**तुळ :** शुभ रंग:काळा, शुभ दिशा:पूर्व मान सन्मान वाढणार आहे. कार्यात येणारे विघ्न दूर होतील.

**वृषभ :** शुभ रंग:लाल,शुभ दिशा:उत्तर शुभ कार्याला सुरूवात करण्याचे योग आहेत. मनस्थिती चंचल होऊ देऊ नका.

**वृश्चिक :** शुभ रंग:गुलाबी, शुभ दिशा: उत्तर फायदेशीर प्रेरणा मिळणार आहे. शुभ कार्यात सामील होण्याचा योग आहे. आर्थिक खर्च वाढणार आहे.

**मिथुन :** शुभ रंग: पांढरा, शुभ दिशा: पूर्व महत्वाची कामे पूर्ण करण्याचा प्रयत्न करा. एकद्या व्यक्तीच्या सहवासामुळे जीवनात बदल घडून येईल.

**धनु :** शुभ रंग:पिवळा,शुभ दिशा:दक्षिण शुभ बातम्या कळाल्यामुळे दिवस चांगला जाईल. राजकारणापासून दूर रहा.

**कर्क :** शुभ रंग:पिवळा, शुभ दिशा:दक्षिण समाजात आपल्या कामाची स्तुती होईल. धार्मिक कामाकडील ओढा वाढेल. ओळखीचा फायदा होईल.

**मकर :** शुभ रंग:केसरी, शुभ दिशा:उत्तर आपण केलेल्या कार्यामुळे स्वतःला फायदा होईलच त्या बरोबर समाजाचा देखील फायदा होईल.


**सिंह :** शुभ रंग:गुलाबी, शुभ दिशा:उत्तर मित्रांच्या सहकार्याने फायदा होईल. स्थावर प्रकरणाचा निकाल आपल्या बाजूने राहील.

**कुंभ :** शुभ रंग: निळा, शुभ दिशा:पूर्व सामान्य स्तरावरचे कामे होतील. योजना सफल राहतील. समाजात यश आणि प्रतिष्ठा वाढेल.

**कन्या :** शुभ रंग:केसरी, शुभ दिशा: उत्तर अचानक यश मिळाल्याने मन प्रसन्न राही. कौटुंबिक समस्या हल होतील.

**मीन :** शुभ रंग:पिवळा, शुभ दिशा:पूर्व कामामध्ये यश न आल्यामुळे आपल्याला चिंता सतावेल. भाऊ, मित्र यांच्या बोलण्यामुळे मन दुखावेल.

## 'दै. संध्या' जम्बो शब्दकोडे क्र. १२८



### आडवे शब्द

१. परत परत
३. सतत पक्ष बदलणारे पुढारी
८. पातळ खांब
१०. चांदणी, ११. सुसर
१२. अफवा
१३. छोटी ताटली
१६. शुभ्र, पांढरा
१७. मनातील ओळखणारा
१८. अभिनेता
१९. कागदावरील स्तंभ
२१. --- जाधव- पहिला भारतीय ऑलिंपिक कुस्तीपटू
२३. प्रहार
२५. क्षणात संपणारे
२९. जय-पराजय
३१. चालू वा गत काळ
३२. गुलाम
३३. समतल
३५. सौंदर्यवान
३८. --- युनूस, वसिम अक्रमचा जोडीदार पाकिस्तानी गोलंदाज
४०. घाईघाईने
४२. करुणा, कीव
४४. परीक्षा रत्नाची इ.
४६. फुरसत
४७. धोबी
४९. संघाचा प्रमुख
५०. वाघाची मावशी
५२. घर
५४. एक सोडून एक
५५. एक रंगीत कंदमूळ
५६. वेल
५८. बाराचा समूह (इंग्रजी)
५९. नकला करणारा
६१. पद्धत
६२. बोबडी वळणे
६३. दुर्बोध, कर्नाटकी
६५. गोडी, आवड
६७. तलवार
७०. वैमानिक
७३. पुरुष व स्त्री
७५. मनाचा ओढा
७६. कूस (हिंदी)
७८. बदलणे
७९. जमीनदोस्त
८१. एक मंगल वाद्य
८२. मोठ्या फुगीर शेपटीचा छोटा प्राणी
८३. खर्चात कपात

### उभे शब्द

१. प्राचीन
२. तुकारामांना सदेह वैंकुंठाला नेणारे विमान
३. प्रार्थना
४. वनवास भोगणारे दोन दशरथपुत्र
५. नंतर, ६. उष्ण
७. राजाची मुलगी
८. संधी
९. शिर्डीचे संत
१२. अंदाज, कयास
१४. कसा, चंची
१५. कोवळा अंकुर
२०. चिंता
२२. ऐटबाज
२४. विहिरीतून पाणी काढण्याचे जोडसाधन, तोच तो दिनक्रम
२६. तोडणे-मोडणे
२७. दुलई
२८. ताब्यात ठेवता न येणारे
३०. झाड
३४. पदर
३६. बिल्ला
३७. व्यर्थ
३९. काखेत होणारा गळू
४१. थंड
४३. रंग
४४. झाडाभोवतीचा कट्टा
४५. पुष्कळ
४६. सूट
४८. जन्म
४९. टाळ्यांचा आवाज
५१. अटीची भाषा
५३. गिळंकृत करणे, जबरदस्तीने बळकावणे
५४. चेहरा
५७. घाई, त्वरा
६०. पूर्ण बदल
६३. आजच्या आधीचा दिवस
६४. चिवचिवाट
६६. उंचसखल नसलेले
६८. विष्णुपत्नी
६९. चामड्याचा दोर
७१. टिंगल
७२. इलाज
७३. नटणारा
७४. मोठी बहीण
७५. खबदाड
७७. वर्ष (ग्रामीण)
७९. कोंभाची लवलव हिचे मार्दव सांगते!
८०. जिवलग मित्र


### जम्बो शब्दकोडे क्र. १२७ चे उत्तर

आडवे उत्तर : १.वेतन ४.सुधा ५.सांदिपनी ९.उरका ११.गरजवंत १३.रडारड १५.फक्त १६.राजसूय १९.हावरा २२.गर्क २३.गमन २४.थारा २६.वाळीत टाकणे २८.काडी २९.तारा ३१.धाकटा ३३.वश ३४.फुकट ३६.जाऊ ३९.गोडी ४०.कलंदर ४२.सम ४४.वरकड ४७.उष्ण ४८.केर ५०.दर्या ५१.दल ५२.भूत ५३.गोची ५४.प्रचलित ५७.हवि ५९.लग्न ६०.पार्वती ६१.धमनी ६२.कालिका ६३.सर्व ६४.कपि ६६.चरक ६७.सार ६९.तीज ७१.ठाम ७३.ताठा ७४.काणा ७५.अवस ७७.लढा ७८.दमा ७९.आम्र ८१.धडधडीत ८२.वन ८३.राम ८४.तपास ८५.रबडी ८६.साखरपुडा ८८.स्त्री ८९.तृण ९०.लक्तरे ९१.खासदार

उभे उत्तर : १.वेगवेगळी २.तर ३.नजर ४.सुतराम ६.दीर ७.पडाव ८.नीर ९.उफराटा १०.रक्त १२.आसू १४.डहाळी १७.जनता १८.यथा २०.वतन २१.गणेश २३.गडी २५.राधा २६.वाटा २७.कवडी २८.काटक ३०.राजा ३२.कर्ण ३५.उदर ३७.ऊस ३८.शरद ३९.गोड ४१.लंकेची पार्वती ४३.मदत ४५.कलह ४६.हातच्या काकणाला ४९.कच ५४.प्रतीक ५५.लिपी ५६.धमक ५८.विकार ६१.धरती ६५.पिठा ६७.साठा ६८.सवड ७०.जलतरण ७२.मदन ७३.ताम्र ७५.अधर ७६.सधन ७९.आमरस ८०.वपा ८२.वडील ८३.राख ८४.तडाखा ८६.सारे ८७.पौर

RNI No. 1663/1957 (DAILY SANDHYA) |
दैनिक संध्या पब्लिकेशन्स प्रा. लि. यांच्या मालकीचे हे दैनिक मुद्रक व प्रकाशक ज्योती नाळे यांनी सामना प्रेस (प्रबोधन प्रकाशन) सिंहगड रोड, वडगांव खुर्द पुणे-४११०४१ येथे छापून, १०३८ आकार भवन, दुसरा मजला, टिळक रोड, पुणे - ४११००२ येथे प्रसिद्ध केले.
संपादिका : ज्योती नाळे (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) (फोन : ०२०-२४४७९२९२)
Daily "Sandhya" News paper is owned by Dainik Sandhya Publications Pvt. Ltd. Printed & Published by Jyoti Nale, Printed at Saamana Press (Prabodhan Prakashan) Pvt. Ltd. Sihagad Road, Vadgaon Khurd, Pune 411 041, published at 1038, Aakar Bhavan, Tilak Road, Pune 411002. Editor - Jyoti Nale.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### पुण्यातील श्री सद्गुरु शंकर महाराज भक्तांचे पहिले अन्नछत्र; धनकवडीत आरोग्य शिबिर

पुणे (दैनिक संध्या) : पुणे धनकवडीतील श्री सद्गुरू शंकर महाराज भक्तांचे पहिले अन्नछत्र समिती ट्रस्टच्या वतीने महाष्टमी निमित्त एक विशेष सामाजिक उपक्रम राबविण्यात येत आहे. शुक्रवार, २४ एप्रिल २०२६ रोजी श्रींच्या ७१ व्या समाधी दिनानिमित्त भव्य मोफत आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती अध्यक्ष राजाभाऊ रेवडे,डॉ.दिनेश रंगरेज यांनी दिली. हे शिबिर सायंकाळी ५ ते ९ या वेळेत उत्सव मंडप, धनकवडी पुणे येथील श्रींच्या मठाजवळ, ईशान्य सोसायटी समोर येथे पार पडणार आहे. या शिबिरामध्ये सर्व गरजू रुग्णांना मोफत वैद्यकीय सेवा उपलब्ध करून दिली जाणार असून, नागरिकांनी मोठ्या संख्येने लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.या उपक्रमाचे संयोजन डॉ. दिनेश सूर्यकांत रेंगोज व त्यांच्या डॉक्टर्स टीमकडून करण्यात आले असून, विविध रुग्णालये व संस्थांचे सहकार्य यात लाभले आहे. समाजहिताच्या दृष्टीने आयोजित या उपक्रमामुळे परिसरात समाधानाचे वातावरण निर्माण झाले असून, भक्त व नागरिकांकडून या सेवाभावी कार्याचे कौतुक होत आहे.



### पुण्याच्या धनकवडीत जीवघेणे खड्डे; अपघाताची वाट पाहतेय का महापालिका ?

पुणे (दैनिक संध्या) :पुण्याच्या धनकवडी परिसरातील के.के. मार्केट समोर ओढ्यालगत, पानपट्टीसमोर आणि महादेव मंदिराच्या बाजूला पावसामुळे तब्बल आठ ते दहा फूट खोल खड्डा पडला असूनही अद्याप प्रशासनाकडून कोणतीही दखल घेण्यात आलेली नाही. या खड्ड्यालागतच असलेल्या पाण्याच्या पाईपलाईनला त्याच खड्ड्या नजीक गळती लागली पाणी सतत वाहत असल्याने परिस्थिति आणखी गंभीर बनली आहे.या खड्ड्यांवर तात्पुरती मलमपट्टी न करता नागरिकांची,वाहनांची सुरक्षितता लक्षात घेत कायमस्वरूपी उपाययोजना करण्याची गरज जेष्ठ नागरिकांतून व्यक्त होत आहे.दरम्यान या खड्ड्याचा अंदाज न आल्याने अनेक दुचाकीस्वार या खड्ड्यात पडून जखमी झाल्याच्या घटना देखील घडल्याची माहिती स्थानिक नागरिकांनी दिली. स्थानिक नागरिकांच्या मते,आणखी एक जोरदार पाऊस झाला तर हा खड्डा अधिक मोठा होण्याची शक्यता असून परिसरातील नागरिकांच्या जीविताला धोका निर्माण झाला आहे. एवढेच नव्हे तर पुण्याई नगर परिसरातही मोठ्या प्रमाणात खड्डे पडले असून, रुबी बेकरीसमोर देखील सुमारे दहा फूट खोल खड्डा निर्माण झाला आहे. या संदर्भात अनेकदा बातम्या प्रसिद्ध होऊनही अद्याप कोणतीही ठोस कार्यवाही करण्यात आलेली नाही. विशेष म्हणजे संबंधित खड्ड्यांच्या नजीकच ओढा वाहत असल्याची माहिती स्थानिकांनी दिली असून जमिनीची धूप वाढत असून, कोणत्याही क्षणी मोठा अपघात होण्याची भीती व्यक्त केली जात आहे."एखादी मोठी दुर्घटना घडल्यावरच महापालिका जागी होणार का?" असा संतप्त सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे. दरम्यान, ज्येष्ठ समाजसेविका वर्षाताई नाईक यांनी या प्रश्नाची गंभीर दखल घेत प्रशासनाला तातडीने उपाययोजना करण्याचे आवाहन केले आहे. नागरिकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने या धोकादायक खड्ड्यांची त्वरित दुरुस्ती करावी, अन्यथा मोठी दुर्घटना टाळता येणार नाही, असा इशाराही त्यांनी दिला आहे.

### महापौर बंगल्यातील 19 वृक्षांची कत्तल; वृक्ष संवर्धन विभागाचा धक्कादायक कारभार

पुणे (दैनिक संध्या) : सर्व जगभर वसुंधरा दिन साजरा होत असतानाच चक्क महापौरांच्या बंगल्यातच तब्बल 19 वेगवेगळ्या प्रकारच्या वृक्षांची कत्तल करण्यात आली असल्याचा प्रकार समोर आला आहे. धक्कादायक म्हणजे, महापालिकेच्या वृक्ष संवर्धन विभागानेच या वृक्षांच्या छाटणीचा प्रस्ताव मंजुरीसाठी ठेवला होता. त्यासाठी महापौर बंगल्यातील संभाव्य धोका टाळण्यासाठी या वृक्षांच्या फांद्या तोडण्याचे कारण देण्यात आले आहे. महापालिकेच्या वृक्ष संवर्धन विभागाचे हॉर्टिकल्चर मिस्त्री रवींद्र कांबळे यांनी दि. 12 मार्चला घोले रस्त्यावरील महापौर बंगल्यातील वेगवेगळ्या प्रकारच्या 19 वृक्षांच्या फांद्या छाटणीचा प्रस्ताव शिवाजीनगर- घोले रोड क्षेत्रीय कार्यालयाच्या सहायक आयुक्तांकडे मंजुरीसाठी ठेवला होता. त्यावर सहायक आयुक्तांनी लगेचच तत्परता दाखवून दि.13 मार्चला हा प्रस्ताव मंजूर करून त्यावर कार्यवाही करण्याचे आदेश दिले. त्यानुसार वृक्ष संवर्धन विभागाने दोन दिवसांपूर्वी फांद्या छाटणीच्या नावाखाली 19 वृक्षांची अक्षरशः कत्तल करण्याचे काम केले आहे. यासंदर्भात वृक्षप्रेमी समीर निकम यांनी आयुक्त नवल किशोर राम यांना दिलेल्या निवेदनात जागतिक वसुंधरा दिनाच्या दिवशीच शहराच्या प्रथम नागरिकांच्या बंगल्यातील वृक्षतोडीचे प्रकरण समोर आले आहे. यातून पर्यावरण निगडीत खात्यामधील अधिकारी किती जागरूक आहेत हे समोर आले आहे. संबंधित अधिकाऱ्यांनी त्यांच्या अधिकारांचा गैरवापर केला असून, त्यांच्यावर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी केली आहे. ज्यांच्यावर वृक्ष संवर्धनाची जबाबदारी आहे, त्याच हॉर्टिकल्चर मिस्त्रीने स्वतःच वृक्ष छाटणीसाठी अर्ज केला व तो स्वतःच मंजूर केल्याचा आरोप सामाजिक कार्यकर्ते रुपेश केसेकर यांनी केला आहे.

### सौ. दिपाताई रमेश पटवर्धन यांचे निधन

पुणे (दैनिक संध्या) : महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस सेवादल आणि पुणे शहर काँग्रेस सेवादल संघटक सौ. दिपाताई पटवर्धन यांचे अल्पशा आजाराने दि. २०/४/२०२६ रोजी दुःखद निधन झाले. पुण्यातील मंगळवारपेठ कमलानेहरु हॉस्पिटल जवळ चे प्रभागात त्यांनी प्रदीर्घ काळ काँग्रेस कार्यकर्त्या म्हणून उत्तम कार्य केले. अनेक ज्येष्ठ काँग्रेस नेत्यांचे समवेत प्रशिक्षण, अधिवेशन, आंदोलने यात त्या सक्रिय होत्या. अतिशय शांत आणि मनमिळाऊ म्हणून महिला कार्यकर्त्यांमध्ये त्या लोकप्रिय होत्या. त्याचे मागे पती, दोन मुले सुना नातवंडे असा परिवार आहे. पुणे शहर काँग्रेस सेवादलाचे वतीने त्यांना काल अखेरची मानवंदना देण्यात आली.

# नियम धाब्यावर बसवून वृक्षांची 'मूक हत्या'

**पुणे (दै. संध्या)**

**वृक्षारोपण केलेले 17,000 वृक्ष 'बेपत्ता'!**

रस्ते विकास आणि सौंदर्यीकरणाच्या नावाखाली प्रशासनाकडूनच शहरांचे 'फुफ्फुस' असलेल्या वृक्षांचा गळा घोटला जात असल्याचे भीषण वास्तव 'सुराज्य अभियाना'च्या राज्यव्यापी पाहणीत समोर आले आहे. मुंबई महानगरपालिकेने 1 एप्रिल 2026 पासून 'वृक्ष संजीवनी' अभियान सुरू करून झाडांभोवतीचे काँक्रीट काढण्याचा उपक्रम हाती घेतला असला, तरी सुराज्य अभियानाने अशा मोहिमेच्या मूळ हेतूवरच गंभीर प्रश्न उपस्थित केले आहेत. "झाडांभोवतीचे काँक्रीट काढणे हा केवळ एक महिन्याचा 'इव्हेंट' सारखी अशी मोहीम राबवण्याची वेळच का येते? रस्ते बांधताना 'नॅशनल ग्रीन ट्रिब्युनल'च्या आदेशांचे सरळसरळ उल्लंघन करून झाडांच्या बुंध्यापर्यंत काँक्रीट ओतले जाते या बाबी गंभीर आहेत.'काँक्रीट काढा' अभियान राबवण्याऐवजी, हे उल्लंघन करणाऱ्या दोषींवर NGT Act 2010 च्या कलम 26 अन्वये 'फौजदारी कारवाई' करण्याचे अभियान का नाही ?, असा रोखठोक प्रश्न 'सुराज्य अभियाना'चे पुणे जिल्हा समन्वयक श्री. पराग गोखले यांनी पुणे येथे झालेल्या पत्रकार परिषदेत उपस्थित केला. या वेळी अधिवक्ता श्री. दत्तात्रय देवळे तसेच पुणे सुराज्य अभियान चे श्री. सुरेंद्र महाजन यावेळी उपस्थित होते.

यावेळी सुराज्य अभियानचे श्री.सुरेंद्र महाजन यांनी सुराज्य अभियान चे माध्यमातून मागील नऊ वर्षात राज्यभर राबविण्यात येणाऱ्या मोहिमा,सुराज्य अभियानाला येणारे यश आणि वाढता सहभाग या विषयी सविस्तर माहिती दिली.

'सुराज्य अभियाना'ने महाराष्ट्रातील पुणे, मुंबई, नागपूर, नाशिक, सोलापूर, सांगली, सातारा, कोल्हापूर, जळगाव सह कर्नाटकच्या हुबळी-कारवार भागात केलेल्या पाहणीत वृक्षांची स्थिती अत्यंत दयनीय असल्याचे लक्षात आले. पुणे महानगरपालिकेने गेल्या दोन वर्षांतील 17,533 झाडांच्या सद्यस्थितीबाबत (Survival Data) कोणताही अधिकृत डेटा उपलब्ध नसल्याची माहिती द्वारे कबुली दिली आहे. वृक्ष संवर्धन असो किंवा नवीन वृक्षारोपण, प्रशासनाने पर्यावरणाची क्रूर थट्टा चालवली असून, 17 हजार झाडांचा हिशोब नसणे, हा जनतेच्या कोट्यवधी रुपयांचा थेट अपहार आहे, असेही श्री.पराग गोखले यांनी नमूद केले. शास्त्रीय दृष्ट्या पहाता झाडांभोवतीच्या काँक्रीटमुळे भूगर्भातील जलपुनर्भरणाची प्रक्रिया खंडित झाली असून शहरांमधील वाढत्या उष्णतेला (Urban Heat Island Effect) प्रशासनच सर्वस्वी जबाबदार असल्याचा आरोपही यावेळी करण्यात आला.




माननीय 'नॅशनल ग्रीन ट्रिब्युनल'च्या आदेशानुसार, नागरी भागात वृक्षांभोवती किमान 1 मीटर जागा कच्ची ठेवणे सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांवर बंधनकारक आहे. झाडांवर खिळे ठोकून जाहिराती / फलक लावून त्यांचे विदरूपीकरण करणे आणि परिणामी त्याला इजा पोचवणे, हे सुद्धा बेकायदेशीर आहे. असे असतानाही, केवळ 'इव्हेंट' म्हणून महिनाभर अभियान राबवून प्रशासन आपल्या जबाबदारीतून मुक्त होऊ शकत नाही. मुळात रस्ते किंवा फूटपाथचे काम सुरू असतानाच नियमांचे पालन का केले जात नाही? झाडांना इजा पोहोचवणे हा 'महाराष्ट्र झाडांचे संरक्षण व जतन अधिनियम 1975' नुसार दंडनीय अपराध असताना, प्रशासनाने हे उल्लंघन करणाऱ्या कंत्राटदारांची आणि जबाबदार अधिकाऱ्यांची नावे जाहीर करून त्यांना जबाबदार का धरत नाही?, असा सवाल अधिवक्ता श्री.दत्तात्रय देवळे यांनी'सुराज्य अभियाना'चे माध्यमातून उपस्थित केला आहे.

झाडांच्या या गंभीर स्थितीवर त्वरित कार्यवाही व्हावी तसेच दिल्ली प्रमाणे SOP ही तयार करावी, सर्व शहरात तातडीने कायमस्वरूपी 'डी-काँक्रीटीकरण' मोहीम राबवावी, सध्या गळा आवळलेल्या झाडांना तर मोकळे करावे, नवीन रस्ते आणि फूटपाथच्या निविदांमध्ये झाडांभोवती 1 मीटर जागा सोडल्याशिवाय कंत्राटदारांची देयके मंजूर केली जाणार नाहीत, अशी अट 'कार्यदेशात' समाविष्ट करावी,तसेच, गेल्या 3 वर्षांतील वृक्षारोपणाचे 'थर्ड पार्टी ऑडिट' करून वास्तव आकडेवारी ही सार्वजनिक करावी अशा मागण्याही यावेळी करण्यात आल्या आहेत.

येत्या 7 कामकाजाच्या दिवसांत प्रशासनाने ठोस कृती केली नाही, तर मात्र 'सुराज्य अभियाना'च्या वतीने NGT Act 2010 च्या कलम 26 अन्वये फौजदारी तक्रार आणि माननीय 'नॅशनल ग्रीन ट्रिब्युनल कडे 'अवमान याचिका' दाखल करू, असा इशाराही यावेळी देण्यात आला.

# महिला आरक्षण बिल त्वरीत लागू करा

**पुणे (दै. संध्या)**

**स्वाती शिंदे, अध्यक्ष पुणे शहर महिला काँग्रेस**

भारतीय जनता पक्षाने खोटा प्रचार बंद करून संसदेने २०२३ साली मंजूर केलेल्या महिला आरक्षण विधेयकाची त्वरीत अंमलबजावणी करावी, अशी मागणी पुणे शहर महिला काँग्रेसच्या अध्यक्षा स्वाती शिंदे यांनी आज बुधवारी केली .

पुणे शहर महिला काँग्रेसच्या वतीने बालगंधर्व रंगमंदिराजवळील झाशीची राणी लक्ष्मीबाई चौकात स्वाती शिंदे यांच्या नेतृत्वाखाली हे आंदोलन करण्यात आले. भाजप हटाओ, महिला आरक्षण बचाओ., आरक्षणावर घाला घालणाऱ्या भाजप सरकारचा निषेध असो., महिला आरक्षण लागू करा, नाहीतर खुर्चा खाली करा'., आरक्षण आमच्या हक्काचं, नाही कोणाच्या बापाचे., आदी घोषणांचे फलक महिला




आंदोलकांनी हातात घेतले होते.

महिला आरक्षणाचे श्रेय उपटण्याचा मोदी सरकारचा खटाटोप केविलवाणा आहे. महाराष्ट्रात महिलांना आरक्षण देण्याचा निर्णय काँग्रेस पक्षाने यापूर्वीच घेतला असून महापालिका, जिल्हा परिषदा, सहकारी संस्थांमध्ये त्याची अंमलबजावणीही झाली आहे. त्यामुळे भाजपच्या नेत्यांनी जनतेची दिशाभूल करत फिरू नये, अशा शब्दांत स्वाती शिंदे यांनी भाजप नेत्यांना खडसावले.

या आंदोलनात नगरसेविका अश्विनी लांडगे, अनिता मकवाना, प्राजक्ता जाधव, प्रियांका रणपिसे, अंजली सोलापुरे, नयना सोनार, रेखा जैन, अॅड.अंजली देसाई, कनहर आदरखान, अॅड.राजश्री दामले-चव्हाण, मनोरमा चौधरी, कल्पना शिंदे, ज्योती अडागळे, मनिषा धेंडे, ऋग्वेदी सपकाळ, सुमन हरिश्चंद्र सूर्यवंशी, पूजा सपकाळ, सुरेखा मारणे, पौर्णिमा नाईकमोडे आदी पदाधिकारी आणि कार्यकर्त्या सहभागी झाल्या होत्या.

## पाण्याच्या तीन टाक्यांना 'खो' बसणार नाही, याची काळजी घ्या!

**पुणे (दै. संध्या)**

टँकर अपघाताचे वाढते प्रमाण आणि दररोजची होणारी वाहतूक कोंडी, यावर उपाययोजना म्हणून महापालिका प्रशासन पाणीटंचाई असणाऱ्या भागात पाण्याच्या तीन टाक्या बांधणार आहे.

या योग्य ठिकाणी बांधण्यात याव्यात. अन्यथा, व्यवसाय संपेल किंवा डुबेल, या भीतीपोटी या टाक्यांना 'खो'सुद्धा बसू शकतो. कारण, काही प्रतिनिधी व राजकीय, सामाजिक क्षेत्रात काम करणाऱ्या लोकांचा पाणी टँकर व्यवसाय आहे, अशी भीती नागरिक व्यक्त करत आहेत. निष्पाप लोकांचे बळी परत जाणार नाहीत, यासाठी नियमांचे काटेकोर पालन करत पालिका प्रशासनाने पाण्याच्या टाक्या बांधाव्यात, अशी अपेक्षा स्थानिक नागरिक व्यक्त करत आहेत.

दक्षिण पुणे शहरातील वाढती पाणीटंचाई, भरधाव टँकरने होणारे अपघात या नागरी समस्यांच्या पार्श्वभूमीवर कोंढवा खुर्द पोलिस ठाण्यात नुकतीच सर्वसमावेशक महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. यावेळी लोकांनी आपल्या भूमिका मांडल्या व पोलिस, महापालिका प्रशासनाने याला उत्तरे दिली. मात्र, बैठक पार पडल्यानंतर बाहेर पडताना लोकांच्या चेहऱ्यावर प्रश्नचिन्ह पाहायला मिळत होते.

एका निष्पाप नॅशनल फुटबॉलपटू आरिज शेख याचा टँकर खाली चिरडून मृत्यू झाला. बिशेप स्कूलचे विद्यार्थी, शिक्षक, तसेच परिसरातील नागरिक हळहळले. शेख याचे कुटुंब उद्ध्वस्त झाले. हा एकच बळी नाही, तर टँकरचालकांनी याअगोदर अनेक लोकांचा बळी घेतला आहे.

# 'भारताची प्रतिभा' म्हणजे कर्तृत्व, दातृत्व आणि नेतृत्त्वाचा मिलाप

**पुणे (दै. संध्या)**

धर्म ही शक्ती आहे, अत्याचार करणारे शास्त्र नाही. आपली राज्यघटना ही धर्म ग्रंथाप्रमाणे मानायला हवी, असे विचार प्रतिभाताई पाटील या मांडत असत. आमचा आणि त्यांच्या कुटुंबाचा संबंध १५ ते १६ वर्षांपासूनचा आहे. प्रत्येक स्त्री चा प्रतिभाताई या आदर्श असायला हव्या. त्यामुळे खऱ्या अर्थाने 'भारताची प्रतिभा' या कर्तृत्व, दातृत्व आणि नेतृत्त्वाचा मिलाप आहेत, असे मत पद्मभूषण डॉ. शां.ब. मुजुमदार यांनी व्यक्त केले.

भारताच्या माजी राष्ट्रपती प्रतिभाताई पाटील उत्तुंग व्यक्तिमत्वाविषयी देश आणि राज्यातील विविध क्षेत्रातील मान्यवरांनी विविध भाषेत लिहिलेले मराठी भाषेतील निवडक लेख पुस्तक स्वरूपात 'भारताची प्रतिभा' यामध्ये घेण्यात आले आहेत. या पुस्तकाचे प्रकाशन सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील मुख्य इमारतीमध्ये असलेल्या संत ज्ञानेश्वर सभागृहात झाले. पुणे परिवार तर्फे आयोजित या कार्यक्रमाला राज्याचे उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ.सुरेश गोसावी, महापौर मंजुषा नागपुरे, राजेश पांडे, मधुकर भावे, आयोजक ज्योती राठोर, सुरेश उज्जैनवाला, पुणे परिवाराचे अध्यक्ष अॅड. प्रताप परदेशी, भाग्यश्री ठाकरे आदी उपस्थित होते.

चंद्रकांत पाटील म्हणाले, प्रतिभाताईंनी आयुष्यभर समाजसेवा केली. तसेच




नेतृत्व देत नवे विचार देखील रुजविले. अनेक लोकोपयोगी निर्णय त्यांनी घेतले. मी त्यांच्यासोबत काम केले नाही. मात्र, त्यांना पुस्तकातून वाचले आहे. आत्ताची जी अनेक महामंडळे आहेत, ती प्रतिभाताईंच्या काळात झालेली आहेत. त्यामुळे शासन म्हणून 'भारताची प्रतिभा' हे पुस्तक जास्तीत जास्त मुलांपर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न करू, असेही त्यांनी सांगितले.

मंजुषा नागपुरे म्हणाल्या, प्रतिभाताईंच्या जीवनाचा आणि कर्तृत्वाचा प्रवास उलगडणारे हे पुस्तक आहे. जळगाव मधील सामान्य कुटुंबापासून सुरु झालेला राष्ट्रपती पदापर्यंतचा त्यांचा प्रवास विलक्षण आहे. एक हळवी माता ते देशाच्या सेनापतीपर्यंतचा त्यांचा कणखर प्रवास आपल्याला या पुस्तकाद्वारे घडणार आहे.

प्रास्ताविकात अॅड. प्रताप परदेशी म्हणाले, प्रतिभाताई पाटील यांच्या पन्नास वर्षापेक्षा जास्त कालखंडातील राजकीय, सामाजिक जीवन प्रवासासह त्यांच्या उत्तुंग व्यक्तिमत्वाविषयी देश आणि राज्यातील विविध क्षेत्रातील मान्यवरांनी विविध भाषेत लिहिलेले लेख 'भारताची प्रतिभा जीवन गौरव ग्रंथ' या पूर्वीच प्रकाशित केले गेले आहेत.तथापि, त्यातील मान्यवरांचे निवडक लेख या पुस्तकात घेण्यात आले आहेत. 'भारताची प्रतिभा' या पुस्तकातील लेख त्यांच्या दुर्दम्य व्यक्तिमत्त्व व गुण वैशिष्ट्यांचा ठेवा म्हणता येईल. नव्या पिढीसाठी राज्यातील सर्व शाळा व ग्रंथालयांना हे पुस्तक वितरित करण्यात येणार आहे.

# वसुंधरा दिनानिमित्त आदिवासी बांधवांचा जलसंधारण उपक्रम

**ओढ्यावर छोटे बंधारे; जैवविविधतेस नवी ऊर्जा, सुयश चॅरिटेबल ट्रस्टचा अनोखा उपक्रम**





**पुणे (दै. संध्या)**

जागतिक वसुंधरा दिनाचे औचित्य साधत सुयश चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने राज्यातील पुणे, नंदुरबार, वाशिम, गडचिरोली अशा विविध जिल्ह्यांमध्ये जलसंधारणाचा उल्लेखनीय उपक्रम राबविण्यात आला.

जंगल परिसरातील नैसर्गिक जलस्त्रोत असलेल्या ओढ्यांवर आणि ओघळांवर स्थानिक शेतकरी व आदिवासी बांधवांनी एकत्र येत दगड, माती आणि सिमेंटच्या पोत्यांच्या साहाय्याने छोटे बंधारे उभारले.

या उपक्रमामुळे वाहून जाणारे पाणी एका ठिकाणी साठवले जात असून, परिसरातील भूजलपातळी वाढण्यास मदत होत आहे.

तसेच पाण्याची उपलब्धता वाढल्याने जंगलातील जैवविविधतेला मोठा आधार मिळत आहे. पाणी साठवणुकीमुळे विविध वनस्पतींची वाढ होऊन पशु-पक्षी व जलचरांना नैसर्गिक अधिवास उपलब्ध होत आहे. परिणामी, पर्यावरण संवर्धनासह स्थानिक शेती व्यवस्थेलाही याचा थेट फायदा होत असल्याचे दिसून येत आहे.

या उपक्रमात स्थानिक ग्रामस्थांनी मोठ्या उत्साहाने सहभाग घेतला. पारंपरिक ज्ञान आणि सामूहिक श्रम यांच्या बळावर उभारण्यात आलेले हे बंधारे पर्यावरणपूरक आणि टिकाऊ ठरत आहेत. ग्रामीण व आदिवासी भागात जलसंधारणाचे महत्त्व अधोरेखित करणारा हा प्रयत्न इतरांसाठीही प्रेरणादायी ठरत आहे.

सुयश चॅरिटेबल ट्रस्टचे संस्थापक अध्यक्ष यशवंत घैसास व स्मिता घैसास आणि कार्याध्यक्ष शलाका घैसास यांनी या उपक्रमाची माहिती देताना सांगितले की, "निसर्गाशी सुसंगत राहून जलस्रोतांचे जतन करणे ही काळाची गरज आहे. अशा उपक्रमांमुळे पर्यावरण रक्षणास चालना मिळते."

## थोडक्यात पण महत्वाचे...



### भाजप महिला आरक्षणाची सिरियल किलर, काँग्रेस विधिमंडळ नेते वडेट्टीवार यांचा प्रहार

मुंबई (दैनिक संध्या) : २०२३ मध्ये महिला आरक्षणाचे विधेयक आले, तेव्हा काँग्रेसने याला समर्थन दिले होते आणि एकमताने ते मंजूर झाले होते.तेव्हा देशाच्या पंतप्रधानांनी काँग्रेसला श्रेय दिले होते का? आता जे विधेयक आणले होते त्यात नारी शक्तीचा उल्लेख कुठे होता? महिला आरक्षणाची सिरियल किलर भाजपच असल्याची टीका काँग्रेस विधिमंडळ नेते विजय वडेट्टीवार यांनी मुंबईत केली. पंतप्रधानांनी आपल्या भाषणात ५८ वेळा काँग्रेसचे नाव घेतले, पण महिलांच्या हितावर भाष्य केले नाही. वरळीतील 'महिला आक्रोश' आंदोलनाचा संदर्भ देत वडेट्टीवार म्हणाले की, खऱ्या महिला आक्रोशाची ताकद काय असते, हे काल एका सामान्य भगिनीने सरकारला आरसा दाखवून सिद्ध केले आहे. २०-३०महिला गोळा करून केलेले आंदोलन म्हणजे जनतेचा आवाज नव्हे,ज्या पद्धतीने ती महिला शूरवीराप्रमाणे तुटून पडली, त्यावरून स्पष्ट होते की जनतेला भाजपचे जुमलेबाजीचे राजकारण समजले आहे असा टोला वडेट्टीवार यांनी लगावला. लोकसभेचे विरोधी पक्षनेते राहुलजी गांधी हे एक सच्चे माणूस असून, त्यांनी महिला आरक्षणाबाबत स्पष्ट भूमिका मांडली आहे.पण निवडणुका आल्या की उत्तर ते दक्षिण भारतात कोण सरड्यासारखे रंग बदलतो, हे देशाला चांगलेच ठाऊक आहे, अशी टीका वडेट्टीवार यांनी केली. अजित पवार यांच्या मृत्यू बाबत उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी प्रश्न उपस्थित केले,त्यांच्या वक्तव्यावर भाष्य करताना वडेट्टीवार म्हणाले की, सुनेत्रा ताईंनी ही भूमिका घेण्यास उशीर केला आहे. हा अजित दादांचा घातपात आहे का, असा प्रश्न संपूर्ण महाराष्ट्राच्या मनात होता. या प्रकरणाची सखोल चौकशी व्हावी. जर हे वक्तव्य आधी आले असते तर आगडोंब उसळला असता पण आता हे प्रकरण निवळले आहे. विधान परिषद निवडणुकीत महाविकास आघाडीच्या उमेदवारी बाबत काँग्रेस उद्धव ठाकरे यांच्याशी चर्चा करेल असे वडेट्टीवार यांनी स्पष्ट केले.

### वॉकरू आणि वरुण धवन यांनी एकत्र येत चालण्याचे महत्त्व स्पष्ट केले!

मुंबई (दैनिक संध्या) : २२ एप्रिल २०२६ – कधी-कधी, साधी गोष्ट सुद्धा मोठा बदल घडवून आणते. भारताचा नंबर १ पीयू फूटवेअर ब्रँड वॉकरू आणि त्यांचा ब्रँड ॲम्बेसिडर अभिनेता वरुण धवन यांनी "When you don't know what to do, Walk. Walk. Walkaroo." ही नवीन कॅम्पेन सुरू केली आहे. ही कॅम्पेन अत्यंत खास आणि प्रत्येकाला पटेल असा विचार मांडते, तो म्हणजे जेव्हा आपल्याला एखादे काम सुचत नाही किंवा आपण एकाच विचारात अडकून पडतो, तेव्हा थोडे चालल्यामुळे आपला मूड सुधारतो आणि मन ताजेतवाने होते. चालणे ही एक नैसर्गिक गोष्ट आहे आणि आपल्याला अधिक सक्रिय बनवते. "What To Do? Walk. Walk. Walkaroo." कॅम्पेनसह ब्रँडने या साध्या तथ्याला दैनंदिन जीवनाचा भाग बनवले आहे. हे इतके साधे आणि सहज आहे की कोणालाही ते लगेच पटेल. कधी ट्रॅफिकचा कंटाळा येतो, कधी सतत स्क्रीन बघून डोळे थकतात, तर कधी रोजच्या कामाचा ताण येतो. अशा वेळी 'आता काय करू?' असा प्रश्न आपल्याला पडतोच. वॉकरू यावर एक सोपा उपाय सांगते: 'फक्त चाला.' कारण कधी-कधी पुढे जाण्यासाठी फक्त पहिले पाऊल टाकणे पुरेसे असते. चालणे हा प्रगतीचा सर्वात सोपा मार्ग आहे, असे वॉकरू मानते. यासाठी कोणत्याही मोठ्या तयारीची गरज नसते; फक्त चालायला सुरुवात करायची असते. वरुण धवनचा उत्साह, त्याची सर्वांना आवडणारी शैली आणि सर्वसामान्य व्यक्तींशी सहज मिळून-मिसळून जाण्याची वृत्ती यामुळे हा विचार अगदी नवीन व उत्साही वाटतो. याच कारणामुळे ही कॅम्पेन सध्या चर्चेत आहे आणि सोशल मीडियावरही कॅम्पेनला पसंती मिळत आहे. "आमच्या मते आराम म्हणजे फक्त चांगले चप्पल-बूट असणे नव्हे, तर माणसाला आयुष्यात सतत चालते ठेवणे आहे. जेव्हा आपल्याला काही सुचत नाही, तेव्हा फक्त एक पाऊल पुढे टाकणे खूप काही बदलू शकते, या साध्या विचारातूनच ही कॅम्पेन आकारास आली आहे. कधी-कधी, फक्त चालायला सुरुवात करणे हाच सर्वात उत्तम मार्ग असतो," असे वॉकरू इंटरनॅशनलचे व्यवस्थापकीय संचालक व्ही. नौशाद म्हणाले. या मोहिमेमुळे वॉकरू आता फक्त फूटवेअर ब्रँड राहिला नसून रोजच्या आयुष्यात हालचाल करण्यासाठी प्रेरणा देणारा सोबती बनला आहे. आराम, सुलभता आणि स्टाइल या तिन्ही गोष्टी देऊन हा ब्रँड आत्मविश्वासाने पहिले पाऊल पुढे टाकण्यासाठी प्रेरित करत आहे.

### नागेवाडी येथे आयटी पार्क उभारण्यास राज्य मंत्रिमंडळाची मंजुरी

मुंबई (दैनिक संध्या) : सातारा जिल्ह्यातील माहिती तंत्रज्ञान क्षेत्राला चालना देण्यासाठी मौजे नागेवाडी (ता. सातारा, जि. सातारा) येथील गट क्रमांक 308/1 मधील सुमारे 42.55 हेक्टर आर (आरक्षित) शासकीय जमिनीवर अत्याधुनिक आयटी पार्क उभारण्यास राज्य मंत्रिमंडळ बैठकीत मंजुरी देण्यात आली आहे. या महत्त्वाकांक्षी प्रकल्पासाठी सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोंसले यांनी पुढाकार घेतला होता. या संदर्भात मंत्रालयात उद्योग मंत्री उदय सामंत यांच्यासमवेत संयुक्त बैठक घेऊन या बाबतीत आग्रही भुमिका मांडली होती. या आयटी पार्कमुळे सातारा जिल्हा तसेच परिसरातील युवकांना स्थानिक पातळीवर रोजगाराच्या मोठ्या संधी उपलब्ध होणार असून, माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील गुंतवणुकीसाठी हा प्रकल्प महत्त्वाचा टप्पा ठरणार आहे. तसेच, पुणे-मुंबईसारख्या महानगरांवरील आयटी क्षेत्रातील ताण कमी करण्यास मदत होणार आहे. या प्रकल्पांतर्गत आयटी कंपन्यांसाठी आवश्यक असलेली सर्व आधुनिक पायाभूत सुविधा. प्रशस्त रस्ते, वीज, पाणीपुरवठा, इंटरनेट कनेक्टिव्हिटी, तसेच कार्यालयीन इमारतींची उभारणी करण्यात येणार आहे. यासोबतच स्टार्टअप्स आणि नवउद्योजकांना प्रोत्साहन देण्यासाठी विशेष सुविधा उपलब्ध करून देण्याचा मानस आहे. याबाबत मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोंसले म्हणाले, "सातारा जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी आयटी क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक आकर्षित करणे आवश्यक आहे. नागेवाडी येथील आयटी पार्क प्रकल्पामुळे स्थानिक युवकांना रोजगाराच्या संधी मिळतील आणि जिल्ह्याच्या आर्थिक प्रगतीला गती मिळेल. राज्य शासन उद्योगविकासाला प्राधान्य देत असून, अशा प्रकल्पांद्वारे ग्रामीण भागातही आधुनिक विकास घडवून आणण्याचा आमचा प्रयत्न आहे." या प्रकल्पामुळे सातारा जिल्ह्याची ओळख एक उदयोन्मुख आयटी हब म्हणून निर्माण होण्याची शक्यता असून, स्थानिक अर्थव्यवस्थेला मोठा चालना मिळणार आहे. तसेच, उद्योग, सेवा क्षेत्र आणि पायाभूत सुविधा विकासालाही या प्रकल्पामुळे बळकटी मिळणार आहे. राज्य शासनाच्या या निर्णयाचे विविध स्तरांतून स्वागत करण्यात येत असून, प्रकल्पाची अंमलबजावणी लवकरात लवकर सुरू करण्यासाठी संबंधित यंत्रणांना आवश्यक त्या सूचना देण्यात आल्या आहेत.

# 'युवाशक्ती जागर मोर्चा' या राज्यव्यापी दौऱ्याचा शुभारंभ

## राज्यातील युवकांना राष्ट्रनिर्मितीच्या ध्येयाशी जोडण्याची आणि त्यांच्या उर्जेला सकारात्मक दिशा देण्याची व्यापक मोहीम सुरू

**मुंबई (दै. संध्या) :**

भारतीय जनता युवा मोर्चाच्या वतीने आयोजित 'युवाशक्ती जागर मोर्चा'या राज्यव्यापी दौऱ्याचा मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थितीत मुंबईतून दणक्यात शुभारंभ झाला. यामुळे राज्यातील युवकांना राष्ट्रनिर्मितीच्या ध्येयाशी जोडण्याची आणि त्यांच्या उर्जेला सकारात्मक दिशा देण्याची व्यापक मोहीम सुरू झाल्याचे उद्गार भाजपा प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांनी काढले.

या प्रसंगी भाजपा युवा मोर्चाचे प्रदेशाध्यक्ष कृष्णराज महाडिक यांनी, भाजपा प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण हे व्यासपीठावरील सर्वात युवा मनाचे आणि ऊर्जावान नेतृत्व असल्याचे नमूद केले. आपल्या मनोगतात प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांनी यात्रेचा उद्देश स्पष्ट करताना सांगितले की, "भाजप युवा मोर्चा महाराष्ट्र प्रदेशच्या वतीने राबवण्यात येणारा हा अशा प्रकारचा पहिलाच उपक्रम आहे. केंद्र व राज्य सरकारने तरुणाईसाठी घेतलेले लोककल्याणकारी निर्णय या यात्रेच्या माध्यमातून राज्याच्या कानाकोपऱ्यातील युवकांपर्यंत पोहोचवले जातील. पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी यांना अपेक्षित असलेले सक्षम आणि प्रभावी युवाशक्तीचे संघटन उभारणे, हेच



या यात्रेचे मुख्य ध्येय आहे."

'जागर युवाशक्तीचा, सशक्त राष्ट्रनिर्मितीचा'हा संदेश देणारी ही यात्रा राज्यातील युवकांना एकत्र आणत त्यांना विकास, नवकल्पना आणि राष्ट्रहिताच्या विचारांशी जोडण्याचे कार्य करणार आहे. भाजपा युवा मोर्चाचे प्रदेशाध्यक्ष कृष्णराज महाडिक यांच्या नेतृत्वात ही यात्रा महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात पोहोचणार असून, युवकांमध्ये जागर निर्माण करून त्यांना सामाजिक आणि राष्ट्रीय बांधिलकीची जाणीव करून देईल, असा विश्वास प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांनी व्यक्त केला.

या कार्यक्रमास मंत्री जयकुमार गोरे, मंत्री अतुल सावे, मंत्री नितेश राणे, राज्यसभा खासदार धनंजय महाडिक, राज्यसभा खासदार अशोक चव्हाण, भाजपा प्रदेश सरचिटणीस व भाजयुमो प्रदेश प्रभारी सुनील राणे, मुख्य प्रवक्ते नवनाथ बन यांच्यासह इतर मान्यवर, भाजयुमोचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि मोठ्या संख्येने युवक उपस्थित होते.

# गोदरेज इंडस्ट्रीजचे नवे ध्येय आणि नवी ब्रँड ओळख; २०३१ पर्यंत ₹५,००,००० कोटींचे उद्दिष्ट

**मुंबई (दै. संध्या) :**

गोदरेज इंडस्ट्रीज ग्रुपने आज आपले नवे ध्येय आणि नवी ब्रँड ओळख प्रस्तुत केली. ग्रुपच्या उत्क्रांतीमधील हा एक निर्णायक क्षण असून, यातून नवी ओळख, धोरण आणि महत्त्वाकांक्षा यांचा भविष्यातील प्रगतीशी मेळ घातला गेला आहे. १२९ वर्षांचा प्रदीर्घ वारसा आणि नव्या स्वरूपातील आधुनिक ऊर्जेने प्रेरित ही ओळख, समूहाच्या कंज्यूमर प्रॉडक्ट्स, रिअल इस्टेट, फायनान्शिअल सर्व्हिसेस, ॲग्रीकल्चर आणि केमिकल्स अशा वैविध्यपूर्ण व्यवसायांमध्ये एक स्पष्ट धोरणात्मक ताळमेळ प्रस्थापित करते. या ऐतिहासिक बदलाची घोषणा मुंबईतील 'गोदरेज वन' या समूहाच्या मुख्यालयात आयोजित मीडिया बैठकीत करण्यात आली.



या बदलाच्या केंद्रस्थानी समूहाचे नवीन ध्येय आहे. "१८९७ पासून निरंतर निर्मिती, प्रत्येक येणाऱ्या उद्याची". ही दृष्टी समूहाचा ऐतिहासिक वारसा आणि नाविन्य व उत्तरदायित्व यांच्या संगमातून 'शाश्वत मूल्य' निर्माण करण्याच्या महत्त्वाकांक्षेचे दर्शन घडवते. हे ध्येय समूहाचे संस्थापक अर्देशिर गोदरेज यांच्या जीवनापासून प्रेरणा घेऊन तयार करण्यात आले आहे, ज्यांनी सदैव आधुनिकता आणि मूल्ये यांचा अतुलनीय समतोल राखला. समूहाने आपल्या तीन मुख्य मूल्यांचा. विश्वास संपादन करणे, आनंद निर्माण करणे आणि धाडसी बनणे. पुनरुच्चार केला आहे, जी मूल्ये संपूर्ण संघटनेत नेतृत्व आणि निर्णय प्रक्रियेसाठी मार्गदर्शक ठरतील.

गोदरेज इंडस्ट्रीज ग्रुपचे नियुक्त अध्यक्ष (Chairperson Designate), पिरोजशा गोदरेज म्हणाले, "'१८९७ पासून निरंतर निर्मिती, प्रत्येक येणाऱ्या उद्याची' हे ब्रीदवाक्य आमचा हा विश्वास अधोरेखित करते की, मूल्ये आणि परिणाम सदैव हातात हात घालून चालले पाहिजेत. जसा आमचा विस्तार होत आहे, हीच विचारधारा आम्हाला असे व्यवसाय उभारण्यासाठी प्रेरणा देत राहील जे यशस्वी असण्यासोबतच जबाबदारीचेही भान राखतील."

समूहाने प्रगतीचा एक भक्कम 'ट्रॅक रेकॉर्ड' सादर केला आहे, ज्यामध्ये गेल्या पाच वर्षांत विक्री आणि निव्वळ नफा या दोन्हीमध्ये २०% हून अधिक 'चक्रवाढ वार्षिक वृद्धी दर' (सीएजीआर) नोंदवला गेला आहे. समूहाने विकासाच्या पुढील टप्प्यासाठी स्पष्ट उद्दिष्टे निश्चित केली आहेत, ज्यामध्ये १५% पेक्षा जास्त वार्षिक विक्री वाढ आणि प्रति शेअर उत्पन्न (ईपीएस) मध्ये २०% पेक्षा जास्त वाढीचे लक्ष्य ठेवण्यात आले आहे. तसेच, प्रत्येक व्यवसायाकडून 'स्टेडी स्टेट'मध्ये १८% पेक्षा जास्त इक्विटी परतावा अपेक्षित आहे. समूहाचा मानस आपल्या तीन सार्वजनिक सूचीबद्ध कंपन्यांची (कंझ्युमर प्रॉडक्ट्स, प्रॉपर्टीज आणि ॲग्रोवेट) संख्या पाचपर्यंत वाढवण्याचा आहे. या पावलांमुळे पुढील पाच वर्षांत एकूण मार्केट कॅपिटलायझेशन ₹५,००,००० कोटींपर्यंत पोहोचण्याची अपेक्षा आहे.

समूहाच्या विकास धोरणांचा आधार हा दृढ विश्वास आहे की, भक्कम आर्थिक कामगिरी आणि समाज व पर्यावरणावरील सकारात्मक परिणाम हे एकमेकांना पूरक असले पाहिजेत. २०२५ मध्ये, 'डाऊ जोन्स बेस्ट-इन-क्लास सस्टेनेबिलिटी इंडेक्स' मध्ये गोदरेज कंझ्युमर प्रॉडक्ट्स आणि गोदरेज प्रॉपर्टीज या दोघांनीही आपापल्या श्रेणींमध्ये जागतिक स्तरावर प्रथम स्थान पटकावले. याच पायावर भर देत, समूहाने २०३५ पर्यंत 'नेट-झिरो' ऑपरेशन्स (स्कोप १ आणि २) आणि २०४७ पर्यंत 'प्लॅनेट-पॉझिटिव्ह' सप्लाय चेनचे उद्दिष्ट ठेवले आहे. याशिवाय, आगामी पाच वर्षांत समूहामध्ये महिला, LGBTQ+ समुदाय आणि दिव्यांग व्यक्तींचे प्रतिनिधित्व ४०% पर्यंत नेण्याचे उद्दिष्ट आहे—जे गोदरेज प्रॉपर्टीज आणि समूहाच्या कॉर्पोरेट केंद्राने आधीच साध्य केले आहे. तसेच, २०२५ मध्ये 'गोदरेज फाउंडेशन'ने (ज्यांची गोदरेज इंडस्ट्रीज ग्रुपमध्ये १५% भागीदारी आहे) एक मोठा 'कॅश कॉर्पस' तयार केला आहे, ज्यामुळे त्यांना आपला वार्षिक परोपकारी खर्च (philanthropic spend) पूर्वीच्या तुलनेत ५ पटीने वाढवता येईल.

आपल्या नवीन ध्येयासोबतच, समूहाने एका नवीन ब्रँड ओळखीचे अनावरण केले आहे, जी समूहाच्या 'DISCO' या इन-हाउस डिझाइन टीमने साकारली आहे. ही ब्रँड ओळख अधिक एकात्मिक आणि भविष्याचा वेध घेणारी कॉर्पोरेट ब्रँड प्रणाली तयार करण्यासाठी विकसित करण्यात आली आहे. यामध्ये नवीन व्हिज्युअल भाषा, विशेष टाइपोग्राफी (GI Sans), एक खास सोनिक (ध्वनी) ओळख आणि एका 'सिग्नेचर' सुगंधाचा समावेश आहे—जे डिजिटल, भौतिक आणि अनुभवात्मक स्तरावर एक सुसंगत आणि बहु-संवेदी (multi-sensory) अभिव्यक्ती प्रदान करते.

गोदरेज इंडस्ट्रीजच्या कार्यकारी संचालक आणि मुख्य ब्रँड अधिकारी, तान्या दुबाश म्हणाल्या, "ही नवी ब्रँड ओळख आम्ही कोण आहोत आणि आम्ही कोणत्या दिशेने वाटचाल करत आहोत याचे प्रतिबिंब आहे. हे गोदरेज ब्रँडच्या सामर्थ्याला अधिक बळकटी देते आणि त्याच वेळी भविष्यातील आमच्या महत्त्वाकांक्षांना एक आधुनिक व एकात्मिक स्वरूप प्रदान करते. ही ओळख आमच्या प्रत्येक व्यवसायाला आपापले स्वतंत्र अस्तित्व जपून एका सामायिक ध्येयाशी अधिक सशक्तपणे जोडण्यास सक्षम करते."

# जगद्धात्री आणि शिवाय यांच्या आगामी प्रेमकथेचे संकेत

**मुंबई (दै. संध्या) :**

झी टीव्हीवरील 'जगद्धात्री' ही मालिका आपल्या वेगळ्या आणि उत्कंठावर्धक कथानकासाठी प्रेक्षकांच्या विशेष पसंतीस उतरली आहे. घरातील जबाबदाऱ्या सांभाळत निर्भय पोलीस अधिकारी म्हणून कर्तव्य बजावणाऱ्या एका बळकट महिलेचे दुहेरी आयुष्य या मालिकेत प्रभावीपणे दाखवण्यात आले आहे. जगद्धात्री (सोनाक्षी बत्रा) च्या या ताकदीच्या आणि बहुपदरी भूमिकेमुळे तिचा प्रवास प्रेक्षकांना अतिशय जवळचा आणि गुंतवून ठेवणारा वाटतो.



हल्लीच्या भागांमध्ये प्रेक्षकांनी एक मोठे नाट्यमय वळण पाहिले, जेव्हा रुद्रने (आयुष श्रीवास्तव) शिवायवर (फर्मान हैदर) गोळी झाडली आणि त्याचा जीव धोक्यात आला. या घटनेचा जगद्धात्रीवर खोल परिणाम झाला असून ती शिवायसाठी अतिशय चिंतेत असल्याचे दिसून आले. शिवाय नेहमीच तिचा सर्वांत मोठा आधार राहिला आहे. आयुष्याच्या प्रत्येक टप्प्यावर तिच्या सोबत ठामपणे उभा राहत, तिला बळ, विश्वास आणि निःस्वार्थ पाठिंबा शिवायने दिला आहे. त्याला गंभीर अवस्थेत पाहून तो आपल्यासाठी किती महत्त्वाचा आहे याची जाणीव जगद्धात्रीला होते.

शिवाय बरा होऊन घरी परतल्यानंतर आता प्रेक्षकांना जगद्धात्रीची अधिक हळवी आणि काळजीवाहू बाजू पाहायला मिळत आहे. विश्वास आणि एकत्रपणावर उभी राहिलेली त्यांची मैत्री आता हळूहळू प्रेमाकडे वाटचाल करत आहे. शिवायने नेहमीच जगद्धात्रीवर शांतपणे प्रेम केले असून आता जगद्धात्रीलाही स्वतःच्या भावना उमजू लागल्या असून तिच्या आयुष्यात शिवाय खरोखरच किती खास आहे याची जाणीव तिला होत आहे.


**महावितरण** — महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

**ई-निविदा सूचना**
**वाहन भाड्याने पाहिजे**

अधीक्षक अभियंता, महावितरण पुणे ग्रामीण मंडळ कार्यालयांतर्गत वाहन भाडेतत्त्वावर घेण्यासाठी खालीलप्रमाणे ई-निविदा सूचना मागविण्यात येत आहेत.

| अ.क्र. | निविदा क्रमांक | कामाचे वर्णन | निविदा रक्कम |
|---|---|---|---|
| १ | SE/PRC/T-01/ 2026-27 | सहाय्यक संचालक (सुवअ) पुणे परिमंडळ यांचेसाठी वाहन | रु. १४.९४ लाख |

वरील निविदा महावितरण कंपनीच्या https://etender.mahadiscom.in/eatApp/ या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. सदर निविदा विक्रीसाठी दि. २४/०४/२०२६ ते ०८/०५/२०२६ (सायंकाळी ४.०० वाजेपर्यंत) उपलब्ध राहतील. तसेच निविदा प्रक्रियेत होणारे बदल किंवा मुदतवाढीची माहिती महावितरणच्या अधिकृत संकेतस्थळावर प्रकाशित केली जाईल. **संपर्क क्र.** ७८७५७६७०२१

PRO/PZ/030/2026-27

अधीक्षक अभियंता,
पुणे ग्रामीण मंडल.


# महिला आरक्षणावर बोलण्याचा भाजपाला अधिकार नाही



**खरगेंच्या विधानाचा चुकीचा अर्थ लावला...**

काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जून खरगे यांच्या विधानाची मोडतोड करून ते दाखवले जात आहे, खरगे यांच्या विधानाचा चुकीचा अर्थ लावला जात आहे. नरेंद्र मोदी हे ईडी व सीबीआयच्या मदतीने दहशतीचे राजकारण करत आहेत. भाजपाने या विधानावर निवडणूक आयोगाकडे तक्रार केल्याचे समजते पण निवडणूक आयोगाने तामिळनाडू, पश्चिम बंगाल आसाममध्ये निवडणुकीच्या वेळी भाजपाकडून काय काय प्रकार केले, त्याकडेही डोळे उघडे ठेवून पहावे, असेही हर्षवर्धन सपकाळ यांनी म्हटले आहे.

**नवी दिल्ली (दै. संध्या) :**

भारतीय जनता पक्षाला महिला आरक्षणावर बोलण्याचा काहीही अधिकार नाही. भाजपाची विचारसणी ही गोलवलकर यांच्या बंच ऑफ थॉट तसेच मनुस्मृतीवर आधारीत आहे व यामध्ये महिलांना अतिशुद्र समजले आहे. चातुर्वर्ण्य व्यवस्थेचा स्विकार करणाऱ्या मनुवादी विचाराच्या पक्षाने आधी बंच ऑफ थॉट व मनुस्मृतीची होळी करावी व मगच महिला आक्षणावर बोलावे, तसेच राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या सरसंघचालक पदावर महिलेची नियुक्ती करून दाखवा, असे आव्हान महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी दिले आहे.

टिळक भवन येथे प्रसार माध्यमांशी बोलताना काँग्रेस प्रदेशाध्यक्ष पुढे म्हणाले की, महिला आरक्षणावर बोलताना भाजपाने महिलांबद्दलचा त्यांचा दृष्टीकोन कोणता ते स्पष्ट करावे. सावित्रिबाई फुले यांनी मुलींची पहिली शाळा सुरु केली, त्यावेळी त्यांच्यावर शेणाचे गोळे मारणारे कोण होते हे भाजपाने सांगावे. सावित्रीबाईंचा या तथाकथीत धर्ममार्तंडांनी छळ केला, त्यामुळे महिलांबद्दल भाजपा दाखवत असलेला पुळका सर्वांना माहित आहे. संसदेत महिला आरक्षण विधेयक २०२३ सालीच सर्व पक्षांच्या पाठिंब्याने मंजूर झालेले आहे, १६ एप्रिलला जे विधेयक लोकसभेत मांडले होते ते डिलिमिटेशनचे होते, या विधेयका आडून भाजपाला देशाचे तुकडे करायचे होते. तर मुंबई व महाराष्ट्राचा गायपट्टा करायचा होता. भाजपाचे नेते डिलिमिटेशनवर काहीच बोलत नाहीत. भाजपाचा हा दुष्ट हेतू इंडिया आघाडीने ओळखला व त्या विधेयकाला विरोध केलेला आहे. भाजपा मात्र विरोधी पक्षांना महिला विरोधी ठरवत आहे. महिलांना सर्वात प्रथम काँग्रेस पक्षाने स्थानिक स्वराज्य संस्थेत ३३ टक्के आरक्षण दिले नंतर ते वाढवून ५० टक्के केले. महिला आरक्षणाच्या नावावर राजकारण करण्याचे धंदे भाजपाने बंद करावेत, असेही सपकाळ यांनी म्हटले आहे.

महिला आरक्षणाच्या मुद्द्यावर भाजपाने वरळीत काढलेल्या मोर्चावेळी एका स्थानिक महिलेने संताप व्यक्त करत मंत्री गिरीश महाजन यांना खडे बोल सुनावले.


**जेजुरी नगरपरिषद, जेजुरी. जि. पुणे.**
ई - निविदा सूचना क्रमांक Ele Dep./०१/२०२५

जेजुरी नगरपरिषद कार्यालय,
जा.क्र. जेनपा/काविं/ ८६४/२०२६
दिनांक :- २३/०४/२०२६

जेजुरी नगरपरिषदेच्या वतीने विद्युत विभागाकडील अण्णाभाऊ साठे नागरी वस्ती सुधारणा अंतर्गत १) जेजुरी नगरपरिषद येथील जानाई हॉटेल ते आझाद चौक पर्यंत स्ट्रीट लाईट पोल बसवणे २) जेजुरी नगरपरिषद हद्दीतील लक्ष्मीनगर चौक ते पेशवे तलाव पर्यंत स्ट्रीट लाईट पोल बसवणे या दोन कामांची पात्र निविदाधारकांकडून दोन लिफाफा पद्धतीने ई- निविदा पध्दतीने ई निविदा मागविण्यात येत आहेत.

सदर कामांच्या निविदेचा विस्तृत नमुना व कामाचा तपशिल तसेच सविस्तर अटी व शर्ती महाराष्ट्र शासनाच्या http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर (वेबसाईटवर) दिनांक- २४/०४/२०२६रोजी स. ११.०० वाजलेपासून ते दिनांक - ०२/०५/२०२६ रोजी स. ११.०० पर्यंत पहावयास उपलब्ध आहे.

शिक्का

सही/-
मुख्याधिकारी
जेजुरी नगरपरिषद, जेजुरी



**जाहिर नोटीस**

१) तमाम लोकांस विशेषतः गाव मौजे जुन्नर, ता. जुन्नर, जि.पुणे येथील व आसपासचे सर्व लोकांस कळविण्यात येते की, आमचे अशिल सादिक नबीमोहम्मद शेख, रा. बादशाहतलाव, ता. जुन्नर, जि.पुणे यांनी सांगितलेवरुन व पुरविलेल्या माहितीनुसार जाहिरपणे कळविण्यात येते की, तुकडी व जिल्हा परिषद पुणे पोट तुकडी तालुका जुन्नर पंचायत समिती जुन्नर, जुन्नर नगरपरिषद यांचे हद्दीतील व मे. दुय्यम निबंधक सो, जुन्नर यांचे हद्दीतील जुन्नर येथील छत्रपती शिवाजीनगर येथील कायदेशीर स्वामीत्व असलेली सि.स.नं.५१९० प्लॉट क्र.६क मधील आर.सी.सी. पध्दतीमध्ये परिजात इमारतीमधील निवासी सदनिका पहिला मजला सदनिका क्र.२ जुना मालमत्ता क्र.४४ (४) नविन मालमत्ता क्र. ZAB2005615 यांचे क्षेत्र ३८८.८० चौ.मी (७३१.६८ चौ. फुट) ही मिळकत शामराव बाबुराव पांडे, रा. बोडकेनगर, बारव, ता. जुन्नर, जि.पुणे यांचे मालकीची वहिवाटीची मिळकत असुन सदर जमिनीबाबत आमचे अशिल व सदर इसमामध्ये व्यवहार ठरलेला असुन सदरची जमिन निर्वेध व निजोखमी आहे याचा भरोसा सदर इसमाने आमचे अशिलांना दिलेला असुन लवकरच सदर जमिनीचे आमचे अशिल खरेदीखत करुन घेणार आहेत व म्हणुन आमचे अशिलांना सदरची नोटीस प्रसिद्ध करणे भाग झाले आहे.

**तरी या नोटीसीने सर्वांना जाहिरपणे कळविण्यात येते की,**

सदरची नोटीस प्रसिध्द झालेपासुन ८ दिवसांच्या आत सदरच्या जमिनीबाबत कोणाचा कोणताही हक्क हितसंबंध असल्यास कागदपत्रानिशी वरील पत्त्यावर त्याबाबत शहानिशा करावी, याही ऊपर कोणी तसे न केल्यास सदरची मिळकत निर्वेध व निजोखमी आहे असे समजुन आमचे अशिल सदर जमिनीचा खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील व मग त्यानंतर कोणाची कोणतीही तक्रार अगर हरकत चालणार नाही व ते आमचे अशिलावर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.

कोणाचेही नुकसान होऊ नये म्हणुन मुद्दाम प्रसिध्द केले आहे.

नोटीस देणार तर्फे ॲडव्होकेट

**शरीफ रफीक कोयते**
एम. ए., एल.एल.बी., डी.सी.एल.
ॲडव्होकेट
मोबाईल नं. ९८६०१४८०७७
ऑफीस : राहील कॉम्प्लेक्स, ऑफीस नं. ११२, पहिला मजला, नेहरूबाजार पेठ, जुन्नर, ता. जुन्नर, जि. पुणे - ४१० ५०२

## थोडक्यात पण महत्वाचे...



### पिंपरीच्या सर्वांगीण विकासासाठी डब्बू आसवानी यांचा पाठपुरावा

पिंपरी (दैनिक संध्या) : पिंपरी परिसरातील प्रलंबित प्रश्न मार्गी लावण्यासाठी माजी उपमहापौर तथा नगरसेवक डब्बू आसवानी यांनी पुढाकार घेत महानगरपालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांची भेट घेतली. या भेटीत शहराच्या विकासासंदर्भात तब्बल १८ महत्त्वाच्या मुद्द्यांवर सविस्तर आणि सकारात्मक चर्चा करण्यात आली. या बैठकीत पिंपरी मार्केट परिसरातील पार्किंगच्या समस्येवर उपाय म्हणून मल्टीलेव्हल पार्किंग उभारण्याचा प्रस्ताव मांडण्यात आला. तसेच साई चौक, शगुन चौक, डिलक्स चौक, जमतानी चौक, त्रिलोक स्मशानभूमी चौक आणि भाटनगर परिसरातील वाढत्या वाहतूक कोंडीवर नियोजनबद्ध उपाययोजना करण्याची मागणी करण्यात आली. डेअरी फार्म येथील रेल्वे उड्डाणपुलाचे काम वेळेत पूर्ण करून त्या पुलाला 'लोकनेते दिवंगत अजितदादा पवार साहेब उड्डाणपूल' असे नाव देण्याचाही प्रस्ताव आसवानी यांनी मांडला. स्वच्छता आणि आरोग्य विषयावर बोलताना कचरा संकलनातील त्रुटी आणि प्रभाग क्रमांक २१ मधील आरोग्य विभागाच्या कामकाजाबाबत आयुक्तांचे लक्ष वेधण्यात आले. तसेच पिंपरी म्हाडा परिसरात २० लाख लिटर क्षमतेची पाण्याची टाकी उभारणे, बुस्टर पंप बसवणे आणि सीसीटीव्ही यंत्रणा कार्यान्वित करण्याबाबतही चर्चा झाली. नागरिकांना जन्म-मृत्यू दाखले वेळेत मिळावेत, उद्यानांची देखभाल सुधारावी, खेळाची मैदाने विकसित करावीत, तसेच शहरातील बेघर नागरिक आणि लावारिस वाहनांच्या समस्येवर तातडीने उपाययोजना कराव्यात, अशा विविध मागण्या यावेळी करण्यात आल्या. पावसाळ्यापूर्वी गटार, नाले आणि ड्रेनेज लाईनची आधुनिक पद्धतीने स्वच्छता करण्याच्या सूचना प्रशासनाला देण्यात आल्या. या सकारात्मक चर्चेमुळे पिंपरीतील विकासकामांना गती मिळण्याची अपेक्षा व्यक्त होत असून, नागरिकांसाठी हा पाठपुरावा दिलासादायक ठरणार आहे. या बैठकीस नगरसेविका निकिता कदम, प्रियांका कुदळे तसेच महापालिका अधिकारी आणि संबंधित विभागांचे प्रतिनिधी उपस्थित होते.





### उपायुक्त संदीप खोत यांच्याकडे सामान्य प्रशासन विभागाचा अतिरिक्त पदभार

पिंपरी (दैनिक संध्या) : पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सामान्य प्रशासन विभागाच्या वतीने आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांच्या आदेशानुसार उपायुक्त संदीप खोत यांच्याकडे सामान्य प्रशासन विभागाच्या अतिरिक्त कार्यभाराची जबाबदारी सोपविण्यात आली आहे. तसेच सहाय्यक आयुक्त परशुराम वाघमोडे यांच्याकडे इ क्षेत्रीय कार्यालयाचा व तानाजी नरळे यांच्याकडे आपत्ती व्यवस्थापन, कामगार कल्याण व अभिलेख कक्षाचा पदभार सोपवण्यात आला आहे. पशुवैद्यकीय व कामगार कल्याण विभागाचे उपायुक्त म्हणून संदीप खोत हे काम पाहत होते. आता त्यांच्याकडे सामान्य प्रशासन विभागाचा अतिरिक्त पदभार (पशुवैद्यकीय विभागासह) सोपविण्यात आला आहे. उपायुक्त खोत यांच्याकडील कामगार कल्याण विभागाचा पदभार सहाय्यक आयुक्त तानाजी नरळे यांच्याकडे देण्यात आला आहे. याशिवाय सहाय्यक आयुक्त नरळे यांच्याकडे सहाय्यक आयुक्त परशुराम वाघमोडे यांच्याकडे असणारे आपत्ती व्यवस्थापन व अभिलेख कक्षाचा देखील पदभार देण्यात आला आहे. तर सहाय्यक आयुक्त तानाजी नरळे यांच्याकडील सध्याचा इ क्षेत्रीय कार्यालयाचा क्षेत्रीय अधिकारी पदाचा पदभार सहाय्यक आयुक्त परशुराम वाघमोडे यांच्याकडे सोपविण्यात आला आहे.

### वाहतूक होणार तात्पुरती बंद

पिंपरी (दैनिक संध्या) : यशवंतराव चव्हाण द्रुतगती मार्ग वरील कि.मी. क्र. 58/500 (डोंगरगाव / कुसगाव) येथे महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळामार्फत बांधण्यात आलेल्या पुलाचे शटरिंग काढणे व रंगकाम करण्याचे काम हाती घेण्यात आले आहे. या कामासाठी द्रुतगती मार्गावरील वाहतूक काही कालावधीसाठी पूर्णपणे बंद ठेवण्यात येणार आहे. मुंबईकडे जाणारी वाहतूक दि. 23 एप्रिल 2026 रोजी दुपारी 12 ते 3 वाजेपर्यंत पूर्णपणे बंद ठेवण्यात येणार असून, सर्व वाहने किवळे – देहूरोड–तळेगाव मार्गे राष्ट्रीय महामार्ग 48 वरून कुसगाव टोल प्लाझा येथे वळविण्यात येतील. तसेच, पुण्याकडे येणारी वाहतूक दिनांक 24 एप्रिल 2026 रोजी दुपारी 12 ते 3 वाजेपर्यंत पूर्णपणे बंद ठेवण्यात येणार असून, सर्व वाहने कुसगाव टोल प्लाझा मार्गे राष्ट्रीय महामार्ग 48 वरून देहू रोड – किवळे मार्गे पुण्याकडे वळविण्यात येतील.

# पहिली 'पिंपरी चिंचवड प्रीमियर लीग' महिलांची टी-२० क्रिकेट स्पर्धा सुरू

## उद्घाटनाच्या दिवशी ऐश्वर्यम चॅलेंजर्स व नायर ईगल्सचा विजय



**पिंपरी (दै. संध्या)**

पिंपरी चिंचवड शहर क्रिकेट असोसिएशनच्या वतीने आयोजित पहिल्या 'पिंपरी चिंचवड प्रीमियर लीग' (पीसीपीएल) महिला टी-२० क्रिकेट स्पर्धेची दमदार सुरुवात झाली. हिंजवडी येथील फोर स्टार क्रिकेट मैदानावर सुरू असलेल्या या स्पर्धेत उद्घाटनाच्या दिवशी ऐश्वर्यम चॅलेंजर्स आणि नायर ईगल्स या संघांनी प्रभावी विजय नोंदवत आपली ताकद दाखवून दिली.

पहिल्या सामन्यात सहेज कौर हिच्या नाबाद ५१ धावांच्या शानदार खेळीच्या जोरावर ऐश्वर्यम चॅलेंजर्स संघाने बन्ट वॉरियर्सवर ७ गडी राखून सहज विजय मिळवला. बन्ट वॉरियर्सने प्रथम फलंदाजी करताना २० षटकांत १३७ धावा केल्या. प्रत्युत्तरात ऐश्वर्यम चॅलेंजर्सने १८ षटकांतच लक्ष्य गाठले. सहेज कौर आणि नीती अगरवाल (४७ धावा) यांनी तिसऱ्या गड्यासाठी ९९ धावांची भक्कम भागीदारी करत संघाचा विजय निश्चित केला. सहेज कौर हिला सामनावीर पुरस्काराने गौरविण्यात आले, तर ऋतुजा गिलबिले हिला 'फायटर ऑफ द मॅच' पुरस्कार मिळाला. दुसऱ्या सामन्यात इशा घुले हिने केलेल्या ८७ धावांच्या तडाखेबाज खेळीच्या जोरावर नायर ईगल्स संघाने ऑक्सिरीच संघावर १९ धावांनी मात केली. नायर ईगल्सने प्रथम फलंदाजी करत १५९ धावांचा डोंगर उभारला. प्रत्युत्तरात ऑक्सिरीच संघ १४० धावांपर्यंत मजल मारू शकला. इशा घुले हिला सामनावीर, तर स्वांजली मुळे हिला 'फायटर ऑफ द मॅच' पुरस्कार देण्यात आला. या स्पर्धेचे उद्घाटन आमदार उमा खापरे यांच्या हस्ते पार पडले. यावेळी असोसिएशनचे सचिव राजू कोतवाल, बँक ऑफ महाराष्ट्रचे विभागीय व्यवस्थापक संचयाना कुमार दास, सहसचिव दिलीपसिंह मोहिते, खजिनदार संजय शिंदे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. उद्घाटनप्रसंगी बोलताना आमदार उमा खापरे यांनी महिला क्रिकेटपटूंना प्रोत्साहन देण्यासाठी अशा स्पर्धा अत्यंत महत्त्वाच्या असल्याचे सांगितले. या स्पर्धेतून अनेक गुणवान महिला खेळाडू पुढे येतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. सचिव राजू कोतवाल यांनीही शहरात क्रिकेटचा विकास आणि नवोदितांना संधी देण्याच्या उद्देशाने या स्पर्धेचे आयोजन करण्यात आल्याचे सांगितले. स्पर्धेच्या पहिल्याच दिवशी झालेल्या रंगतदार सामन्यांमुळे प्रेक्षकांना क्रिकेटचा रोमांचक अनुभव मिळाला असून पुढील सामनेही तितकेच उत्साहवर्धक होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.




## मोरवाडी येथे भाजप युवा मोर्चाचे जनआक्रोश आंदोलन

**पिंपरी (दै. संध्या)**

महिलांचा अपमान करणाऱ्या विरोधकांविरोधात भारतीय जनता पार्टी युवा मोर्चाच्या वतीने मोरवाडी येथे जोरदार निदर्शने करण्यात आली. 'नारी-शक्ती वंदन अधिनियम' (महिला आरक्षण विधेयक) विरोध करणाऱ्या काँग्रेस व इंडी आघाडीतील पक्षांविरोधात संताप व्यक्त करत हे जनआक्रोश आंदोलन आयोजित करण्यात आले. देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी महिलांच्या सक्षमीकरणासाठी घेतलेल्या ऐतिहासिक निर्णयाला विरोध केल्याने देशभरात महिलांमध्ये नाराजीची भावना निर्माण झाली असल्याचे यावेळी आंदोलनकर्त्यांनी नमूद केले. महिलांच्या हक्कांसाठी आवाज बुलंद करण्याच्या उद्देशाने मोरवाडी येथे मोठ्या उत्साहात आंदोलन पार पडले. पिंपरी-चिंचवड शहरातील विविध भागांतून मोठ्या संख्येने युवक-युवती, महिला कार्यकर्त्या आणि युवा मोर्चाचे पदाधिकारी या आंदोलनात सहभागी झाले होते. महिला आरक्षणाला विरोध करणाऱ्या पक्षांनी महिलांविरोधी मानसिकता दाखवली असून, त्याचा तीव्र निषेध करण्यात आला. "देशातील नारीशक्तीचा सन्मान करणे हे आमचे कर्तव्य आहे. महिला आरक्षणाला अडथळे निर्माण करणारे पक्ष संपूर्ण स्त्रीशक्तीचा अपमान करत आहेत. हा अपमान भाजप कधीही सहन करणार नाही," अशी ठाम भूमिका आंदोलनादरम्यान मांडण्यात आली. या आंदोलनात युवक अध्यक्ष दिनेश यादव, महिला अध्यक्षा सुजाता पालांडे, अजित कुलथे, दिनेश काटे, प्रसाद कस्पटे, राहुल खाडे, साची दोषी, रवी जांभुळकर, मयूर काळभोर, देवयानी भिंगरकर, दयानंद बंडगर, प्रदीप नाईक, प्रतीक रामगुडे, ऋषिकेश भालेकर, आदम मुलानी, योगिता जाधव, अर्चना शेंडगे, स्वाती वाघमारे, सुनीता शिंग, शिल्पा शिंग, तनया चरखे, कोमल गाडगीरे, प्रतीक्षा देशमुख, भक्ती जकताबा यांच्यासह महिला कार्यकर्त्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# शहरातील वायू प्रदूषणावर लगाम घालण्यासाठी मोठी कारवाई

## २२ आरएमसी प्रकल्पांची तपासणी, नियमभंग करणारे १४ प्रकल्प सील

**पिंपरी (दै. संध्या)**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या पर्यावरण विभागामार्फत शहरातील वाढत्या वायू प्रदूषणावर नियंत्रण मिळविण्यासाठी सातत्याने आणि नियोजनबद्ध पद्धतीने उपाययोजना राबविण्यात येत आहेत. बांधकाम व औद्योगिक आस्थापनांकडून होणाऱ्या धूळकणांच्या प्रदूषणावर आळा घालण्यासाठी महापालिका प्रशासनाने विशेष लक्ष केंद्रित केले असून, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या १७ ऑक्टोबर २०२५ च्या पत्रान्वये आरएमसी प्रकल्प संचालनासंबंधी मार्गदर्शक सूचना आणि नियमांचे काटेकोर पालन सुनिश्चित करण्यासाठी सातत्याने कारवाई सुरू आहे.

या अनुषंगाने महापालिकेच्या उपद्रव शोध पथकांमार्फत शहरातील रेडी मिक्स काँक्रीट प्रकल्पांवर व्यापक तपासणी मोहीम राबविण्यात आली. या मोहिमेदरम्यान एकूण २२ आरएमसी प्रकल्पांची सखोल पाहणी करण्यात आली. तपासणीदरम्यान पर्यावरणीय नियम व मार्गदर्शक सूचनांचे उल्लंघन करणाऱ्या १४ प्रकल्पांवर तात्काळ कारवाई करत त्यांना सील करण्यात आले. यामध्ये धूळ नियंत्रणासाठी आवश्यक यंत्रणा नसणे, परिसरात पाण्याची फवारणी न करणे, उघड्यावर साहित्य साठवणे, तसेच धूळ नियंत्रणासाठी आवश्यक उपाययोजनांचा अभाव आदी गंभीर त्रुटी आढळून आल्या.

उर्वरित प्रकल्पांमध्ये निदर्शनास आलेल्या त्रुटींनुसार संबंधितांना कडक इशारा देण्यात आला असून, हवा गुणवत्ता निरीक्षण प्रणाली तातडीने बसविणे, पाण्याची नियमित फवारणी करणे, संपूर्ण प्रकल्पाभोवती शेड्स उभारणे, धूळ नियंत्रणासाठी योग्य उपाययोजना करणे या बाबी त्वरित पूर्ण करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. नियमांचे पालन न केल्यास कठोर कारवाई करण्यात येईल, असा इशाराही देण्यात आला आहे.

महापालिकेच्या वतीने शहरातील वायू गुणवत्ता सुधारण्यासाठी विविध स्तरांवर उपाययोजना राबविल्या जात असून, औद्योगिक तसेच बांधकाम प्रकल्पांमधून होणाऱ्या प्रदूषणावर नियंत्रण ठेवण्यासाठी विशेष मोहिमा हाती घेतल्या जात आहेत. नागरिकांच्या आरोग्याचे रक्षण आणि पर्यावरण संतुलन राखण्यासाठी अशा कारवायांना पुढील काळातही अधिक गती दिली जाणार आहे, असे पर्यावरण विभागातर्फे यावेळी स्पष्ट करण्यात आले.



शहरातील वायू प्रदूषणावर प्रभावी नियंत्रण मिळविणे ही महापालिकेची सर्वोच्च प्राधान्याची बाब आहे. बांधकाम व औद्योगिक प्रकल्पांनी पर्यावरणीय नियमांचे काटेकोर पालन करणे अत्यावश्यक असून, कोणत्याही प्रकारचा नियमभंग सहन केला जाणार नाही. प्रदूषण करणाऱ्या घटकांवर सातत्याने कारवाई करून शहरातील वायू गुणवत्ता सुधारण्यासाठी महापालिका प्रशासन कटिबद्ध आहे.
**– डॉ. विजय सूर्यवंशी, आयुक्त, पिंपरी चिंचवड महापालिका**

शहरातील आरएमसी प्लांट्स आणि बांधकाम प्रकल्पांनी बांधकाम ठिकाणी धूळ नियंत्रणासाठी आवश्यक उपाययोजना करणे अनिवार्य आहे. नियमभंग करणाऱ्यांवर कोणतीही तडजोड न करता तात्काळ कारवाई केली जात आहे. पुढील काळातही अशी तपासणी मोहीम राबवून प्रदूषण करणाऱ्या घटकांवर कडक नियंत्रण ठेवण्यात येईल.
**– संजय कुलकर्णी, मुख्य अभियंता, पिंपरी चिंचवड महापालिका**

# नागरिकांचे घराचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी महापालिका कटिबद्ध : महापौर रवि लांडगे

## पिंपरी चिंचवड महापालिकेच्या किवळे येथील ७५ सदनिकांची संगणकीय सोडत जाहीर

**पिंपरी (दै. संध्या)**

पिंपरी चिंचवड शहरातील आर्थिक दुर्बल घटकांतील प्रत्येक पात्र कुटुंबाला सुरक्षित आणि मूलभूत सुविधांनी सुसज्ज घर मिळाले पाहिजे, यासाठी पिंपरी चिंचवड महानगरपालिका सातत्याने प्रयत्नशील आहे. आर्थिक दुर्बल घटकांच्या किवळे प्रकल्पांतील सदनिकांची संगणकीय सोडत काढण्यात आली आहे. या सोडतीमध्ये निवड झालेल्या नागरिकांचे शहरातील स्वतःच्या हक्काच्या घराचे स्वप्न पूर्ण झाले आहे, असे प्रतिपादन महापौर रवि लांडगे यांनी केले.



पिंपरी चिंचवड महापालिकेतर्फे किवळे येथील आर्थिक दुर्बल घटकांच्या उर्वरित ७५ सदनिकांची चिंचवडमधील ऑटो क्लस्टर येथील सभागृहात महापौर रवि लांडगे यांच्या हस्ते संगणकीय सोडत काढण्यात आली. यावेळी ते बोलत होते. याप्रसंगी महापौर रवि लांडगे यांच्या हस्ते सोडतीतील विजेत्या सदनिका लाभार्थ्यांना प्रतिनिधिक स्वरूपात पत्रांचे वाटप करण्यात आले.

यावेळी विरोधी पक्षनेते भाऊसाहेब भोईर, आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी, अतिरिक्त आयुक्त कुलदीप जंगम, मुख्य माहिती व तंत्रज्ञान अधिकारी विजय बोरुडे, उपायुक्त अण्णा बोदडे, सहाय्यक आयुक्त डी. डी. कांबळे यांच्यासह लाभार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

महापौर रवि लांडगे पुढे म्हणाले, समाजातील सर्व घटकांना हक्काचं घर मिळावं हे पंतप्रधान नरेंद्र मोदींचं स्वप्न आहे. पिंपरी चिंचवड शहरात नागरिकांचे घराचे स्वप्न केंद्र व राज्य सरकारच्या सहकार्यातून पिंपरी चिंचवड महापालिका पूर्ण करीत आहे, असे देखील महापौर रवि लांडगे यांनी सांगितले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना उपायुक्त अण्णा बोदडे यांनी सांगितले की, शहरातील आर्थिक दुर्बल घटकांतील नागरिकांना सुरक्षित व मूलभूत सुविधांनी युक्त निवारा उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने ही प्रक्रिया राबविण्यात येत आहे. विजेत्या लाभार्थ्यांनी स्वहिस्सा रक्कम भरणे व अनुषंगिक बाबींसाठी साठी झोपडपट्टी विभागात संपर्क साधावा असे देखील म्हणाले.

पिंपरी चिंचवड शहरातील आर्थिक दुर्बल घटकांना सुरक्षित निवारा उपलब्ध करून देणे ही महापालिकेची प्राधान्याची बाब आहे. या प्रकल्पांमध्ये पारदर्शकता, गुणवत्ता आणि वेळेचे काटेकोर पालन सुनिश्चित केले जात आहे. नागरिकांचे घराचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी महापालिका कटिबद्ध असून आगामी काळातही अशा उपक्रमांना गती देण्यात येईल.
**– डॉ. विजय सूर्यवंशी, आयुक्त, पिंपरी चिंचवड महापालिका**

# 'ड' आणि 'ह' क्षेत्रीय कार्यालयांतील अनधिकृत बांधकामांवर महापालिकेची कारवाई



**पिंपरी (दै. संध्या)**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या बांधकाम परवानगी व अनधिकृत बांधकाम नियंत्रण विभागाच्या वतीने शहरातील विविध भागांमध्ये अनधिकृत बांधकामांविरोधात व्यापक कारवाई मोहीम हाती घेण्यात आली आहे. या मोहिमेदरम्यान ड क्षेत्रीय कार्यालयांतर्गत पिंपळे गुरव येथील ५३० चौ.मी. तसेच ह क्षेत्रीय कार्यालयांतर्गत नवी सांगवी परिसरातील १ हजार ५४५ चौ.मी. अनधिकृत पद्धतीने उभारण्यात आलेल्या आरसीसी बांधकामांवर निष्कासनाची कारवाई करण्यात आली. तसेच इतर नियमबाह्य उभारण्यात आलेली बांधकामे देखील पाडण्यात आली.

मागील आठवड्यात पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या क्षेत्रीय कार्यालयनिहाय करण्यात येणाऱ्या अनधिकृत बांधकामे व अतिक्रमणांच्या विरोधातील धडक निष्कासन कारवाईचा आढावा आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी नुकताच घेतला. त्यानंतर शहरातील अनधिकृत बांधकामे व अतिक्रमणांविरोधात कारवाई अधिक सक्त करण्याचे निर्देश त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिले होते. त्यानुसार अतिरिक्त आयुक्त तृप्ती सांडभोर यांच्या मार्गदर्शनाखाली संबंधित अधिकाऱ्यांनी शहरातील विविध भागांमध्ये व्यापक कारवाई मोहीम हाती घेतली आहे.

ड क्षेत्रीय कार्यालयांतर्गत क्षेत्रीय अधिकारी पूजा दुधनाळे यांच्या नेतृत्वात वार्ड क्र. २९, पिंपळे गुरव येथील गणेशनगर, साईनाथनगर, लक्ष्मीनगर परिसरातील एकूण ५३० चौ.मी. आरसीसी बांधकामांवर निष्कासन कारवाई करण्यात आली. या कारवाईवेळी उपअभियंता शाम गर्जे, बीट निरीक्षक विक्रम चव्हाण, राहुल निकम, उमेश लोंढे, ओंकार देशमुख, पूजा राठोड तसेच १३ एमएसएफ जवान, ७ मजूर, २ पोलीस, २ ट्रॅक्टर ब्रेकर आणि १ जेसीबी सहभागी होते.

ह क्षेत्रीय कार्यालयांतर्गत वार्ड क्र. ३१ मधील नेताजी नगर, गांगर्डे नगर, विनायक नगर, गजानन नगर या भागात क्षेत्रीय अधिकारी पूजा दुधनाळे यांच्या नेतृत्वात एकूण १ हजार ५४५ चौ.मी. आरसीसी बांधकामांवर निष्कासन कारवाई करण्यात आली. या धडक कारवाईत उपअभियंता प्रताप मोरे, कनिष्ठ अभियंता जयवंत रोकडे, बीट निरीक्षक शाबोद्दिन बागबान, रोहन कांबळे, प्रफुल्ल भोकरे, सुरज माने तसेच १८ एमएसएफ जवान, १० मजूर, २ ट्रॅक्टर ब्रेकर आणि १ जेसीबी यांच्या सहाय्याने ही कारवाई पार पडली.

महापालिकेच्या पथकाने केलेल्या तपासणीत विविध ठिकाणी विनापरवानगी आरसीसी बांधकामे, शेड तसेच इतर स्वरूपाची अनधिकृत वाढ आढळून आली. त्यानुसार संबंधितांवर कारवाई करत सुमारे काही हजार चौरस फूट क्षेत्रफळातील बांधकामे हटविण्यात आली.

पिंपरी चिंचवड शहरातील अनधिकृत बांधकामे व अतिक्रमणांवर कठोर कारवाई करण्यात यावी. या कारवाईचा नियमित आढावा घेऊन संबंधित अधिकाऱ्यांनी सातत्याने पाहणी करावी. रस्त्यावर स्टॉल लावणाऱ्या फेरीवाल्यांवर देखील कारवाई करण्यात यावी. नागरिकांच्या सुरक्षेच्या तसेच शहराच्या नियोजनबद्ध विकासाच्या दृष्टीने ही कारवाई अधिक प्रभावीपणे राबविण्यात यावी. नागरिकांनीही नियमांचे पालन करून प्रशासनास सहकार्य करावे.
**– डॉ. विजय सूर्यवंशी, आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका**

## थोडक्यात पण महत्वाचे...



## बहरात आलेल्या बाजरीच्या मळणीला सुरुवात

नारायणगाव (दैनिक संध्या) : जुन्नर, आंबेगाव, खेड, शिरूर या तालुक्यात उन्हाळी बाजरीचे पीक हे मोठ्या प्रमाणात घेतले जाते. या बाजरीचे योग्य व्यवस्थापन आणि वेळेवर पाणी दिल्यामुळे हे पीक काही ठिकाणी फुलोऱ्यात तर काही ठिकाणी या पिकाच्या मळणीला सुरुवात झाली आहे. यावर्षी उत्पादन हे मोठ्या प्रमाणात निघण्याची शक्यता शेतकऱ्यांकडून व्यक्त केली जात आहे. शेतकरी शेळके यांनी सांगितले की, या बाजरी पिकासाठी बियाण्यावर 600 रुपये, तननाशकासाठी 2000 रुपये, खुरपणीसाठी 10000 रुपये, खतासाठी 2000 रुपये तसेच ट्रॅक्टर साठी 2000 रुपये खर्च केला आहे.या बाजरीच्या मळणीतून खर्च वजा जाता सुमारे 50 हजार रुपयांपर्यंत नफा मिळण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. उन्हाळ्यातील हवामानाचा योग्य फायदा घेत शेतकऱ्यांनी पिकाची काळजी घेतल्यास उत्पादनात वाढ होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.




## नारायणगाव येथे पराग पतसंस्थेच्या नवीन शाखेचे उद्घाटन संपन्न

नारायणगाव (दैनिक संध्या) : पराग नागरी सहकारी पतसंस्था, मर्यादित मंचर यांच्या नारायणगाव येथील नवीन शाखेचे उद्‌घाटन, मोबाईल ॲप व क्यूआर कोडचा प्रारंभ मंगळवार दि. 21 एप्रिल 2026 रोजी माजी सहकार मंत्री दिलीप वळसे पाटील यांच्या हस्ते करण्यात आला. या वेळी माजी आमदार अतुल बेनके, शरद सहकारी बँकेचे अध्यक्ष देवेंद्रशेठ शहा,ग्रामोन्नती मंडळाचे कार्याध्यक्ष अनिल मेहेर, जुन्नर बाजार समितीचे सभापती संजय काळे, उपसभापती निवृत्ती काळे, सभापती कैलास काळे, स्व. वल्लभ बेनके औद्योगिक वसाहतीचे अध्यक्ष अमित बेनके,राजश्री बोरकर,विकास दरेकर, अशोक गांधी, पराग पतसंस्थेचे अध्यक्ष जितेंद्र बांगर, उपाध्यक्ष सचिन शहा, सुभाष मोरमारे,प्रकाश घोलप, सर्व संचालक, अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. सहकारमंत्री दिलीप वळसे पाटील बोलताना म्हणाले,उत्तम व्यवस्थापन, पारदर्शक व्यवहार व सुयोग्य आर्थिक नियोजनाच्या बळावर उद्योजक देवेंद्रशेठ शहा यांचा पाठिंबा असलेल्या पराग नागरी सहकारी पतसंस्था अल्पावधीत ठेवी, कर्जवाटप व नफ्यात भक्कम वाढ साधत सहकार क्षेत्रात विश्वासार्ह पर्याय म्हणून उदयास येऊन प्रगती केली आहे.त्याअनुषंगाने या पतसंस्थेचा नारायणगाव येथे शुभारंभ होऊन ही पतसंस्था नारायणगाव परिसरातील व्यापारी शेतकरी यांना उत्तम सेवा देईल असा विश्वास यावेळी त्यांनी व्यक्त केला. उद्योजक शहा म्हणाले,पराग पतसंस्थेचे कार्यक्षेत्र पाच जिल्ह्यात आहेत. 2016 साली कामगारांसाठी स्थापन झालेल्या या पतसंस्थेने अल्पावधीत प्रगती साधली आहे. पतसंस्थेत 54 कोटी 48 लाख रुपयांच्या ठेवी असून 44 कोटी 7 लाख रुपयांचे कर्ज वाटप केले आहे.पतसंस्थेला एक कोटी 22 लाख रुपये नफा झाला आहे. प्रास्ताविक पतसंस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी सदाशिव भुसारी यांनी केले.

## तमाशा कलेचे हळवे व्यक्तिमत्व काशिनाथ आल्हाट: राजेंद्र मोरे तमाशा अभ्यासक

नारायणगाव (दैनिक संध्या) : राष्ट्रपती पारितोषिक विजेत्या तमाशा सम्राज्ञी विठाबाई भाऊ नारायणगावकर तमाशा पंढरी नारायणगाव येथे दरवर्षी शिवरात्रीला 35 ते 40 तमाशा फडांच्या राहूट्या लागतात. तमाशा कलेचे अभ्यासक काशिनाथ आल्हाट यांच्याशी चर्चा करण्याच्या निमित्ताने तमाशा पंढरीला भेट दिली. त्या चर्चेतून जवळपास चार तास "तमाशा कला" या विषयात रंगून गेले. दिलखुलास चर्चा झाली. "विचाराअंती हृदयातील विचार ओठावर आले."! 'तमाशा व कलावंत टिकवण्यासाठी ऐकी, सकारात्मक दृष्टिकोन महत्वाचा!' दिनांक २१/४/२०२६ रोजी राष्ट्रपती पदक विजेत्या तमाशासाम्राज्ञी विठाबाई भाऊ मांग नारायणगावकर तमाशा कला पंढरी नारायणगाव येथे सदीच्छा भेट दिली.याप्रसंगी राज्य पुरस्कार प्राप्त हलगी सम्राट केरबा पाटील यांचे चिरंजीव,तमाशा कलेचे अभ्यासक, तमाशा कलेचे जाणकार, मा. काशिनाथ आल्हाटसर नारायणगाव यांचेशी चर्चा केल्यानंतर ते म्हणाले की, तमाशाचा प्रचार,प्रसार हि माध्यमे शासनस्तरावर, गावस्थळावर, तमाशा फडस्तरावर, कलेविषयी सकारात्मक दृष्टिकोनातून सतत राबवली पाहिजेत. त्यामुळे तमाशाची एक चांगली प्रतिमा रसिकांच्या मनामध्ये रुजेल व आजचे तरुण रसिक तमाशा आवडीने पाहतील." 'तमाशाफड हा एक सामुदायिक कार्यक्रम आहे .तिथे प्रत्येकाच्या सहकार्याची एकमेकांना गरज असते' .'एकटा माणूस काही करू शकत नाही."!तमाशा फडांमध्ये विविध कुटुंबातील असंख्य कलावंत एकत्र येतात. या सर्वांना बांधण्याचे काम मॅनेजर यांनी उत्कृष्टपणे केले पाहिजे. सगळ्याचे स्वभाव एकत्रित करून तमाशा फड मजबूत करण्यासाठी प्रयत्न केला पाहिजे. तमाशा फडात एकमेकांना जीव लावणारे कलावंत पाहिजेत. पूर्वीच्या काळी दोन महिने जरी तमाशा असला ,तरी सिझन संपल्यानंतर कलावंत घरी जात त्यावेळी फड मालक,कलावंत एकमेकांच्या गळ्यात पडत, डोळ्यात अश्रू येत होते. इतका जीव, ऋणानुबंध आणि जिव्हाळा, आपलेपणा दोन महिने कालावधीमध्ये एकमेकांना लागत होता. नंतरच्या काळातही कुणी कुणाला विसरत नसत. "कला व कलावंत हे कलेसाठी एकनिष्ठ होते. पैसा हा दुय्यम होता प्रथम दर्जामध्ये कला होती आणि कलेकरता फडासाठी आपल्याला झटले पाहिजे आणि रंगमंचकावर कला सादर करणे ही आपली जबाबदारी असे मानणारे पूर्वीचे कलावंत होते."कलावंत मोठा होताना, तमाशाफड मोठा होत असतो."! कलावंतांचा नावलौकिक त्याचवेळी होत असते त्यावेळी त्यांच्या पाठीमागे पूर्व पुण्याई असावी लागते. "तमाशा व कलावंत टिकवण्यासाठी मनापासून ऐकी, सकारात्मक दृष्टिकोन खूप महत्त्वाचा असतो". तमाशा अभ्यासक राजेंद्र मोरे म्हणाले,काल दुपारपासून आतापर्यंत मी अल्हाट सरांच्या सहवासात आहे. नारायणगाव येथे रात्री आल्हाटसर यांच्या घरी मुक्काम होतो.आल्हाट सरांचे कुटुंब तमाशाचा वारसा असणारे आहे. आजही आल्हाटसरांना गरिबीची व वडिलांच्या कलेची व कष्टाची किंमत आहे.

# पाटस परिसरात अमली पदार्थांची तस्करी : पोलिसांची मोठी कारवाई

**दौंड (दै. संध्या)**

दौंड तालुका पारस येथे एका तरुणाकडे मेफेड्रोन हा ड्रग्ज अमली पदार्थ मिळून आल्याने एकच खळबळ उडाली. संबंधित तरुणाने हा अंमली पदार्थ विक्रीसाठी आणल्याचे समोर आले. गुरुवारी (ता.२३) मध्यरात्री पाटस - कुसेगाव रस्त्यावर पोलिसांनी ही कारवाई केली. याप्रकरणी आदित्य माने (रा. पाटस, ता. दौंड, जि. पुणे) असे अटक केलेल्या आरोपीचे नाव आहे. सदर पाटस परिसरामध्ये



अंबिका नगर डोंगरेश्वर श्रीसिमेंट कंपनी या भागामधे नशेली अमली पदार्थाचे मोठ्या प्रमाणामधे विक्री होते. असे नागरीकांचे म्हणणे आहे.

याबाबत यवत पोलीस स्टेशन निरिक्षक नारायण देशमुख व उपनिरीक्षक विजय कोल्हे यांनी माहिती दिली. पाटस कुसेगाव रस्त्यावर एक जण मेफेड्रॉन हा घातक ड्रग्ज अमली पदार्थ विक्रीसाठी घेऊन येणार असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. त्यानुसार पोलीस निरीक्षक नारायण देशमुख, पोलीस उपनिरीक्षक विजय कोल्हे, सहाय्यक फौजदार महेंद्र फणसे,पोलिस हवालदार गुरुनाथ गायकवाड, विकास कापरे,शौकत मद्दी, विनोद काळे, जालिंदर बंडगर या पोलीस पथकाने पाटस- कुसेगाव रस्त्यावर बारकाईने लक्ष ठेवले. मध्यरात्री दीडच्या सुमारास आरोपी आदित्य माने हा संशयितरित्या कालव्या लगत दिसून आला. पोलीस पथकाने त्यास अडवून चौकशी केली. त्यावेळी काही प्रकार समोर आला. त्याच्याकडे मेफेड्रोन हा अतिशय घातक ड्रग्ज अमली पदार्थ मिळून आला. पोलिसांनी त्याला तात्काळ ताब्यात घेऊन पोलीस स्टेशन येथे चौकशी सुरू केली.यावेळी त्याच्याकडे अल्पप्रमाणात ड्रग मिळाले. आरोपी माने यांच्याविरुद्ध नियमानुसार गुन्हा दाखल करून त्यास अटक करण्यात आली.

याप्रकरणी पुढील तपास निरक्षक नारायण देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक विजय कोल्हे करीत आहेत. दरम्यान पाटस परिसरात ड्रग्ज आढळून आल्याने किंबहुना विक्री करण्यासाठी आणल्याने एकच खळबळ उडाली. हा प्रकार किती दिवसापासून सुरू होता. तसेच हा अंमली पदार्थ कोणाला विक्रीकरण्यासाठी आणला होता. या बाबी तपासात निष्पन्न होणार असल्याचे पोलिसांचे म्हणणे आहे

## कदमवाकवस्ती व लोणी काळभोर येथील लाईटच्या खांबाना बँनरचा विळखा

### ग्रामपंचायतीत राजकीय दबावापोटी की अर्थपूर्ण व्यवहारापोटी बँनरकडे दुर्लक्ष?



**लोणी काळभोर (दै. संध्या)**

आपली जाहिरात नागरिकांना कशी ठळक दिसेल यासाठी नागरिकांच्या जिवाची पर्वा न करता पुणे - सोलापूर महामार्गावरील मधोमध असणाऱ्या लाईटच्या खांबाना जाहिरातीचे बँनर लावले जात असुन त्यामध्ये आपल्या वस्तुची ,नवीन दुकानाची व दवाखान्याच्या जाहिरातीच्या निमित्ताने नागरिकांपर्यंत आपण पोहचलो पाहिजे हेच एकमेव उद्दिष्ट असुन बँनर बघुन आपली वस्तुसाठी, आपल्या दुकानात खरेदी साठी ग्राहक आकर्षित करण्यासाठी अशी अपेक्षा असुन त्यासाठी लाखोंचा खर्च या बँनरवर केला जातो . लोणी काळभोर व कदमवाकवस्ती हद्दीतील पुणे - सोलापूर महामार्गावरील मध्ये असणाऱ्या लाईटच्या खांबावर हे धोकादायक बँनर लावले जात असुन त्याकडे ग्रामपंचायतीचे पुर्णपणे दुर्लक्ष झाले आहे . त्यामुळे नागरिकांच्या जिवाला धोका संभवतो .हे बँनर लावले की दोन ते तीन दिवसांनी त्याची पक्कड सैल होऊन ते वाकडे तिकडे झाले आहेत . तर काही बँनर रस्त्यावर पडलेले आहेत . हे बँनर एवढे खाली लावले जातात की या बँनरला लावलेल्या लाकडी पट्टी मुळे वाहनचालकांना इजा होण्याची शक्यता आहे . कदमवाकवस्ती व लोणी काळभोर हद्दीतील महामार्गावरील लाईटच्या खांबाना लावलेल्या जाहिरातीचे बँनर वाकडे तिकडे होऊन वाहनचालकांना धोका संभवत आहे . असे धोकादायक बँनर लावले जात असुन या ग्रामपंचायतीचे याकडे पुर्णपणे दुर्लक्ष दिसून येत आहे. पुर्व हवेलीत बँनरवाले मोकाट सुटले असुन ग्रामपंचायतीत राजकीय दबावापोटी की अर्थपूर्ण व्यवहारापोटी अशा जाहिरातदार बँनरकडे दुर्लक्ष करीत आहे का ?अशी शंका नागरिकांना पडली आहे . पण त्यामुळे नागरिकांच्या जिवाला मात्र धोका संभवतो . उच्च न्यायालयाने स्पष्ट निर्देश दिलेले असतानाही हे घडत आहे. हा सरळसरळ न्यायालयाचा अवमान असल्याचे अनेक नागरिकांनी बोलून दाखविले .त्यामुळे अशा धोकादायक बँनरवर कायमची बंदी ग्रामपंचायतीने घालावी अशी मागणी नागरिकांनी केली आहे .

## कायदा पालनाने व्यक्तीचे संरक्षण व स्वातंत्र्य अबाधित राहते - न्या. ए.एम.हुसेन

**नारायणगाव (दै. संध्या)**

महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, पुणे यांच्या वार्षिक कार्यक्रम पत्रिकेनुसार अनंतराव कणसे होमिओपॅथिक मेडिकल कॉलेज व हॉस्पिटल, आळे (ता. जुन्नर) येथे (दि. १५ एप्रिल) रोजी विद्यार्थ्यांसाठी कायदेविषयक जनजागृती शिबिराचे आयोजन करण्यात आले.

या शिबिराचे आयोजन एस. बी. शेलार (जिल्हा न्यायाधीश-१ तथा अध्यक्ष, तालुका विधी सेवा समिती, जुन्नर) यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ए. एम. हुसेन (दिवाणी न्यायाधीश, वरिष्ठ स्तर, जुन्नर) होते.

यावेळी अध्यक्षीय भाषणात मा. न्यायाधीश हुसेन यांनी




महाविद्यालयांमध्ये होणाऱ्या रॅगिंगच्या प्रकारांवर भाष्य करत रॅगिंग हा दंडनीय गुन्हा असून अशा प्रकारांना आळा घालणे अत्यावश्यक असल्याचे सांगितले. तसेच प्रत्येक महाविद्यालयात ‘विशाखा समिती’ स्थापन करणे गरजेचे असून कायद्याचे पालन केल्यासच व्यक्तीचे संरक्षण व स्वातंत्र्य अबाधित राहते, असे प्रतिपादन त्यांनी केले.

शिबिरात विविध कायद्यांबाबत तज्ज्ञ मार्गदर्शन करण्यात आले. यामध्ये पी.सी आणि पी.एन. डी. टी कायदा १९९४ या विषयावर ॲड. वर्षा टिंगरे, पोक्सो कायदा २०१२ या विषयावर ॲड. कौशल पादीर, महिलांच्या सुरक्षितता व गोपनीयता या विषयावर ॲड.आदेश घाटपांडे, पीडित नुकसानभरपाई योजना विषयावर ॲड. वैशाली देवकर यांनी सविस्तर माहिती दिली.

या कार्यक्रमाला जुन्नर तालुका वकील बार असोसिएशनचे अध्यक्ष ॲड.हेमंत हाडवळे, उपाध्यक्ष ॲड.निलीमा शेरकर, तसेच ॲड. वैशाली देवकर, ॲड.वर्षा टिंगरे, ॲड.कौशल पादीर, ॲड.आदेश घाटपांडे, ॲड.सौरव सोनवणे यांची उपस्थिती होती. तसेच तालुका विधी सेवा समितीचे समन्वयक प्रशांत मोरतळे, अनंतराव कणसे मेडिकल कॉलेजचे चेअरमन डॉ.कमलेश घोलप, डॉ.राशी मोरडिया, प्राध्यापक, डॉक्टर व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमाची प्रस्तावना ॲड.हेमंत हाडवळे यांनी केली. सूत्रसंचालन डॉ.राशी मोरडिया यांनी तर आभार प्रदर्शन प्रशांत मोरतळे यांनी केले सदर कायदेविषयक शिबिर मोठ्या उत्साहात व यशस्वीरित्या पार पडले.

## राहू बेट परिसरात गुन्हेगारी वाढली; बीट अंमलदारांच्या बदलाची मागणी

**पुणे (दै. संध्या)**

दौंड तालुक्यातील राहू बेट परिसरात अलीकडील काळात गुन्हेगारी घटनांमध्ये वाढ होत असल्याची चिंताजनक बाब समोर येत आहे. परिसरात चोरी, अवैध धंदे आणि इतर बेकायदेशीर प्रकारांना उधाण आल्याचे स्थानिक नागरिकांचे म्हणणे आहे.

या पार्श्वभूमीवर संबंधित पोलीस बीट अंमलदारांची खांदेपालट (बदली) करण्याची मागणी जोर धरू लागली आहे. नागरिकांच्या मते, सध्याच्या यंत्रणेकडून अपेक्षित नियंत्रण ठेवले जात नसल्यामुळे गुन्हेगारीला आळा बसत नाही.

दरम्यान, दौंड तालुक्याचे आमदार राहुल कुल यांच्या



मतदारसंघातील या भागात अवैध धंदे खुलेआम सुरू असल्याचेही आरोप होत आहेत. यामुळे कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाला असून, वरिष्ठ अधिकाऱ्यांनी तातडीने लक्ष घालून योग्य ती कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांकडून केली जात आहे.

स्थानिकांनी पोलीस प्रशासनाने अधिक कडक उपाययोजना करून परिसरात शांतता आणि सुरक्षितता निर्माण करावी, अशी अपेक्षा व्यक्त केली आहे.

## नारायणगाव येथे पत्रकार संवाद कार्यक्रम संपन्न

**नारायणगाव (दै. संध्या)**

नारायणगाव येथे संपादिका स्नेहा बारवे यांनी आयोजित केलेला 'पत्रकार संवाद' कार्यक्रम जुन्नरचे माजी आमदार अतुल बेनके, माजी सहकार मंत्री दिलीप वळसे पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला .लोकशाहीमधील माध्यमांचे स्थान आणि वास्तव, तसेच 'कोण काय म्हणाले' यापलीकडे जाऊन 'कोण असे का म्हणाले' याचा शोध घेणारी शोधपत्रकारिता, या विषयावर उपस्थित पत्रकार बांधवांशी दिलीप वळसे पाटील यांनी सखोल चर्चा केली. तसेच लोकशाहीचा चौथा स्तंभ असलेल्या पत्रकारितेचे महत्त्व आणि आजच्या बदलत्या काळातील माध्यमांची भूमिका यावर पत्रकारांशी संवाद साधला. निर्भीड आणि निष्पक्ष पत्रकारिता हीच समाजमनाचे प्रतिबिंब असते, असे मत यावेळी व्यक्त केले.

या प्रसंगी शरद सहकारी बँकेचे अध्यक्ष देवेंद्रजी शाह, जुन्नर बाजार समितीचे सभापती संजय काळे, बाजार समितीचे सभापती निलेश स्वामी थोरात, डी. के. वळसे पाटील आदी मान्यवर व यांच्यासह पत्रकार बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## २६ एप्रिल रोजी अंध भगिनींचा विवाह सोहळा

### मामाच्या गावाची सफर २३ एप्रिल पासून; सेवा मित्र मंडळ ट्रस्टतर्फे आयोजन

**पुणे (दै. संध्या)**

मामाच्या गावाची सफर वंचित आणि विशेष मुलांना अनुभविता यावी, याकरीता शुक्रवार पेठेतील सेवा मित्र मंडळ ट्रस्ट व पुणेकरांच्या सहभागाने मामाच्या गावची सफर हा अनोखा उपक्रम राबविला आहे. यासोबतच दृष्टीहिन जोडप्यांचा विवाह सोहळ्याचे आयोजन देखील करण्यात आले आहे.

शुक्रवार पेठेत सेवा मित्र मंडळ चौकात दि २३ ते २६ एप्रिल २०२६ पर्यंत हा उपक्रम होणार आहे.

मामाच्या गावची सफर या उपक्रमासोबतच दृष्टीहिन असलेल्या जोडप्यांच्या विवाह सोहळ्याचे आयोजन देखील केले जाते.

लुई ब्रेल अंध अपंग कल्याण संस्था यांच्या समवेत या उपक्रमाचे आयोजन करण्यात येते. मामाच्या गावची सफर या उपक्रमाचे यंदा २७ वे वर्ष आहे.

दि.२३ एप्रिल रोजी दुपारी ४ वाजता भाचे मंडळींचे स्वागत होणार आहे. बँड, बग्गी, उंट, घोडे, मिकी माऊस हे भाचे मंडळीच्या स्वागताला येणार आहेत.

दिनांक २४ एप्रिल रोजी दिवसभर विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. तसेच संध्याकाळी लुई ब्रेल अंध अपंग संस्थेच्या वतीने ऑर्केस्ट्राचा विशेष कार्यक्रम होणार आहे.

यासोबतच मेहंदीचा कार्यक्रम देखील होणार आहे. दिनांक २५ एप्रिल रोजी भाचे मंडळींचा निरोप समारंभ होणार आहे.

दिनांक २६ एप्रिल रोजी अंध भगिनींचा विवाह सोहळा संपन्न होणार आहे. विवाह सोहळ्यापूर्वी साखरपुडा आणि हळदीचा कार्यक्रम होणार आहे. विवाहाचे धार्मिक विधी दुपारी २ वाजता तर ४.३० वाजता नवरदेवाची वरात निघणार आहे. मुख्य विवाह सोहळा सायंकाळी ६ वाजता संपन्न होणार आहे.

# गावठी कट्टे बाळगल्या प्रकरणी ३ जण अटकेत

### ५ लाख ७२ हजार रु. किमतीचा मुद्देमाल जप्त : स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई

**नारायणगाव (दै. संध्या)**

नारायणगाव पोलीस स्टेशनच्या हद्दीत निमगाव सावा कारफाटा येथे बेकायदेशीरपणे गावठी कट्टे बाळगल्याप्रकरणी तीन जणांना अटक करण्यात आली असून त्यांच्याकडून दोन गावठी कट्टे, दोन जिवंत काडतूसे तसेच चारचाकी इर्टिका गाडी असा एकूण ५ लाख ७२ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. याबाबत सविस्तर माहिती अशी की, पुणे ग्रामीण जिल्ह्यामध्ये बेकायदेशीर अग्नीशस्त्रे संबंधी कारवाई करण्याच्या सूचना पोलिस अधीक्षक संदीप गिल्ल यांचे मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक प्रमोद क्षीरसागर यांनी स्थानिक




गुन्हे शाखेच्या पथकाला दिल्या होत्या. त्यानुसार आज रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पथक जुन्नर विभागात पेट्रोलिंग करत असताना सहाय्यक पोलीस निरीक्षक महादेव शेलार यांना गोपनीय बातमीदारा मार्फत बातमी मिळाली की नारायणगाव पोलीस स्टेशन हद्दीतील कारफाटा, निमगावसावा येथे इसम नामे राहुल सुरेश साळवे रा.साकोरी तर्फे बेल्हे ता. जुन्नर हा त्याच्या दोन साथीदारांसह त्याच्या ताब्यातील MH 06 BE 4626 इर्टिगा गाडी घेऊन येणार आहे व त्याच्याकडे दोन गावठी कट्टे आहेत. मिळालेल्या बातमी नुसार गुन्हे शाखेच्या पथकाने दोन पंचा समक्ष सदर ठिकाणी सापळा लाऊन १) राहुल साळवे रा. साकोरी ता. जुन्नर तसेच त्याचे दोन साथीदार नामे २) दर्पण सुरेश पवार वय २२ रा. नारायणगाव, ता.जुन्नर ३) तेजस संदीप मातेले वय २१ रा. नारायणगाव, ता. जुन्नर यांना ताब्यात घेऊन त्यांची पंचासमक्ष अंगझडती घेतली असता राहुल साळवे तसेच तेजस मातेले यांच्या कमरेला खोसलेले दोन गावठी कट्टे व दोन जिवंत काडतूसे मिळून आली. त्यांच्या ताब्यातून सदर गावठी कट्टे, वाहन असा एकूण ५,७२,००० रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला असून त्याबाबत नारायणगाव पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल केला आहे. सदर आरोपीची वैद्यकीय तपासणी करून पुढील कार्यवाहीसाठी नारायणगाव पोलीस स्टेशनच्या ताब्यात दिले आहे. सदरची कार्यवाही ही पुणे ग्रामीण पोलीस अधीक्षक श्री संदिप गिल्ल सो, अप्पर पोलीस अधीक्षक श्री रमेश चोपडे सौ, उपविभागीय पोलिस अधिकारी श्री धनंजय पाटील सो यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक प्रमोद क्षीरसागर, सहाय्यक पोलीस निरीक्षक महादेव शेलार, सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रवीण सपांगे, सहाय्यक फौजदार दिपक साबळे, पोलीस हवालदार संदीप वारे, अक्षय नवले यांनी केली आहे. सदर गुन्ह्याचा पुढील तपास नारायणगाव पोलीस करत आहे.

## थोडक्यात पण महत्वाचे...

### जिजामाता रुग्णालयातील आरोग्य सेवांचा उपमहापौर शर्मिला बाबर यांनी घेतला आढावा




पिंपरी (दैनिक संध्या) : पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या पिंपरी येथील जिजामाता रुग्णालयास उपमहापौर शर्मिला बाबर यांनी भेट देऊन रुग्णालयातील विविध आरोग्य सेवांचा सखोल आढावा घेतला. रुग्णालयातील स्वच्छता, औषधसाठा, डॉक्टर व परिचारिका यांची उपलब्धता तसेच उपचार प्रक्रियेची कार्यक्षमता याबाबत त्यांनी प्रत्यक्ष पाहणी केली. यावेळी त्यांनी रुग्णांची विचारपूस करून त्यांच्या प्रकृतीविषयी जाणून घेतले. उपचारासाठी येणाऱ्या नागरिकांना कोणत्याही प्रकारची गैरसोय होऊ नये, यासाठी आवश्यक त्या सुविधा तत्काळ उपलब्ध करून देण्याच्या सूचना त्यांनी वैद्यकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांना दिल्या. तसेच रुग्णालयातील सेवा अधिक सक्षम, गतिमान आणि नागरिकाभिमुख करण्यावर त्यांनी भर दिला. यावेळी बोलताना उपमहापौर शर्मिला बाबर म्हणाल्या, 'पिंपरी चिंचवड महापालिकेच्या माध्यमातून नागरिकांना दर्जेदार आणि परवडणाऱ्या आरोग्य सेवा देणे ही आपली प्राथमिक जबाबदारी आहे. जिजामाता रुग्णालयात येणाऱ्या प्रत्येक रुग्णाला वेळेवर आणि योग्य उपचार मिळाले पाहिजेत, यासाठी प्रशासनाने अधिक दक्षता घ्यावी. रुग्णालयातील स्वच्छता, औषधांची उपलब्धता आणि वैद्यकीय कर्मचाऱ्यांची तत्परता याकडे विशेष लक्ष संबंधित विभागाने द्यावे. नागरिकांचा विश्वास टिकवून ठेवण्यासाठी आरोग्य सेवांमध्ये सातत्याने सुधारणा करणे आवश्यक असून, त्यासाठी सर्व संबंधितांनी समन्वयाने काम करावे, असे देखील त्यांनी सांगितले.

### पिंपरीत साकारणार त्यागमूर्ती माता रमाईंचे भव्य स्मारक

पिंपरी (दैनिक संध्या) : पिंपरी-चिंचवड शहराच्या वैभवात भर टाकणारा आणि सामाजिक कृतज्ञतेची साक्ष देणारा एक ऐतिहासिक निर्णय आज घेण्यात आला. शहराच्या मध्यवर्ती पिंपरी चौकात उभारण्यात येणाऱ्या माता रमाई स्मारकाच्या स्थापत्य कामांना महानगरपालिकेच्या स्थायी समितीने आज अधिकृत मंजुरी दिली. या निर्णयामुळे नागरिकांच्या दीर्घकालीन मागणीला आता मूर्त स्वरूप मिळणार असून, लवकरच या स्मारकाच्या प्रत्यक्ष कामाला सुरुवात होणार आहे. महापालिकेच्या मुख्य प्रशासकीय इमारतीतील दिवंगत महापौर मधूकर पवळे सभागृहात ही महत्त्वाची बैठक पार पडली. स्थायी समितीचे सभापती अभिषेक बारणे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या बैठकीस महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी, अतिरिक्त आयुक्त कुलदीप जंगम, तृप्ती सांडभोर, विक्रांत बगाडे आणि नगरसचिव मुकेश कोळप यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते. माता रमाई या केवळ एका व्यक्तीचे नाव नसून, त्या असीम त्याग, संघर्ष आणि ममतेचे प्रतीक आहेत.

### 'लिंग समावेशकता व कौशल्य विकास' विषयावरील पहिल्या युनेस्को चेअरचे उद्घाटन



पुणे (दैनिक संध्या) : Symbiosis Skills and Professional University (एसएसपीयू), किवळे, पुणे येथे 'लिंग समावेशकता व कौशल्य विकास' या विषयावरील भारतातील पहिल्या युनेस्को चेअरचे उद्‌घाटन करण्यात येणार आहे. UNESCO (युनेस्को) पॅरिसच्या सहकार्याने सुरू होणारा हा उपक्रम आशियातीलही पहिलाच मानला जात आहे. या चेअरचे उद्‌घाटन Jayant Chaudhary, माननीय राज्यमंत्री (स्वतंत्र प्रभार), कौशल्य विकास व उद्योजकता तसेच राज्यमंत्री, शिक्षण मंत्रालय, भारत सरकार यांच्या हस्ते शुक्रवार, २४ एप्रिल २०२६ रोजी होणार आहे. हा कार्यक्रम एसएसपीयू कॅम्पसमध्ये आयोजित 'महिला घडवत आहेत कामाच्या भविष्याला' या आंतरराष्ट्रीय परिषदेदरम्यान पार पडणार आहे. या चेअरचे नेतृत्व एसएसपीयूच्या प्रो-चान्सलर Dr. Swati Mujumdar करत असून त्या चेअरहोल्डर आहेत. जागतिक स्तरावर मान्यता प्राप्त कौशल्य विकास तज्ज्ञ म्हणून त्यांची ओळख आहे. हा उपक्रम महिलांच्या कार्यबलातील सहभाग वाढवणे, कौशल्य-आधारित शिक्षणाला चालना देणे आणि रोजगारक्षमतेत वाढ करणे या उद्दिष्टांसाठी महत्त्वपूर्ण ठरणार आहे. ही चेअर उत्कृष्टता केंद्र आणि जागतिक ज्ञानकेंद्र म्हणून कार्य करणार आहे.

# मित्सुबिशीच्यावतीने जागतिक वसुंधरा दिन साजरा

**मित्सुबिशी इलेक्ट्रिक इंडिया २०२४ – २५ मधील तिच्या तलाव संवर्धन सीएसआर उपक्रमाला पुढे नेत, अर्थवॉच इन्स्टिट्यूट इंडियाच्या भागीदारीत हवामान विषयक जागृती आणि समुदायाच्या पुढाकाराने कृतीला चालना देत आहे.**

पुणे (दै. संध्या)




मित्सुबिशी इलेक्ट्रिक इंडियाने तलाव संवर्धनाच्या तिच्या सुरू असलेल्या कॉर्पोरेट सोशल रिस्पॉन्सिबिलिटी (सीएसआर) उपक्रमाचा एक भाग म्हणून अर्थवॉच इन्स्टिट्यूट इंडियाच्या सहकार्याने जागतिक वसुंधरा दिन २०२६ साजरा केला. या अंतर्गत पुण्याजवळील तळेगाव दाभाडे तलावावर कर्मचाऱ्यांचा प्रत्यक्ष सहभाग असलेल्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

या कार्यक्रमाचा एक भाग म्हणून कर्मचाऱ्यांनी तलावाकाठी आयोजित केलेल्या मार्गदर्शनाखालील 'वॉक अँड टॉक' सत्रात भाग घेतला. यामध्ये डिजिटल फील्ड गाईड्स आणि इंटरॅक्टिव्ह ॲप्लिकेशन्सच्या साहाय्याने त्यांनी शहरी नील व हरित जागांचे महत्त्व जाणून घेतले.यानंतर तलावाचे पर्यावरण सुधारण्याच्या उद्देशाने स्वच्छता मोहीम आणि वृक्षारोपण उपक्रम राबवण्यात आला. यावेळी कर्मचाऱ्यांनी कार्बन आणि वॉटर फूटप्रिंटशी संबंधित सत्रातही भाग घेतला, यात त्यांना स्वयंचलित हवामान केंद्रे, हवेची गुणवत्ता प्रणाली आणि पाण्याची गुणवत्ता मूल्यांकन तंत्रज्ञान यांसारख्या साधनांच्या प्रात्यक्षिकांच्या साहाय्याने पर्यावरणावर पडणारा परिणाम आणि तो कमी करण्याविषयी व्यावहारिक माहिती मिळाली.

मित्सुबिशी इलेक्ट्रिक इंडियाने अर्थवॉच इन्स्टिट्यूट इंडियाच्या भागीदारीत आर्थिक वर्ष २०२४ – २५ मध्ये सुरू केलेल्या तलाव संवर्धनाच्या सीएसआर उपक्रमाला एक वर्ष पूर्ण झाल्यानिमित्त हा उपक्रम आयोजित करण्यात आला. तळेगाव आणि आजूबाजूच्या भागातील जलस्रोतांचे संरक्षण करणे आणि सभोवतालची जैवविविधता बळकट करणे यावर या उपक्रमाचा भर आहे. पर्यावरणीय पुनरुज्जीवन आणि सामुदायिक सहभाग व विज्ञानाधारित शिक्षण यांची त्यात सांगड घालण्यात आली आहे.

या कार्यक्रमाच्या अंतर्गत गेल्या वर्षभरात या भागातील अनेक तलावांचे जैवविविधता नकाशे तयार करणे, डिजिटल क्षेत्र मार्गदर्शिका विकसित करणे, आणि विद्यार्थी, महिला गट व स्थानिक समुदायांना सहभागी करून घेणारे नागरिक विज्ञान उपक्रम राबवणे अशी कामे करण्यात आली आहेत. तसेच समुदायांच्या पुढाकाराने पर्यावरण संवर्धनाला प्रोत्साहन देण्यासाठी वृक्षारोपण प्रयत्न, पर्यावरण शिक्षण आणि क्षमता बांधणीलाही पाठबळ देण्यात आले आहे.

या उपक्रमाविषयी भाष्य करताना, मित्सुबिशी इलेक्ट्रिक इंडियाचे व्यवस्थापकीय संचालक अत्सुशी ताकासे म्हणाले, "आमच्या तलाव संवर्धन उपक्रमाद्वारे केवळ जनजागृती करण्यापुरते मर्यादित न राहता पर्यावरणाशी अर्थपूर्ण संबंध प्रस्थापित करणे, हे आमचे ध्येय आहे. प्रत्यक्ष जमिनीवरील उपक्रम, वैज्ञानिक साधने आणि सामुदायिक सहभाग यांचा मेळ घालून, आम्ही स्थानिक परिसंस्थेचे पुनरुज्जीवन करण्याचे कार्य करीत आहोत. त्याचबरोबर लोकांना त्यांच्या दैनंदिन जीवनात कृतींचा होणारा परिणाम अधिक चांगल्या प्रकारे समजून घेण्यास मदत करत आहोत. हा दृष्टिकोन दीर्घकालीन वर्तणुकीतील बदलाला आधार देणारा आहे. शाश्वत विकासाप्रति असलेली आमची कटीबद्धता त्यातून दिसून येते."

**जागतिक पातळीवर हवामान बदलाचा परिसंस्थांवर परिणाम होत आहे. अशा वेळी मित्सुबिशी इलेक्ट्रिक इंडियाचे तळेगावमधील सीएसआर प्रयत्न हे स्थानिक पातळीवर पर्यावरणीय टिकाऊपणा निर्माण करण्याचा एक शाश्वत दृष्टिकोन दर्शवतात. कंपनीच्या "चांगल्यासाठी बदल" या तत्त्वज्ञानाशी सुसंगत असा हा उपक्रम आहे. जबाबदार जल व्यवस्थापन व हवामान कृती यांसारख्या व्यापक शाश्वतता उद्दिष्टांमध्ये तो मोलाची भर घालतो.**

## राहुल शेवाळे यांच्या शेवाळे ॲग्रो फार्म कृषीमंत्र्यांनी दिली भेट

लोणी काळभोर (दै. संध्या)



पुणे जिल्ह्यातील शेवाळेवाडी येथील युवा उद्योजक व शेतकरी राहुल शेवाळे यांच्या शेवाळे ॲग्रो फार्म मधील शिवसमर्थ देवगड हापूस आंबा महोत्सवाला राज्याचे कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी भेट देत आंब्याची चव घेत कौतुक केले.

या महोत्सवाचे वैशिष्ट्य म्हणजे कोकणातील देवगड भागातील आंब्यांची बाग आधुनिक एआय टेक्नॉलॉजीच्या मदतीने नैसर्गिक आणि सेंद्रिय पद्धतीने विकसित करण्यात आली आहे. या बागेतील आंबे थेट ग्राहकांसाठी महोत्सवात उपलब्ध करून देण्यात आले आहेत.

महोत्सवादरम्यान कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी आंब्याची चव घेतली आणि या उपक्रमाचे विशेष कौतुक करत शेतकऱ्यांनी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून शेतीत प्रगती साधावी, असे आवाहन केले.

यावेळी आयोजक राहुल शेवाळे यांच्यासह सिद्धार्थ शेवाळे, सार्थक शेवाळे, विलास शेवाळे, संभाजी हाके, संजय कोद्रे, विजय कोद्रे, सुनील शेवाळे, अतुल शेवाळे, मंगेश शेवाळे, चंद्रकांत शेवाळे, हभप रामदादा शेवाळे आणि माजी सरपंच प्रतिमा शेवाळे यांसह अनेक मान्यवर उपस्थित होते.

दरम्यान, बाजारात कोकणातील आंब्याच्या नावाखाली इतर भागातील, विशेषतः बेंगलोर , कर्नाटक परिसरातील केमिकलद्वारे पिकवलेले आंबे मोठ्या प्रमाणावर विकले जात असल्याने ग्राहकांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण होत असल्याची माहिती राहुल शेवाळे यांनी दिली. याला पर्याय म्हणून त्यांनी आंब्याला जीआय टॅगिंग केले असून त्यामुळे ग्राहकाला देवगड आंबा सहज ओळखता येतो , तसेच नैसर्गिक आणि सेंद्रिय पद्धतीने पिकवलेला अस्सल देवगड आंबा ग्राहकांसाठी उपलब्ध करून दिला आहे.

## एस्कॉर्ट्स कुबोटाकडून डिजिट्रॅक सिरीजचा विस्तार

नवी दिल्ली (दै. संध्या)




Escorts Kubota Limited या कृषी-यंत्रसामग्री आणि बांधकाम उपकरण क्षेत्रातील अग्रगण्य कंपनीने आपल्या Powertrac ब्रँडअंतर्गत डिजिट्रॅक सिरीजचा मोठा विस्तार जाहीर केला आहे. कंपनीने या सिरीजमध्ये तीन नवीन ट्रॅक्टर मॉडेल्स लाँच करत विद्यमान दोन मॉडेल्सवरून एकूण पाच मॉडेल्सची व्यापक श्रेणी तयार केली आहे.

४५ ते ५५ एचपी क्षमतेतील ही सिरीज प्रगत शेती कामे आणि जड मालवाहतुकीसाठी डिझाइन करण्यात आली असून ती संपूर्ण भारतात उपलब्ध होणार आहे. या सर्व मॉडेल्समध्ये मोठ्या सीसीची इंजिने, मोठे टायर, साइड-शिफ्ट गिअर, १२ फॉरवर्ड आणि ३ रिव्हर्स कॉन्स्टंट मेश गिअरबॉक्स, इंडिपेंडंट पीटीओ (IPTO) आणि २००० किलो क्षमतेची हायड्रॉलिक लिफ्ट यांसारखी प्रगत वैशिष्ट्ये देण्यात आली आहेत.

## कर्करोग शस्त्रक्रियेनंतर ७० वर्षीय रुग्णाला मिळाला नवीन कान

पुणे (दै. संध्या)

पुण्यातील Aditya Birla Memorial Hospital येथे ७० वर्षीय रुग्णावर करण्यात आलेल्या अत्याधुनिक शस्त्रक्रियेमुळे कर्करोगामुळे बाधित झालेल्या कानाची यशस्वी पुनर्रचना करण्यात आली आहे. या जटिल प्रक्रियेमुळे रुग्णाला केवळ नवीन कान मिळाला नाही, तर त्याचे जीवनमानही सुधारले आहे. छोट्या जखमेपासून कर्करोगापर्यंतचा प्रवास



रुग्णाच्या उजव्या कानाला झालेल्या छोट्या जखमेपासून सुरू झालेली समस्या पुढे जाऊन Basal Cell Carcinoma या तिसऱ्या टप्प्यातील त्वचेच्या कर्करोगात परिवर्तित झाली. हा कर्करोग सहसा हळूहळू वाढणारा असला तरी वेळेवर उपचार न केल्यास स्थानिक उतींचे मोठे नुकसान करू शकतो.

तपासणीत बाह्य कानाच्या ६० टक्क्यांहून अधिक भाग प्रभावित झाल्याचे आढळले, ज्यामुळे संपूर्ण कान गमावण्याचा धोका निर्माण झाला होता.

## मराठी ZEE5 वर 'डिटेक्टिव्ह धनंजय – रहस्यजाल'चा थरार; प्रीमियर १ मे रोजी

मुंबई (दै. संध्या)

पुणे, २३ एप्रिल २०२६ : ZEE5 च्या मराठी विभागाकडून प्रेक्षकांसाठी आणखी एक थरारक गूढकथा सादर केली जाणार आहे. 'डिटेक्टिव्ह धनंजय – रहस्यजाल' या मराठी ओरिजिनल मालिकेची घोषणा करण्यात आली असून, या मालिकेचा प्रीमियर १ मे २०२६ रोजी होणार आहे. आदिनाथ कोठारे आणि पुष्कराज चिरपुटकर यांच्या प्रमुख भूमिका असलेल्या या मालिकेचे दिग्दर्शन श्रीरंग गोडबोले यांनी केले आहे, तर लेखन गिरीश जयंत जोशी यांचे आहे. प्रसिद्ध लेखक बाबुराव अर्नाळकर यांच्या गाजलेल्या साहित्यावर आधारित




ही कथा असून इंडियन मॅजिक आय आणि स्टोरीटेलर्स नूक यांनी निर्मिती केली आहे. 'डिटेक्टिव्ह धनंजय – रहस्यजाल'ची कथा शिरगाव या काल्पनिक पण रहस्यमय शहरात घडते. एका गुंतागुंतीच्या खूनप्रकरणाच्या तपासात अडकलेल्या एका बुद्धिमान खासगी गुप्तहेराचा प्रवास यात उलगडतो. चुकीच्या पद्धतीने आरोपी ठरलेल्या व्यक्तीची निर्दोषता सिद्ध करण्यासाठी तो काळाशी स्पर्धा करत असताना अनेक गूढ, फसवणूक आणि छुपे हेतू समोर येतात.

ही मालिका केवळ 'गुन्हा कोणी केला' यावर न थांबता 'तो का घडला' याचा सखोल शोध घेते. त्यामुळे कथानकात मानवी भावना, मानसशास्त्र आणि नैतिकतेचे विविध पैलू प्रभावीपणे मांडले गेले आहेत.

ZEE5 मराठीच्या प्रमुख हेमा व्ही. आर. यांनी सांगितले की, प्रेक्षकांच्या बदलत्या आवडी लक्षात घेऊन वेगळ्या आशयाच्या कथा सादर करण्यावर भर दिला जात आहे. 'डिटेक्टिव्ह धनंजय' ही मालिका साहित्यिक वारशाचा सन्मान राखत आधुनिक पद्धतीने सादर केली आहे.

दिग्दर्शक श्रीरंग गोडबोले यांनी सांगितले की, ही कथा केवळ गुन्हेगारी रहस्य नसून त्यामागील कारणांचा शोध घेणारी आहे, त्यामुळे ती अधिक गुंतवून ठेवणारी ठरते.

अभिनेता आदिनाथ कोठारे यांनी 'धनंजय'ची भूमिका साकारणे आव्हानात्मक आणि रोमांचक असल्याचे सांगत, प्रेक्षकांसाठी एक प्रामाणिक आणि दर्जेदार थरारपट देण्याचा प्रयत्न केल्याचे नमूद केले.

# 'युवकांमध्ये प्रचंड सृजनशीलता, नाविन्यता, कौशल्यता आणि कल्पकता'

## 'पीएम व्हिजन टू आर्ट' टर्न व्हिजन इन टू आर्ट स्पर्धेचा बक्षीस वितरण सोहळा संपन्न

मुंबई (दै. संध्या)




लोकप्रिय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या ७५ व्या वाढदिवसानिमित्त महाराष्ट्र शासन सांस्कृतिक कार्य विभाग आणि, महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळ यांच्या वतीने संपूर्ण भारत देशात 'पीएम व्हिजन टू आर्ट' स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेचा पारितोषिक वितरण सोहळा पु.ल.देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी प्रभादेवी मुंबई येथे राज्याचे संस्कृतीक कार्य मंत्री आशिष शेलार यांच्या हस्ते पार पडला. यावेळी ७५ विजेत्यांचा पारितोषिक देऊन गौरव करण्यात आला.

कार्यक्रमाची सुरुवात मा. मंत्री आशिष शेलार, सांस्कृतिक विभाग सचिव किरण कुलकर्णी, दादासाहेब फाळके चित्रनगरी व्यवस्थापकीय संचालिका स्वाती म्हसे पाटील यांच्या हस्ते दीप प्रज्वलनाने झाली. त्यानंतर कॉफी टेबल बुकचे अनावरण करण्यात आले.

यावेळी उपस्थितांना मार्गदर्शन करताना मंत्री आशिष शेलार म्हणाले की, "मला जाणीवपूर्वक याचा उल्लेख करावा लागेल की, आपल्या देशातील युवकांमध्ये, युवतींमध्ये किंवा नागरिकांमध्ये प्रचंड सृजनशीलता, नाविन्यता, कौशल्यता आणि कल्पकता आहे. माननीय पंतप्रधान मोदीजी नेहमी म्हणतात, एक सॉफ्ट पॉवर या पद्धतीची ताकद आपल्या भारतामध्ये आहे. त्याचं चित्र आणि अनुभूती आपल्याला प्रदर्शनाला भेट दिल्यावर येते."

मंत्री शेलार पुढे म्हणाले की, "पंतप्रधानांचे संपूर्ण आयुष्य देशासाठी समर्पित आहे. जगभरातल्या प्रवासात त्यांना ज्या काही भेटवस्तू मिळतात त्या भेट वस्तू सुद्धा जाहीर लिलाव करून, त्यातून उभा राहणार निधी हा प्रधानमंत्री राहत कोशमध्ये दिला जातो. आजपर्यंत एकही महिन्याचे मानधन किंवा पगार मुख्यमंत्री असल्यापासून पंतप्रधान असेपर्यंत या व्यक्तीने घेतलाच नाही. आपला पगार देखील राहत कोशमध्ये दिला. एक असा पंतप्रधान, की ज्याने एक दिवस देखील सुट्टी घेतली नाही. या दृष्टीने या कल्पनेतून या कार्यक्रमाचे उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. सांस्कृतिक विभाग आणि चित्रनगरी विभागाने यासाठी प्रयत्न केले."

"ही प्रदर्शनी इतर ठिकाणी देखील मांडण्यात येईल. चित्रनगरी सरकारी कंपनी आहे. यातून जे उत्पन्न मिळते ते देखील विविध सामाजिक कार्यासाठी वापरले जाते. यातून येणारा सीएसआर सात संस्थांना ६५ लाख रुपये देण्यात येत आहेत. तुम्हाला तुमच्या कामात यश मिळो." अशा शब्दात मंत्री आशिष शेलार यांनी गौरव केला. यावेळी उपस्थितांना मार्गदर्शन करताना सांस्कृतिक विभागाचे सचिव किरण कुलकर्णी म्हणाले की, "बक्षीस म्हणून दिला जाणारा निधी असो किंवा संस्थांना सामाजिक बांधिलकी म्हणून दिलेला निधी असो. आपल्या सर्वांचे ध्येय एक आहे ते म्हणजे आपला देश. याचे प्रतिबिंब चित्रप्रदर्शनात पाहायला मिळाले." या कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन दादासाहेब फाळके चित्रनगरी व्यवस्थापकीय संचालिका स्वाती म्हसे पाटील यांनी केले.

### या स्पर्धेचे परिक्षण पुढील परिक्षकांनी केले -

१.अच्युत पालव - पद्मश्री पुरस्कार विजेते - भारतीय सुलेखनकार आणि शिक्षक
२. वासुदेव कामथ - पद्मश्री पुरस्कार विजेते - आंतरराष्ट्रीय स्तरावर प्रशंसित भारतीय कलाकार
३. सुधारक ओलवे - पद्मश्री पुरस्कार विजेते - मुंबईस्थित माहितीपट छायाचित्रकार
४. प्रसून जोशी - पद्मश्री पुरस्कार विजेते - भारतीय कवी, लेखक, गीतकार आणि मॅकॅन वर्ल्ड ग्रुप इंडियाचे सीईओ
५. रवी जाधव - भारतीय चित्रपट दिग्दर्शक, अभिनेता, पटकथा लेखक आणि निर्माता
६. भरत दाभोलकर - भारतीय अभिनेता, दिग्दर्शक आणि लेखक
७. गौरव दालमिया - दालमिया ग्रुप होल्डिंग्जचे अध्यक्ष
८. श्रीनिवासन स्वामी - आर के स्वामी लिमिटेडचे कार्यकारी गट अध्यक्ष आणि जाहिरात एजन्सीज असोसिएशन ऑफ इंडिया (एएएआय) चे अध्यक्ष.

स्पर्धेचा उद्देश -देशाच्या प्रगतीचा आणि दूरदृष्टीचा कलात्मक पद्धतीने सादरीकरण करुन 'विकसित भारत' या संकल्पनेला प्रोत्साहन देण्यासाठी महाराष्ट्र शासन सांस्कृतिक कार्य विभागाच्या महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळाने ही राष्ट्रीय पोस्टर डिझाइन स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. ही स्पर्धा २० सप्टेंबर ते १० नोव्हेंबर या कालावधीत पार पडली. या स्पर्धेसाठी संपूर्ण भारतभरातून आणि विविध वयोगटांमधून सुमारे ३ हजाराहून नोंदी प्राप्त झाल्या. पद्मश्री पुरस्कारप्राप्त व्यक्तींसह भारतातील नामवंत क्रिएटिव्ह दिग्गजांनी काटेकोर मूल्यमापन व परीक्षक प्रक्रियेत सहभाग घेतला आणि अंतिम ७५ विजेत्यांची निवड या स्पर्धेत करण्यात आली.

स्पर्धेचे विषय -यास्पर्धेमध्ये स्वतंत्र डिझायनर, ब्रँडिंग व डिझाइन स्टुडिओ, जाहिरात व क्रिएटिव्ह एजन्सीज, तसेच डिझाइन व व्हिज्युअल कम्युनिकेशनचे विद्यार्थी अशा सर्वांना आपली कला सादर करण्याची संधी या स्पर्धेच्या माध्यमातून मिळाली. या स्पर्धेसाठी एकूण ९ विषय देण्यात आले होते. त्यात,आत्मनिर्भर भारत, डिजिटल इंडिया, बेटी बचाओ बेटी पढाओ, स्वच्छ भारत अभियान, योग, वेव्हज समिट,मेक इन इंडिया, स्किल इंडिया आणि क्लायमेट चेंज (हवामान बदल) या विषयांचा समावेश होता.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### शिरूर पोलिसांची धडाकेबाज कारवाई : दीड वर्षांत 21 कोटींचा एमडी ड्रग्स जप्त

कवठे येमाई (दैनिक संध्या) : पुणे जिल्ह्यातील शिरूर पोलीस स्टेशनच्या हद्दीत गेल्या दीड वर्षात पोलिसांनी अंमली पदार्थांविरोधात मोठी मोहीम राबवत तब्बल २१ कोटी रुपयांचा एमडी (मेफेड्रोन) ड्रग्स जप्त केला आहे.या कारवाईमुळे गुन्हेगारीवर मोठा आळा बसला असून परिसरात पोलिसांच्या कार्याचे कौतुक होत आहे.पोलीस निरीक्षक संदेश केंजळे यांच्या मार्गदर्शनाखाली विविध ठिकाणी छापे टाकून १६ आरोपींवर तडीपारची कारवाई करण्यात आली, तर ७ जणांवर एमपीडीए अंतर्गत कठोर कारवाई करण्यात आली आहे. तसेच पोलिसांनी १६ पिस्तुले, २३ जिवंत काडतुसे,एक तलवार व कोयता जप्त करून अनेक गुन्हेगारांना अटक केली आहे. शिरूर पोलीस स्टेशन हे भौगोलिकदृष्ट्या विस्तीर्ण क्षेत्रात कार्यरत असून, कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी पोलिस दल सतत दक्ष आहे. गुन्हेगारांविरोधात कठोर भूमिका घेत "गुन्हेगारांना कायद्याचा धाक बसविणे" हा उद्देश ठेवून पोलिसांनी प्रभावी कारवाया केल्या आहेत.याशिवाय स्थानिक गुन्हे अन्वेषण विभागाच्या मदतीने गांजा विक्री करणाऱ्या टोळ्यांवरही कारवाई करत सुमारे १५३ किलो गांजा जप्त करण्यात आला असून सहा आरोपींना अटक करण्यात आली आहे. पोलिसांनी शहरातील ४,७५७ संशयित व्यक्तींवर प्रतिबंधात्मक कारवाई करून शांतता राखण्यास मोठे योगदान दिले आहे."कायद्याला आव्हान देणाऱ्यांना कठोर शिक्षा होईल," असा इशारा पोलीस निरीक्षक संदेश केंजळे यांनी देत नागरिकांनीही पोलिसांना सहकार्य करण्याचे आवाहन केले आहे.



### शेतकऱ्यांच्या वीज प्रश्नांबाबत सोनवणे यांनी अधिकाऱ्यांची घेतली बैठक

नारायणगाव (दैनिक संध्या) : जुन्नर तालुक्यात शेतकरी बांधवांना नियमित वीज मिळत नसल्याने शेतीच्या कामात मोठा व्यत्यय येत होता व हातातोंडाशी आलेल्या पिकांचे नुकसान होत होते. अनेक शेतकऱ्यांनी अशा स्वरूपाची तक्रार जुन्नरचे आमदार शरददादा सोनवणे यांच्याकडे केली होती. त्याअनुषंगाने सोनवणे यांनी विजेच्या प्रश्नांबाबत दखल घेत रायगड या निवासस्थानी जुन्नर तालुक्यातील महावितरण अधिकारी वर्गाची तातडीने बैठक घेतली व त्यांना काही शेतकरी हिताच्या महत्वाच्या सूचना करून त्याची त्वरित अंमलबजावणी करावी असे आदेश दिले. सकाळी ९ ते ५ पूर्ण क्षमतेने शेतकऱ्यांना अखंडीत वीज पुरवठा देण्यात यावा. कुठल्याही तांत्रिक अडचणीमुळे या आठ तासात जितक्या वेळ वीज बंद असेल तेवढ्या वेळेची भरपाई करून देण्यात यावा. सबस्टेशनचे मेंटेनन्स करून घेणे. डीपीच्या सगळ्या तांत्रिक अडचणी दूर करून नियमित करून घेणे. सायंकाळी पूर्ण वेळ सिंगल फेज वीज दिली जाईल. यात्राकाळात लाइट पूर्ण काळ दिली जाईल.

### आळेफाटा येथे दिवसाढवळ्या 4 लाखाची चोरी

नारायणगाव (दैनिक संध्या) : आळेफाटा येथे भरदिवसा मंगळवार दि. 21 रोजी सकाळी 11 च्या सुमारास दत्तात्रय वाघमारे यांनी बँकेतून काढलेल्या चार लाख रुपयांवर चोरट्यांनी डल्ला मारून लंपास केले. या चोरीमुळे आळेफाटा परिसरात खळबळ उडाली आहे. वडगाव आनंद येथील दत्तात्रय तुकाराम वाघमारे यांनी मंगळवार दि. 21 रोजी सकाळी 11 च्या सुमारास आळेफाटा येथील सेंट्रल बँकेत वैयक्तिक कारणासाठी 4 लाख रुपये काढले होते. व ही रक्कम त्यांनी आपल्या स्कुटीच्या डिक्कीत ठेवली होती. आणि काही कामासाठी ते गोमाता पतसंस्थेत गेले असता पाळत ठेवून असलेल्या चोरट्यांनी काही मिनिटांतच स्कुटीची डिक्की तोडून 4 लाख रुपये घेऊन पसार झाले. वाघमारे हे त्यांचे काम उरकल्यानंतर स्कुटीच्या जवळ आले तेंव्हा त्यांना स्कुटीची डिक्की तुटलेली आणि त्यामध्ये ठेवलेले पैसेही गायब झाल्याचे निदर्शनास आले.त्यांनी तात्काळ आळेफाटा पोलीस ठाण्यात या घटनेची माहिती कळविली. घटनास्थळी आळेफाटा पोलीस स्टेशनचे सहायक पोलीस निरीक्षक विश्वास जाधव यांनी भेट घेऊन घटनास्थळावरील सिसिटीव्ही फुटेज तपासत ही चोरी चोरट्यांनी नियोजन करून केल्याचे आढळून आले. त्या फुटेजच्या आधारे आरोपींचा शोध सुरु असून नागरिकांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

### नायगाव येथे कांदा बीजोत्पादनाचा यशस्वी प्रयोग; कृषी अधिकारी चव्हाण यांचे मार्गदर्शन

पुरंदर (दैनिक संध्या) : पुरंदर तालुक्यातील पूर्व भागातील नायगाव येथे प्रगतशील शेतकरी व कृषी पदवीधर संदीप मधुकर खेसे आणि त्यांचे बंधू गणेश मधुकर खेसे यांनी कांदा बीजोत्पादनाचा यशस्वी प्रयोग करून आदर्श निर्माण केला आहे. साडेतीन एकर क्षेत्रात तब्बल ४ क्विंटल कांदा बियाणे उत्पादन घेण्यात त्यांनी यश मिळवले असून, या उपक्रमाची तालुका कृषी अधिकारी श्रीधर चव्हाण यांनी प्रत्यक्ष भेट देऊन पाहणी केली व मार्गदर्शन केले. यावेळी मंडळ अधिकारी मयूर कचरे, उपकृषी अधिकारी उदयंत वाघोले, सहाय्यक कृषी अधिकारी विशाल बारवकर तसेच सोसायटीचे अध्यक्ष चंद्रकांत चौंडकर आदी उपस्थित होते. अवकाळी पाऊस व गारपिटीमुळे उत्पादनात सुमारे ५० टक्के घट झाल्याची माहिती संदीप खेसे यांनी दिली. खेसे बंधूंनी लागवडीपूर्वी शेताची योग्य मशागत करून जमीन भुसभुशीत केली. ड्रिप सिंचन पद्धतीचा वापर करत चार फूट अंतरावर लॅटरल अंथरून नियोजनबद्ध लागवड करण्यात आली. एकसारख्या आकाराचा, मध्यम गोल व निरोगी कांदा निवडून लागवड केल्यामुळे उत्पादनाची गुणवत्ता टिकवण्यात यश आले. लागवडीपूर्वी व नंतर विविध टप्प्यांवर संतुलित खतांचा वापर करून पिकाला आवश्यक पोषण दिले. ठराविक कालावधीत वेगवेगळे खतांचे डोस देऊन पीक जोमदार ठेवण्यात आले. तसेच जैविक घटकांचा वापर करून मुळकुज व इतर रोगांवर नियंत्रण ठेवले. मावा, फुलकिडे (थ्रिप्स) आणि करपा यांसारख्या रोग-कीड नियंत्रणासाठी वेळोवेळी फवारणी करण्यात आली. यामुळे पिकाची वाढ चांगली राहिली आणि बियाण्याची गुणवत्ता सुधारली. कांदा बीजोत्पादनात परागीभवन महत्वाचे असल्याने शेतात मधमाश्यांच्या तीन पेट्या ठेवण्यात आल्या. तसेच झेंडू, सूर्यफूल, मोहरी यांसारख्या फुलझाडांची लागवड करून मधमाश्यांना आकर्षित करण्यात आले. त्यामुळे बोंडामध्ये बियाण्यांची भरघोस निर्मिती झाली.

# चाकण पंचक्रोशीत पशुधन वाचविण्यासाठी लगबग

**विक्रीसाठी आणलेल्या जनावरांना बियाण्यांच्या गुणवत्तेशी कोणतीही तडजोड न करता त्यांना मका, ज्वारी, बाजरी यासारख्या चाऱ्याचा पुरवठा करावा लागतो**

चाकण (दै. संध्या)

"पशुधन वाचवणे ही आपली सर्वांची सामूहिक जबाबदारी आहे. जनावरांना आवश्यक असणारे चारा उत्पादन वाढविण्यासाठी शासनाने वैरण, बियाणे वाटप हायड्रोपोनिक पद्धतीने चारा उत्पादन, कडबा कुट्टी यंत्राचे वाटप आदी योजनांवर भर देण्याची गरज आहे. भविष्यात चारा छावण्यांची वेळ येऊ नये यासाठी आतापासूनच चारा साठवणुकीचे योग्य नियोजन करणे अपेक्षित आहे."
**- विकास धाडगे,** नगरसेवक, चाकण.



उन्हाच्या काहिलिने घामाघुम झालेल्या चाकण पंचक्रोशीतील शेतकऱ्यांची पशुधन वाचविण्यासाठी लगबग सुरू झाली आहे. गेल्या महिनाभरापासून चाकण परिसरात सूर्य मोठ्या प्रमाणात आग ओकू लागला आहे. सकाळी सात वाजल्यापासूनच उन्हाचा कडाका सुरू होत असल्याने घराबाहेर पडणे देखील मुश्किल होत आहे. खेड कृषी उत्पन्न बाजार समितीच्या चाकण येथील महात्मा फुले मार्केट यार्डमध्ये जनावरांचा मोठा बाजार भरतो. विक्रीसाठी आणलेल्या जनावरांची उन्हामुळे जास्त काळजी घ्यावी लागते. विक्रीसाठी आणलेल्या जनावरांना बियाण्यांच्या गुणवत्तेशी कोणतीही तडजोड न करता त्यांना मका, ज्वारी, बाजरी यासारख्या चाऱ्याचा पुरवठा करावा लागतो.

उन्हापासून जनावरांना कोणताही धोका पोहोचू नये म्हणून शेतकऱ्यांनी जनावरांसाठी अदयावत असे सर्व सोयींयुक्त गोठे तयार केले आहेत. गोठ्यामध्ये जनावरांना पिण्याच्या पाण्याची सोय, गारवा मिळण्यासाठी भिंतीवरील पंखे, वैरण, मुरघास आदींची सोय केली असल्याचे येथील शेतकरी व चाकण नगरपरिषदेचे नगरसेवक विकास धाडगे यांनी सांगितले. दिवसेंदिवस जनावरांची देखभाल ठेवणे अवघड होत चालले आहे. शेती करण्यासाठी बैलांना, तर दूध उत्पादनासाठी गाई व म्हैशींना जपणे ही काळाची गरज आहे.

## दुचाकी वाहनांसाठी नवीन मालिकेतील आकर्षक नोंदणी

पुणे (दै. संध्या)

प्रादेशिक परिवहन कार्यालय, पुणे येथे दुचाकी वाहनांसाठी नवीन नोंदणी मालिका सुरू करण्यात येत असून, खासगी चारचाकी वाहनांकरिता आकर्षक व पसंतीचे नोंदणी क्रमांक तीनपट व नियमित शुल्क भरून राखून ठेवण्याकरीता आगाऊ अर्ज स्वीकारण्यात येणार आहेत.

आकर्षक व पसंतीचे नोंदणी क्रमांक इच्छुक वाहनधारकांनी दिनांक २३ एप्रिल रोजी सकाळी १०.३० ते दुपारी २.३० या कार्यालयीन वेळेत विहित नमुन्यातील अर्ज, डीडी, पत्त्याचा पुरावा, ओळखपत्र व पॅनकार्डच्या साक्षांकित प्रतींसह प्रादेशिक परिवहन कार्यालय, पुणे येथील खाजगी वाहन विभागात सादर करावेत. एखाद्या एका क्रमांकासाठी एकापेक्षा जास्त अर्ज प्राप्त झाल्यास त्यांची यादी कार्यालयीन नोटीस बोर्डवर प्रसिद्ध करण्यात येईल. सदर अर्जांसाठी लिलावाचे डीडी २४ एप्रिल रोजी दुपारी २.३० वाजेपर्यंत स्वीकारण्यात येतील व त्याच दिवशी दुपारी ४ वाजता सभागृहात लिलाव होईल.

त्याचप्रमाणे, दुसऱ्या टप्प्यात आकर्षक व पसंतीच्या क्रमांकांसाठी अर्ज दिनांक २४ एप्रिल रोजी सकाळी १०.३० ते दुपारी २.३० या वेळेत स्वीकारण्यात येणार आहेत. या अर्जांसाठीचे लिलावाचे डीडी २७ एप्रिल रोजी दुपारी २.३० वाजेपर्यंत स्वीकारले जातील व दुपारी ४ वाजता सहकार सभागृहामध्ये लिलाव आयोजित करण्यात येईल.

लिलावासाठी सादर करण्यात येणारे डीडी हे "R.T.O., Pune" या नावाने नॅशनलाइज्ड/शेड्युल्ड बँकेचे, पुणे येथील असणे आवश्यक असून ते दोन महिन्यांपेक्षा जुने नसावेत. प्रत्येक अर्जासोबत पॅनकार्डची साक्षांकित प्रत जोडणे अनिवार्य राहील. लिलावासाठी सादर करण्यात येणारा डीडी बंद पाकिटात एका अर्जासोबतच ग्राह्य धरला जाईल. "Pune R.T.O." या नावाने सादर केलेले किंवा विहित शुल्कापेक्षा कमी रकमेचे डीडी बाद करण्यात येतील. एकाच अर्जदाराने एका क्रमांकासाठी एकाहून अधिक पाकिटे सादर केल्यास संबंधित अर्ज रद्द करण्यात येईल.

लिलाव प्रक्रियेमध्ये एखाद्या पसंतीच्या क्रमांकाला समान रकमेचे डीडी प्राप्त झाल्यास, संबंधित क्रमांकाची निश्चिती अर्जदारांच्या नावांच्या चिठ्या टाकून करण्यात येईल. लिलाव प्रक्रियेदरम्यान अर्जदार उपस्थित असो अथवा नसो, संपूर्ण प्रक्रिया पूर्ण करण्यात येईल. महाराष्ट्र मोटार वाहन नियम, १९८१ च्या नियम ५४ अ नुसार पसंतीचा नोंदणी क्रमांक राखून ठेवण्याची वैधता १८० दिवस आहे. तथापि, आता NIC Portal मार्फत करण्यात आलेल्या बदलानुसार वैधता संपलेले पसंती क्रमांक पुन्हा जनतेसाठी पोर्टलवर उपलब्ध दिसून येतात.

वरील लिलाव प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर उर्वरित पसंती क्रमांकांचे वितरण ऑनलाईन पद्धतीने करण्यात येणार असून, नागरिकांना https://fancy.parivahan.gov.in या संकेतस्थळावर नाव नोंदणी करून, अर्ज व शुल्क भरणा करून पसंतीचा नोंदणी क्रमांक आरक्षित करता येणार आहे.

## मत्स्यव्यवसाय योजनांसाठी एनएफडीपी पोर्टलवर नोंदणी बंधनकारक

पुणे (दै. संध्या)



जिल्ह्यातील मत्स्यव्यवसायाशी संबंधित सर्व व्यक्ती व संस्थांनी शासनाच्या विविध योजनांचा लाभ घेण्यासाठी राष्ट्रीय मत्स्यव्यवसाय डिजिटल प्लॅटफॉर्म (एनएफडीपी) पोर्टलवर नोंदणी करावी, असे आवाहन सहाय्यक आयुक्त मत्स्यव्यवसाय अर्चना शिंदे यांनी केले आहे.

जिल्ह्यातील वैयक्तिक मच्छिमार, मत्स्यसंवर्धक, मत्स्य विक्रेते, मच्छिमार सहकारी संस्थांचे सभासद तसेच मत्स्यउत्पादन शेतकरी संघ यांना विभागाच्या योजनांचा लाभ घेण्यासाठी एनएफडीपी पोर्टलवर नोंदणी अनिवार्य आहे. ही नोंदणी संबंधित संकेतस्थळावर स्वतः किंवा जवळच्या सीएससी केंद्रात आधारकार्ड व बँक पासबुकसह विनामूल्य करता येणार आहे. तसेच ई-श्रम कार्ड नोंदणीही संबंधित संकेतस्थळावर करण्याचे आवाहन करण्यात येत आहे.

याशिवाय किसान क्रेडिट कार्ड व अपघात गट विमा योजनेचा लाभ घेण्यासाठी इच्छुकांनी सहाय्यक आयुक्त मत्स्यव्यवसाय कार्यालय, हडपसर, पुणे येथे संपर्क साधावा.

## टीसीएस कंपनीचा प्लेसमेंट ड्राइव्ह उत्साहात संपन्न

नारायणगाव (दै. संध्या)

नारायणगाव येथील ग्रामोन्नती मंडळाच्या आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स महाविद्यालयात नामांकित कंपनी टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेस (TCS) यांची प्लेसमेंट ड्राइव्ह दि. १० एप्रिल २०२६ रोजी उत्साहात पार पडली. या प्लेसमेंट ड्राइव्हसाठी महाविद्यालयातील बीए, बीकॉम, बीएससी, बीबीए या शाखांमधील पदवीधर तसेच शेवटच्या वर्गात शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. सदर ड्राइव्हमध्ये एकूण ३८ विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली. निवड झालेल्या विद्यार्थ्यांचे संस्थेचे कार्याध्यक्ष कृषिरत्न अनिल मेहेर यांनी अभिनंदन केले.

विद्यार्थ्यांना नोकरीच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी अशा प्रकाराचे प्लेसमेंट ड्राईव्ह भविष्यात मोठ्या प्रमाणात आयोजित करण्यात येणार आहेत. अशी माहिती प्राचार्य डॉ.आनंद कुलकर्णी यांनी दिली.

## पूजा गोसावी यांची पुणे शहर पोलीस दलात नियुक्ती

कवठे येमाई (दै. संध्या)

शिरूर तालुक्यातील मलठण येथील सौ.पूजा महेश गोसावी यांनी जिद्द, चिकाटी आणि अथक परिश्रमाच्या जोरावर मोठे यश संपादन करत पुणे शहर पोलीस दलात नियुक्ती मिळवली आहे.अत्यंत गरीब कुटुंबातून आलेल्या पूजा गोसावी यांनी अनेक अडचणींवर मात करत आपले ध्येय गाठले आहे.

शिक्षण आणि करिअरच्या वाटचालीत त्यांना सासरे विलास गोसावी (युवा क्रांती पोलीस मित्र संघटना, शिरूर) यांचे मोलाचे मार्गदर्शन व सहकार्य लाभले. त्यांनी रूढी-परंपरांना बाजूला ठेवत सुनबाई पूजाला शिरूर येथील शितोळे करिअर अकॅडमीत प्रवेश मिळवून दिला. तसेच मार्गदर्शक शिक्षक शितोळे सर यांनी शारीरिक व लेखी परीक्षेची योग्य तयारी करून घेतली.या मार्गदर्शनासह स्वतःच्या मेहनतीच्या जोरावर पूजाने सर्व टप्पे यशस्वीरीत्या पार करत सुरुवातीला कारागृह



पोलीस म्हणून काम केले आणि त्यानंतर आता पुणे शहर पोलीस दलात नियुक्ती मिळवली आहे.

तिच्या या यशामुळे मलठण गावासह परिसरात आनंदाचे वातावरण असून, अनेक मुलींना प्रेरणा मिळत आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी पूजा गोसावी आदर्श ठरत आहेत.

"गरीबी ही अडथळा नसून जिद्दीच्या जोरावर कोणतेही स्वप्न साकार करता येते," हे पूजाने आपल्या यशातून सिद्ध करून दाखवले आहे, अशी भावना तिचे सासरे विलास गोसावी,पती महेश गोसावी यांनी व्यक्त केली आहे.

# पंचायती राज : तळागाळातील लोकशाहीचा पाया

पुणे (दै. संध्या)

भारताची लोकशाही ही केवळ निवडणुकांच्या चौकटीत मर्यादित न राहता ती समाजाच्या तळागाळात रुजलेली, प्रत्येक नागरिकाच्या सहभागातून साकार होणारी एक सजीव व्यवस्था आहे. या व्यवस्थेचे सर्वात भक्कम अधिष्ठान म्हणजे स्थानिक स्वराज्य संस्था आणि त्या संस्थांच्या केंद्रस्थानी असलेली पंचायती राज प्रणाली होय. दरवर्षी २४ एप्रिल रोजी साजरा केला जाणारा 'राष्ट्रीय पंचायती राज दिन' हा या व्यवस्थेच्या ऐतिहासिक वाटचालीचे, तिच्या कार्यक्षमतेचे आणि लोकशाहीतील तिच्या अनन्यसाधारण योगदानाचे स्मरण करून देणारा अत्यंत महत्त्वपूर्ण दिवस आहे. हा दिवस केवळ उत्सव म्हणून साजरा करण्यापुरता मर्यादित नसून स्थानिक लोकशाही अधिक सक्षम, पारदर्शक आणि उत्तरदायी बनवण्याचा एक सामूहिक संकल्प व्यक्त करण्याची संधी देतो.

भारतीय संस्कृतीच्या पायाभूत रचनेत 'ग्राम' ही संकल्पना केंद्रस्थानी आहे. प्राचीन काळापासून गाव हे सामाजिक, आर्थिक आणि राजकीय जीवनाचे केंद्र राहिले आहे. गावपातळीवर लोकांनी एकत्र येऊन आपले प्रश्न सोडवण्याची परंपरा होती. ग्रामसभा ही केवळ एक बैठक नसून ती लोकशाहीची मूळ शाळा होती, जिथे संवाद, चर्चा आणि सहमतीच्या आधारे निर्णय घेतले जात. ही परंपरा पुढेही विविध स्वरूपांत टिकून राहिली. स्वातंत्र्यलढ्याच्या काळात महात्मा गांधी यांनी 'ग्रामस्वराज्य' या संकल्पनेला विशेष महत्त्व दिले. त्यांच्या मते, भारताचा खरा विकास हा गावांच्या स्वायत्ततेत आणि स्वावलंबनात आहे. प्रत्येक गाव हे एक स्वतंत्र प्रजासत्ताक असावे, जेथे लोक स्वतःच्या गरजांनुसार निर्णय घेतात आणि विकासाची दिशा ठरवतात, ही त्यांची भूमिका होती.

स्वातंत्र्यानंतर भारताने लोकशाही शासनपद्धती स्वीकारली, परंतु सुरुवातीच्या काळात स्थानिक स्वराज्य संस्थांना अपेक्षित ते बळ मिळाले नाही. ग्रामीण विकासासाठी विविध योजना राबवण्यात आल्या, मात्र त्या योजनांच्या अंमलबजावणीत स्थानिक लोकांचा सहभाग कमी असल्याने अपेक्षित परिणाम साध्य होत नव्हते. या पार्श्वभूमीवर १९५७ साली स्थापन झालेल्या बलवंतराव मेहता समितीने पंचायती राज व्यवस्थेची पुनर्रचना करण्याची शिफारस केली. या समितीने ग्रामपंचायत, पंचायत समिती आणि जिल्हा परिषद या त्रिस्तरीय रचनेची संकल्पना मांडली. या रचनेमुळे स्थानिक पातळीवर निर्णय घेण्याचे अधिकार लोकप्रतिनिधींना देण्यात आले आणि प्रशासन अधिक लोकाभिमुख बनले.

पुढील काळात अशोक मेहता समिती, जी. व्ही. के. राव समिती आणि एल. एम. सिंगवी समिती यांनी पंचायती राज व्यवस्थेच्या बळकटीकरणासाठी महत्त्वपूर्ण सूचना केल्या. या सर्व प्रयत्नांचा परिपाक म्हणून १९९२ साली भारतीय संविधानात ७३वी घटनादुरुस्ती करण्यात आली आणि २४ एप्रिल १९९३ पासून ती अंमलात आली. याच ऐतिहासिक घटनेच्या स्मरणार्थ दरवर्षी २४ एप्रिल हा दिवस 'राष्ट्रीय पंचायती राज दिन' म्हणून साजरा केला जातो. या दुरुस्तीमुळे पंचायती राज संस्थांना संविधानिक दर्जा मिळाला आणि त्यांच्या अधिकार व जबाबदाऱ्यांची स्पष्ट मांडणी करण्यात आली.

७३व्या घटनादुरुस्तीचे सर्वात महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे ग्रामसभेला दिलेले महत्त्व होय. ग्रामसभा ही स्थानिक लोकशाहीची मूलभूत यंत्रणा आहे. गावातील सर्व प्रौढ नागरिक हे ग्रामसभेचे सदस्य असतात आणि ते थेट निर्णय प्रक्रियेत सहभागी होऊ शकतात. यामुळे लोकशाही अधिक व्यापक आणि समावेशक बनते. ग्रामपंचायत, पंचायत समिती आणि जिल्हा परिषद या संस्थांना विविध विकासकामांसाठी अधिकार देण्यात आले. नियोजन, अंमलबजावणी आणि देखरेख या सर्व प्रक्रियांमध्ये स्थानिक स्वराज्य संस्थांचा सहभाग वाढवण्यात आला.

या व्यवस्थेचे आणखी एक महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे सामाजिक न्यायाची अंमलबजावणी. अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि महिलांसाठी आरक्षणाची तरतूद करून समाजातील वंचित घटकांना सत्तेत सहभागी होण्याची संधी देण्यात आली. विशेषतः महिलांसाठी किमान एक तृतीयांश आरक्षणामुळे ग्रामीण भागात महिला नेतृत्वाची एक नवीन लाट निर्माण झाली आहे. आज अनेक महिला सरपंच, पंचायत सदस्य आणि जिल्हा परिषद अध्यक्ष म्हणून प्रभावीपणे काम करत आहेत. त्यांच्या नेतृत्वामुळे ग्रामीण विकासात संवेदनशीलता आणि समावेशकता वाढली आहे.

पंचायती राज व्यवस्थेचा मुख्य उद्देश म्हणजे स्थानिक पातळीवर लोकांच्या सहभागातून विकास साध्य करणे हा आहे. पाणीपुरवठा, स्वच्छता, आरोग्य, शिक्षण, शेती, रोजगारनिर्मिती यांसारख्या विविध क्षेत्रांत ग्रामपंचायती महत्त्वाची भूमिका बजावतात. सरकारच्या विविध योजना तळागाळापर्यंत पोहोचवण्याचे कार्य या संस्थांमार्फतच केले जाते. त्यामुळे पंचायती राज व्यवस्था ही ग्रामीण विकासाचा कणा म्हणून ओळखली जाते.

तथापि, या व्यवस्थेसमोर अनेक आव्हाने देखील आहेत. आर्थिक स्वायत्ततेचा अभाव, प्रशासकीय अडथळे, अधिकारांचे केंद्रीकरण आणि राजकीय हस्तक्षेप यामुळे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या कार्यक्षमतेवर परिणाम होतो. काही ठिकाणी पारदर्शकतेचा अभाव आणि भ्रष्टाचाराच्या समस्या देखील आढळतात. ग्रामसभांमध्ये नागरिकांचा कमी सहभाग हा देखील एक गंभीर मुद्दा आहे. लोकशाही ही केवळ मतदानापुरती मर्यादित न राहता ती सततच्या सहभागातून सशक्त होते, ही जाणीव समाजात रुजवणे आवश्यक आहे.

या आव्हानांवर मात करण्यासाठी स्थानिक स्वराज्य संस्थांना अधिक आर्थिक स्वायत्तता देणे गरजेचे आहे. त्यांना करआकारणीचे अधिकार वाढवणे, निधीचे योग्य वितरण करणे आणि त्यांचा प्रभावी वापर सुनिश्चित करणे आवश्यक आहे. स्थानिक प्रतिनिधींना प्रशिक्षण देऊन त्यांची प्रशासनिक क्षमता वाढवणे आवश्यक आहे. ग्रामसभेचे महत्त्व वाढवून नागरिकांचा सक्रिय सहभाग सुनिश्चित करणे हीदेखील अत्यंत आवश्यक बाब आहे.

आजच्या तंत्रज्ञानाच्या युगात डिजिटल साधनांचा वापर करून पंचायती राज व्यवस्थेला अधिक प्रभावी बनवता येते. ई-गव्हर्नन्सच्या माध्यमातून कामकाज अधिक पारदर्शक आणि जलद होते. नागरिकांना माहिती सहज उपलब्ध होते आणि सेवा सुलभपणे मिळतात. सामाजिक लेखापरीक्षण, माहितीचा अधिकार आणि जनसहभागाच्या विविध माध्यमांद्वारे उत्तरदायित्व वाढवता येते.

राष्ट्रीय पंचायती राज दिन हा केवळ एक स्मरणदिन नसून तो स्थानिक लोकशाहीच्या बळकटीकरणाचा उत्सव आहे. या दिवशी देशभरात विविध कार्यक्रम आयोजित केले जातात, उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या ग्रामपंचायतींचा सन्मान केला जातो आणि स्थानिक स्वराज्य संस्थांच्या कार्याचा आढावा घेतला जातो. यामुळे इतर संस्थांना प्रेरणा मिळते आणि विकासाची नवी दिशा मिळते.

आज भारत वेगाने प्रगती करत असताना ग्रामीण भागाचा विकास हा अत्यंत महत्वाचा मुद्दा ठरतो. शाश्वत विकास साध्य करण्यासाठी स्थानिक पातळीवर नियोजन आणि अंमलबजावणी आवश्यक आहे. पंचायती राज संस्था या प्रक्रियेत केंद्रस्थानी आहेत. त्या केवळ विकासाच्या यंत्रणा नसून लोकशाहीच्या जडणघडणीचा पाया आहेत.

शेवटी, राष्ट्रीय पंचायती राज दिनाच्या निमित्ताने आपण सर्वांनी स्थानिक स्वराज्य संस्थांचे महत्त्व ओळखून त्यांना बळकट करण्यासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे. प्रत्येक नागरिकाने ग्रामसभेत सहभागी होऊन निर्णय प्रक्रियेत भाग घेतला पाहिजे. स्थानिक प्रश्नांवर चर्चा करून त्यांचे समाधान शोधले पाहिजे. लोकशाही ही केवळ शासनाची जबाबदारी नसून ती प्रत्येक नागरिकाची सामूहिक जबाबदारी आहे. पंचायती राज व्यवस्था ही भारतीय लोकशाहीची खरी ओळख आहे आणि तिच्या सशक्तीकरणातूनच देशाचा समतोल, शाश्वत आणि सर्वसमावेशक विकास साध्य होऊ शकतो.

**डॉ. राजेंद्र बगाटे,** (लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत) ईमेल – bagate.rajendra5@gmail.com